अहवालक्रमांक:१६२

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**पंचायती राज समितीच्या तेराव्या विधानसभेतील तिस-या व पाचव्या अहवालातील हिंगोली व पुणे जिल्हा परिषदेच्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा अनुपालन अहवाल**

# तिसरा अनुपालन अहवाल

**(सदर अहवाल दिनांक २० जुलै, २०१८ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, नागपूर

२०१८

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

पंचायती राज समितीच्या तेराव्या विधानसभेतील तिस-या व पाचव्या अहवालातील हिंगोली व पुणे जिल्हा परिषदेच्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा अनुपालन अहवाल

# तिसरा अनुपालन अहवाल

# पंचायती राज समिती

## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(८) डॉ. सुरेशखाडे, वि.स.स.
(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेषनिमंत्रितः**

(२६) श्री. बाळाराम पाटील,वि.प.स.
(२७) श्री. श्रीकांत देशपांडे,वि.प.स.
(२८) श्री. दत्तात्रय सावंत,वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(५) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

# पंचायती राज समिती

## (सन२०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे ,वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेश भाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री .चंद्रकांत रघुवंशी,वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन२०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी पासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची'कार्यकारी समिती प्रमुख' म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंगफुंडकर, वि.प.स. यांचादिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

# पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधने ,वि.स.स.
१०. श्री. कृष्णागजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी,पंचायती राजसमितीचा'समितीप्रमुख'यानात्यानेसमितीनेअधिकारदिल्यावरुन तेराव्या विधानसभेतील समितीच्या तिस-या व पाचव्या अहवालातील हिंगोली व पुणे जिल्हा परिषदांच्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालासंबंधीच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीसंबंधी तिसरा अनुपालन अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हापरिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधान मंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी वयशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण अस (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of adminis tration) मा.सभापती, विधानपरिषद व मा. अध्यक्ष, विधान सभायांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायतीराज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येय धोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधान मंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधान मंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधान मंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधान मंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Lesgislature) या समितीला'Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रति कृती संबोधली जाते .शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासना लागती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधान मंडळाच्याया समितीद्वारे केले जाते.समितीचे काम काजपक्ष विरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-PartyBasis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो परिणामी त्या सपूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजनायाची आखणी कशी करावी या बाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षे प्रमाण`होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्या संबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधि मंडळा प्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाही मध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधान मंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधी मंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समिती प्रती व विधान मंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत .परंतु, योजना राबविण्या पूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षे बाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्या वर आर्थिक तरतूद करण्यात आल्या नंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षे पेक्षा जास्त खच`करण्यात आला आहे क ाय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्या ऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादे पर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यकती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबी संदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारक रितीने साक्षी पुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधितअधिका-यां कडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालन सुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दापूर्ण केल्या नंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचाया समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट् क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यसासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणतमक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृततती होऊनये यासाठी देखील समितीने उपायोजना सुचविलेल्या आहेत .शासनाच्या प्रतिनिधी प्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थितील पवित असल्या बद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणेया संबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसावेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणाली मध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्य साधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हापरिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पनाव राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता वगैर व्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्याबाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णय देखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचना देखील प्रशासनास केल्या आहेत. लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्यप्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदी नुसार दंडात्मक कारवाई देखील प्रस्तावित केली आहे.या माध्यमातून शासन खाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरब देखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातीलसर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोलचर्चा करुन ज्याबाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्या बाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायतसमित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेयपोषणआहार, पुरकपोषणआहार ,सार्वजनिक आरोग्यकेंद्रे/उपकेंद्रे, पशुवैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाचीकामे, पाणीपुरवठ्याचीकामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेकबाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१५-२०१६ करीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा तिसरा व पाचवा अहवाल महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहांस दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर करण्यात आला.

शासनाने समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईच्या संबंधात जारी केलेले आदेश, परिपत्रके इत्यादी परिशिष्टांमध्ये समावेश केले आहेत. शासनाकडून आलेल्या माहितीच्या संदर्भात समितीने हिंगोली जिल्हा परिषदेसंदर्भात दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ व पुणे जिल्हा परिषदेच्या संदर्भात दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ व दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिलेआहे.

त्या अहवालातील समितीच्या शिफारशींवर शासनाने केलेली कार्यवाही विचारात घेतल्यानंतर समितीच्या अभिप्राय व शिफारशी अहवालात समाविष्ट केलेल्या आहेत.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी श्री.श्यामलाल गोयल, अपर मुख्यसचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.विजयकुमार, प्रधानसचिव, कृषीविभाग, श्री.नंदकुमार, प्रधानसचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. असिम कुमारगुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. श्याम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (अतिरिक्त कार्यभार), श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्री. चं. प्र. जोशी, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. र. प्र. आटे, सहसचिव, शालेय शिक्षणविभाग, श्री. डी. एल. सुळ, सहसचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. मनोहर ठोंबरे, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. प्रकाश वळवी, उपसचिव, ग्रामविकास विभाग, श्री. गिरीश भालेराव, उपसचिव, ग्रामविकास विभाग, श्री. संजयबनकर, उपसचिव, ग्रामविकासविभाग, श्री. म. म. सावंत, उपसचिव, पाणीपुरवठा व स्वच्छताविभाग, श्री. कि. पा. वडते, उप सचिव, महसूल व वन विभाग, श्री. विशाल सोळंकी, आयुक्त, शिक्षण विभाग, पुणे, श्री. पी. एस. कवटे, प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे, डॉ. विजय भुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा तसेच श्री. प्रतापमोहिते व श्री. ज. र. मेनन, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.तसेच जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारीयांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक १९ जुलै, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

| | |
|---|---|
| विधानभवन, | **सुधीर पारवे** |
| नागपूर, | समिती प्रमुख, |
| दिनांक १९ जुलै, २०१८. | पंचायती राज समिती |

## अनुक्रमणिका



| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | परिच्छेद क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | **जिल्हा परिषद, हिंगोली** | | |
| (१) | एक | जिल्हा परिषद हिंगोली नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत (सन२००८-०९) | ३.३०९ | १ |
| (२) | दोन | देखभाल दुरुस्ती मधुन हातपंप खरेदीवर केलेल्या खर्चाबाबत (सन२००८-०९) | ३.५६२ | ८ |
| | | **जिल्हा परिषद, पुणे** | | |
| (३) | तीन | शालेय पोषण आहार अनुदान वाटप (सन२००८-०९) | ३.७९ | १४ |
| (४) | चार | ग्रामपंचायतीतील गैरव्यवहाराची प्रकरणे | ३.१०४० | २१ |
| (५) | पाच | शौचालय अनुदानाबाबत (ग्रामपंचायत, कारी, तालुका भोर, जिल्हा पुणे) (सन२००८-०९) | ५.३३ | ४७ |
| (६) | सहा | प्राथमिक शिक्षकांच्या समायोजना बाबत (सन२०११-१२) | ३.९४ | ५२ |
| | | **परिशिष्ट** शासनाचे आदेश व परिपत्रके आणि समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | | ५९ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद हिंगोली

### जिल्हा परिषद हिंगोली नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम खर्चातील अनियमिततेबाबत

### (परिच्छेद क्रमांक ३.३०९) (सन २००८-२००९)

जिल्हा परिषद हिंगोलीच्या नविन प्रशासकिय इमारत बांधकामास महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग निर्णय क्र. एसीडी/१०९९/सीआर/२७३/२६, दिनांक१८/७/२००० द्वारे रुपये ४८१.९८ लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषदबांधकाम यांनी वेगवेगळया अंदाजपत्रकास मान्यता प्रदान केली आहे. अध्यक्ष काम वाटप समिती तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था हिंगोली यांच्या शिफारशीनुसार विविध मजूर सहकारी संस्थेंना कामे देऊन सदरील कामावर रुपये १५,२७,५७५/- एवढा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जल संधारण विभाग निर्णय क्र. झेड पीए २०००/प्र.क्र.४०२३/३३, दिनांक १२ जानेवारी, २००१(परिशिष्ट१.१) मधील टिप-१ नुसार सदरील कामाच्या प्रशासकीय मान्यतेची व निविदा मंजुरीची माहिती स्थायी समिती विषय समितीच्या पुढील अवलोकनार्थ सादर केलेली नाही.

मजूर सहकारी संस्थेला काम देण्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी अध्यक्ष कामवाटपसमिती तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था हिंगोली यांना लिहिलेले पत्र संचिकेत नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक (प्रमाणक क्र. ५७,७२३,१३८)

निविदेतील जोडपत्र १ मधील अट क्र. १ (अ) व महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेड पीए २००८/प्रक्र.४२८/वित्त९, दि. २१/७/२००७ नुसार को-या निविदा संचाची रक्कम वसुल केल्याबाबत चलन दर्शवून खात्री पटविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग परिपत्रक क्र. एमपी.बी./१०६६/२५०१७४/एम-१७, दि. १७/१२/१९७२ नुसार सुरक्षा अनामत रक्कमेच्या ३ टक्के च्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक आहे. कमी रक्कमेच्या मुद्रांकावर करारनामा केल्यामुळे शासनाचे रु.२६०२/- नुकसान झाले आहे, रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.प्रविदी/१८९१/सिडीआर/जिल्हा परिषद संकिर्ण दिनांक ३०/७/२००२ तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. जिल्हा परिषद २०००/प्र.क्र.८३७/प.रा. (३५), दिनांक १५ सप्टेंबर २००३ नुसार ठेकेदाराने कामावर नेमलेल्या मजूराचा विमा काम सुरु करण्यापूर्वी उतरविणे आवश्यक आहे तसेच कनिष्ठ तांत्रिक अधिकारी विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. प्र. वि. नि. २३०५ कारएवल्युसी XXXVII यादी ४/फ-२, दिनांक २७ जानेवारी, २००६ अन्वये जे कंत्राटदार कार्यादेशाच्या तारखेपासून २ महिन्याच्या आत विमा हप्ता भरणार नाही अशा कंत्राटदारांच्या कंत्राटी कामाच्या पहिल्या देयकातून १ टक्के एवढी रक्कम कपात करावयाची असताना त्याप्रमाणे कपात न करता रक्कम रुपये १५०१५/-कमी कपात केलेली आहे. कमी कपात केलेली रक्कम रुपये १५०१५/- वसूल होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८७ तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. जीआर३४/का-४/५१६२, दिनांक २ जानेवारी १९८७ व क्र. एसटीआर १०९७/प्र.क.०६, दिनांक ९/२/१९९८ नुसार साहित्याची तपासणी शासकीय प्रयोगशाळा किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून करुन घेतलेली नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १६९ व महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए२०००/प्र.क्र.४४/३३, दिनांक २/१२/२००० नुसार कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता यांनी मोजमापाच्या तारखा मोजमाप पुस्तिकेत नमूद केलेल्या नाहीत.

जिल्हा परिषद नविन प्रशासकीय इमारत परिसरात बागबगीचा तयार करणे हे काम ठेकेदाराने विहित मुदतीत पूर्ण केलेले नाही, तसेच मुदतवाढ मागितलेली नाही, काम आहे त्यास्थितीत अंतिम केल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे (प्रमाणक क्र.१३८) निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्ष-या नाहीत.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट २४ मधील नियम १३ व १५ नुसार मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने तिरकी रेष मारलेली नाही.

वरील आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.

लेखा संहिता १९६८ चे नियम ४ प्रमाणे जिल्हा परिषदेअंतर्गत कामाच्या प्रशासकीय व निविदा मंजुरीची केलेली कार्यवाहीची माहिती पुढील स्थायी समिती/विषय समितीच्या बैठकीमध्ये अवलोकनार्थ सादर करण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

अध्यक्ष काम वाटप समिती तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था हिंगोली यांना या कार्यालयाचे पत्र जा.क्र.२६२६, दि. २३/१२/२००८ व जा. क्र. १२० दि.१६/११/२००९ अन्वये काम वाटपाबाबत पत्र दिलेले असून त्याप्रमाणे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था हिंगोली यांनी काम वाटप करुन यादी दिलेली आहे.

को-या निविदा संचाची रक्कम चलनाद्वारे परभणी जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा, हिंगोली येथे भरणा करुन घेऊनच निविदा पुस्तिका विक्री केली आहे. चलनाची छायांकित प्रत उपलब्ध आहे.

करारनाम्यातील कमी रक्कमेचे रुपये २७००/- चे मुद्रांक खरेदी करुन क्रॉस करुन संबंधितांकडून वसूली करण्यात आलेली आहे.

सदर कामाच्या धावते व अंतिम देयकातून अंदाजित रक्कमेवर १% प्रमाणे विमा रक्कम कपाती करण्यात आली असून शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. रक्कम भरल्याची पावती उपलब्ध आहे.

दक्षता व गुण नियंत्रण मंडळ औरंगाबाद जिल्हा प्रयोगशाळा परभणी यांचा चाचणी अहवाल घेण्यात आला आहे. चाचणी अहवालाची प्रत उपलब्ध आहे. संबंधित शाखा अभियंता यांनीमोजमाप पुस्तिकेत दिनांक नमूद केलेला आहे. सर्व मोजमाप पुस्तिका उपलब्ध आहेत.

जिल्हा परिषद प्रशासकीय व निवासी इमारतीच्या बांधकामासाठी शासनाकडून सन २०००-२००१ मध्ये मंजूरी प्राप्त झालेली होती. सदर प्राप्त मंजुरीनुसार प्रशासकीय इमारतीत बागबगीचा तयार करणे हे काम हाती घेण्यात आले होते संबंधित कामाचे कंत्राटदार यांनी काम पुर्ण न केल्यामुळे संबंधित कंत्राटदारास काळया यादीत टाकण्यात आले आहे व त्यास्थितीत कामाचे अंतिमीकरण करण्यात आलेले आहे.

यापुढे निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता (बांध.) यांचे स्वाक्षरी घेणेबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने दोन तिरकी रेषा मारल्या आहेत तसेच यापुढे दक्षता घेण्यात येत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जल संधारण विभाग निर्णय क्र. झेडपीए२०००/प्रक्र४०२३/३३, दिनांक १२ जानेवारी, २००१ मधील टीप-१ नुसार सदरील कामाच्या प्रशासकीय मान्यतेची व निविदा मंजुरीची माहिती स्थायी समिती विषय समितीच्या पुढील अवलोकनार्थ सादर केलेली नाही. तसेच मजूर सहकारी संस्थेला काम देण्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी अध्यक्ष कामवाटप समिती तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, हिंगोली यांना लिहिलेले पत्र संचिकेत नाही याचा खुलासा होणे आवश्यक आहे. यासंदर्भात आपण लेखी उत्तरामध्ये सांगितले आहे की, लेखा संहिता १९६८ चे नियम ४ प्रमाणे जिल्हा परिषदे अंतर्गत कामाच्या प्रशासकीय व निविदा मंजुरीची केलेल्या कार्यवाहीची माहिती पुढील स्थायी समिती/विषय समितीच्या बैठकीमध्ये अवलोकनार्थ सादर करण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे. प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रशासकीय मान्यता व निविदा मंजुरीची माहिती स्थायी समिती व

विषय समिती समोर का सादर केली नाही, कमी रकमेचे मुद्रांक पेपर घेण्यास कोण जबाबदार आहे, कंत्राटदाराकडून विमा रक्कम का कपात केली नाही, या अनियमिततेस कोण जबाबदार आहे, बांधकाम साहित्याची गुणवत्ता तपासणी का करण्यात आली नाही, मोजमाप पुस्तिकेत दिनांकित नोंदी का घेण्यात आल्या नाहीत, काम अपूर्ण अवस्थेत अंतिम करण्यात आले आहे, ही कार्यवाही कोणत्या प्राधिकारान्वये केली, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पहिल्या प्रश्नाबाबत खुलासा केला की, प्रशासकीय मान्यता व निविदा मंजुरीची माहिती स्थायी समिती व विषय समिती समोर सादर केली नसल्याचे दिसून आलेले आहे. याबाबत दक्षता घेण्यात येईल.

समितीने सदरहू माहिती समितीपुढे ठेवणे बंधनकारक असताना ही माहिती ठेवण्यात आलेली नाही. याला जबाबदार कोण आहे, ही बाब २००८ पर्यंत विषय समितीपुढे ठेवली होती काय, असा प्रश्न विचारला त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या-त्या समिती समोर निविदेची मान्यता आणि दर मान्यतेसाठी ठेवण्यात येत नाही. परंतु सर्व समित्यांचे प्रशासकीय ठराव घेतलेले आहेत. विभाग प्रमुखांकडून प्रशासकीय मान्यता घेऊन प्रत्यक्ष खरेदीची कार्यवाही झाल्यानंतर केलेल्या खरेदीचा दर आणि निविदा याबाबतची माहिती समिती पुढे ठेवली जाते. परंतु ही माहिती मिळविण्याकरिता त्या ठरावाचा संदर्भ देऊन प्रत्यक्ष झालेला खर्च त्या समिती समोर ठेवण्यात आलेला आहे. जवळपास सर्व विभागाकरिता अशी कार्यवाही झाल्याचे आपल्याला दिसून येईल असे उत्तर दिले.

समितीच्या मते ही बाब गंभीर होती तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मते ही बाब प्रत्यक्ष समितीसमोर ठेवली नाही. परंतु खर्च दाखवून अप्रत्यक्षपणे समिती समोर ठेवण्यात आलेली आहे.

अध्यक्ष काम वाटप समिती तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था हिंगोली यांच्या शिफारशीनुसार विविध मजूर सहकारी संस्थेला कामे देऊन सदरील कामावर रुपये १५ लाख २७ हजार ५७५ रुपये खर्च नोंदविला आहे, तसेच जिल्हा परिषद, हिंगोली नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम खर्चासाठी ४ कोटी ८१ लाख ९८ हजार रुपयांच्या रकमेस प्रशासनाने मान्यता दिलेली असून आतापर्यंत १५ लाख रुपये खर्च केले आहेत. जिल्हा परिषद हिंगोली येथील नवीन प्रशासकीय इमारतीचे काम अर्धवट असतानासुध्दा जिल्हा परिषदेने ४ कोटी ८१ लाख ही पूर्ण रक्कम देण्याचे कारण काय आहे, नवीन प्रशासकीय इमार तीची सद्यःस्थिती काय आहे याबाबत समितीने संबंधित अधिका-यांचा खुलासा मागितला. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारीयांनी स्पष्ट उत्तर न देता आता संबंधित ठेकेदारास धावते देयक ४ कोटी ८१ लाख रुपये दिले आहेत. पूर्वी १५ लाख २७ हजार रुपये संबंधीचा लेखापरीक्षणाचा आक्षेप होता असे समितीस सांगीतले. समितीने इमारतीचे बांधकाम, साहित्य, गुणवत्ता याची तपासणी केली आहे काय असे विचारले असता कार्यकारी अभियंता यांनी इमारतीच्या बांधकामाची गुणवत्ता तपासणी केली असून सन २००९ चा लेखी अहवाल उपलब्ध असल्याचे सांगितले.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट २४ मधील नियम १३ व १५ नुसार मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईन तिरकी रेष मारलेली नाही, हे खरे आहे काय या प्रश्नावर हे चुकीचे झालेले आहे हे मला मान्य आहे असे कार्यकारी अभियंता यांनी कबूल केले.

समितीने इमारत बांधकामाच्या निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्ष-या नाहीत, तसेच मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने तिरकी रेष मारलेली नाही. या प्रकरणी अधिका-यांचा निष्काळजीपणा दिसून येतो. या प्रकरणाची तपासणी करावी व संबंधित अधिका-यावर कडक कारवाई करावी आणि त्यांच्या सेवा पुस्तिकेत नोंद घेण्यात यावी असे निदेश दिले.

समितीच्या जिल्हा परिषद, हिंगोली येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी ४ कोटी ८१ लाख रुपये खर्च आला. या रकमेपेक्षा जास्त खर्च झाला आहे काय, या प्रश्नावर संबंधित अधिका-यांनी समितीला सध्या ही माहिती उपलब्ध नसल्याचे सांगितले असता समितीने त्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

सदरहू कामावर एकूण खर्च रुपये १४.३४ कोटी इतका झाला आहे. जिल्हा परिषद प्रशासकीय इमारतीला सन २००० मध्ये मंजूरी मिळाली होती. सन २००१ ते २०१२ पर्यंत निधी मिळाला. सन २०१३ मध्ये ४ कोटी रुपये मुख्य इमारतीसाठी मिळाले अशी माहिती समितीला मिळाल्यावर समितीने सन २००१ ते २०१२-१३ या कालावधीत इमारतीचे काम पूर्ण झालेले आहे. त्यामुळे या इमारतीची किंमत देखील वाढली हे मान्य करून या कामासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता घेतली आहे काय, असल्यास, त्यास कोणी मंजूरी दिली आहे, विहित मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे कंत्राटदारावर कारवाई केली होती काय, किती वर्षात हे काम पूर्ण करावयाचे होते व कंत्राटदारांनी किती वर्षामध्ये हे काम पूर्ण केली आहे, याबाबत माहिती विचारली परंतु या प्रश्नांवर समितीस उत्तरे प्राप्त झाली नाहीत त्यामुळे सदरहू प्रश्नावर अभ्यास करून उत्तर देण्याकरिता समितीने बैठक एक तास स्थगित केली.

श्री. शाम किवळेकर (तत्कालीन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली) यांच्या कार्यकाळात इमारतीचे काम पूर्ण झाले होते. इमारतीकरिता १४.३५ कोटी रुपये आवश्यक होते. त्यापैकी गोदाम बांधकाम, बैठक सभागृह, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थान, वर्ग-२, वर्ग-३ च्या कर्मचा-यांकरिता निवासी इमारत इत्यांदीवर १४.२९ कोटी रुपये खर्च झालेला असून ६ हजार रुपये जमा असल्याची माहिती समितीस देण्यात आली.

समितीने या कामाकरिता मुदतवाढ मागण्यात आली होती काय असे विचारले असता, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी यासंदर्भातील माहिती संध्याकाळ पर्यंत उपलब्ध करून देतो असे समितीस सांगितले.

समितीच्या मते जिल्हा परिषद नवीन प्रशासकीय इमारत परिसरात बाग बगीचा तयार करणे हे काम ठेकेदाराने विहित मुदतीत पूर्ण केलेले नाही, तसेच कामास मुदतवाढ मागितलेली नाही. काम आहे त्या स्थितीत अंतिम केल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे, सदरहू काम अपूर्ण असताना देखील पूर्ण कामाचे पैसे देण्यात आले. संबंधित ठेकेदाराला काम पूर्ण केले नसल्यामुळे काळ्या यादीत टाकण्यात आले, असे स्पष्टीकरणामध्ये दिलेले आहे, ही कारवाई योग्य आहे. परंतु आहे त्या स्थितीत कामाचे अंतिमीकरण करण्यात आलेले आहे, याचा अर्थ काय होतो आहे त्या स्थितीत कामाचे अंतिमीकरण करण्यात आले म्हणजे काय, या सर्व आरोपांवर समितीस उत्तर प्राप्त झाले नाही. लेखा परिक्षकांना दिलेला अनुपालन अहवाल पंचायती राज समितीला देखील दिला असून समितीने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे अहवालामध्ये जे स्पष्टीकरण अथवा उत्तर दिले आहे, तेच सांगितले गेले आहे. ठेकेदाराने काम केले काय, त्यांना काळ्या यादीत टाकले का, याचे उत्तर होय दिले. परंतु आहे त्या स्थितीत कामाचे अंतिमीकरण करण्यात आल्यामुळे संबंधितांवर कारवाई करणे आवश्यक होते असे मत समितीने व्यक्त केले.

ठेकेदाराने उप ठेकेदाराकडून काम करून घेतले आहे, हेही खरे आहे काय, असल्यास, त्यास परवानगी घेतली होती काय, असल्यास, सदरहू परवानगी कोणी दिली. सदरहू ठेकेदाराने विहित मुदतीत काम पूर्ण केले नसल्यामुळे त्याच्यावर दिवसाला ५-१० हजार रुपये दंडात्मक स्वरूपाची कारवाई केली होती काय, नसल्यास, आर्थिक स्वरूपाची कारवाई न करणा-या कार्यकारी अभियंत्यावर कारवाई करण्यात आली काय, या प्रश्नावर देखील समितीस उत्तरे प्राप्त झाली नाहीत.

समितीने अधिका-यांकडून योग्य उत्तर मिळत नाही. त्यांना अधिक नियम माहित असतात. त्यांनी दिलेले उत्तर पटण्यासारखे व योग्य नाही, हे बरोबर नाही असे मत नोंदवून प्रस्तृत प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निदेश दिले.

**यासंदर्भात समितीने २१ डिसेंबर, २०१५ रोजी विधानमंडळाच्या उभय सभागृहास आपला तिसरा अहवाल सादर केला. सदर अहवालात समितीने पुढीलप्रमाणे अभिप्राय व शिफारशी केल्या.—**

समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला भेट देऊन हिंगोली जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास जिल्हा परिषद हिंगोलीच्या नविन प्रशासकिय इमारत बांधकामास महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग निर्णय

क्र. एसीडी/१०९९/सीआर/२७३/२६, दिनांक १८-७-२००० द्वारे रुपये ४८१.९८ लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम यांनी वेगवेगळ्या अंदाजपत्रकास मान्यता प्रदान केली आहे. अध्यक्ष काम वाटप समिती तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, हिंगोली यांच्या शिफारशीनुसार विविध मंजूर सहकारी संस्थेला कामे देऊन सदरील कामावर रुपये १५,२७,५७५ एवढा खर्च नोंदविलेला असल्याप्रकरणी लेखा परिक्षकांनी नोंदविलेल्या आक्षेपावर जिल्हा परिषद, हिंगोली यांनी लेखा संहिता १९६८ चे कलम (४) अन्वये जिल्हा परिषद अंतर्गत कामाचे प्रशासकीय व निविदा प्रक्रिया कार्यवाहीची माहिती स्थायी समिती व विषय समितीच्या बैठकीमध्ये अवलोकनार्थ सादर करण्याची दक्षता घेण्यात येत असल्याचे समितीस विदित केले.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हिंगोली तथा कामवाटप समिती यांनी काम वाटप करुन कामाची यादी दिलेली आहे. को-या निविदा संचाची रक्कम चलनाद्वारे परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा, हिंगोली येथे भरणा करून घेऊनच निविदा पुस्तिका विक्री केली आहे. करारनाम्यातील कमी रकमेचे रुपये २७०० चे मुद्रांक खरेदी करून क्रॉस करून घेऊन संबंधितांकडून वसूली करण्यात आलेली आहे. धावते व अंतिम देयकातून १ टक्के रकमेवर विमा रक्कम शासन खाती जमा केली आहे. दक्षता व गुणनियंत्रक मंडळ, औरंगाबाद, जिल्हा प्रयोगशाळा, परभणी यांचा चाचणी अहवाल घेण्यात आला आहे. मोजमाप पुस्तिका उपलब्ध आहेत. यापुढे निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी घेण्याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. कंत्राटदाराने काम पूर्ण केले नसल्यामुळे काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. त्या स्थितीत कामाचे अंतिमीकरण करण्यात आले आहे. मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने दोन तिरक्या रेषा मारल्या असून यापूढे दक्षता घेण्यात येत आहे.

सदरहू प्रकरणी संबंधित कर्मचा-यांची चौकशी करून अहवाल सादर करण्याचा निदेश समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले होते. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी अहवाल समितीस सादर केला. उक्त चौकशी अहवालात सदरहू प्रकरणी प्रशासकीय मान्यता व निविदा मंजूरीची माहिती विषय समिती, स्थायी समितीच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर केलेली नाही. निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरी घेण्यात आल्या नाहीत, याबाबत तत्कालीन कार्यकारी अभियंता हे अंशतः दोषी आढळून आले व त्यांचे विरूद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ अन्वये प्रशासकीय कारवाई करण्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या कारवाईस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शविली आहे. तसेच प्रशासकीय इमारतीमधील बागबगीचा तयार करण्याच्या बाबतीत तो विहित मुदतीत पूर्ण केला नसल्यामुळे संबंधित दोषी कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात येऊन त्याचेवर रु. २०२०४ दंड वसूल करण्यात आला.

समिती, जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे. या प्रकरणी तत्कालीन कार्यकारी अभियंत्याच्या विरूद्ध सुरु असलेली विभागीय चौकशी तीन महिन्यात निकाली काढून कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, हिंगोली यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीप्रमाणे आहे.—**

मा. पंचायती राज समितीच्या निर्देशाप्रमाणे प्रकरणात जबाबदार तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री. श्याम किवळेकर यांचेवर प्रशासकीय कार्यवाहीचा प्रस्ताव बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली कार्यालयाचे पत्र दिनांक २९-१०-२०१५ अन्वये मा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशीक विभाग, औरंगाबाद यांना सादर करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे त्यांचेवर शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली असून प्रस्तूत विभागीय चौकशी तीन महिन्याचे आत निकाली काढणेबाबत मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना दिनांक २२-२-२०१६, दिनांक ९-११-२०१५, दिनांक १७-५-२०१६, दिनांक ११-७-२०१६ दिनांक १९-४-२०१७ च्या पत्रान्वये विनंती करून पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, हिंगोली यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे.—**

मा. पंचायती राज समितीच्या निर्देशाप्रमाणे जबाबदार तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री. श्याम किवळेकर यांचेवर प्रशासकीय कार्यवाहीचा प्रस्ताव बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली कार्यालयाचे पत्र दिनांक २९-१०-२०१५ अन्वये मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना सादर करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे त्यांचेवर शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली असून प्रस्तुत विभागीय चौकशी तीन महिन्याचे आत निकाली काढणे बाबत मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना दिनांक २२-२-२०१६, दिनांक ९-११-२०१५, दिनांक १७-५-२०१६, दिनांक ११-७-२०१६ दिनांक १९-४-२०१७ च्या पत्रान्वये विनंती करून पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे.—**

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय :**

सदर प्रकरणी शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. केवळ किरकोळ स्वरुपाच्या प्रशासकीय स्वरुपाच्या अनियमितता झालेल्या आहेत. श्री एस. पी. किवळेकर, तत्का. कार्यकारी अभियंता हे दि.३०/०६/२०१५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७(२) (बी) (एक) (दोन) मधील तरतूदी विचारात घेता हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २००८-०९व सन २००९-१०च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भातील पंचायती राज समितीच्या सन २०१५-१६च्या तिस-या अहवालात शिफारस केल्याप्रमाणे श्री किवळेकर यांच्याविरुध्द कोणतीही शिस्तभंग विषयक कार्यवाही करता येणे शक्य नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २००८-०९ व सन २००९-२०१० च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत पाचवा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १२ जून, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने अशी विचारणा केली की, समितीने तत्कालीन कार्यकारी अभियंता यांच्याविरुद्ध सुरु असलेली विभागीय चौकशी तीन महिन्यात निकाली काढण्याबाबत शिफारस केली होती. परंतु, ती चौकशी अद्यापही प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत तसेच संबंधितावर शिस्तभंगाची कारवाई करणे शक्य नाही काय, यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समितीस असे विदित केले की, मुख्य कार्यकारी अभियंता, जिल्हापरिषद, हिंगोली यांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक२९ ऑक्टोबर, २०१५ रोजी संबंधितावर प्रशासकीय स्वरुपाचे आरोप ठेवून कारवाई करावी असे कळविले होते. दरम्यानच्या कालावधीत दिनांक ३० जून, २०१५ रोजी म्हणजे ४ महिने अगोदर संबंधित अधिकारी सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतर त्यांच्यावर दोषारोपपत्र ठेवावयाचे असतील तर यामध्ये काही आर्थिक बाब आहे काय याची पडताळणी करण्यात आली. यामध्ये आर्थिक नुकसान झालेले नव्हते. दुसरे म्हणजे हे प्रकरण सन २००८-०९ मधील आहे. आपल्याला ४ वर्षाच्या आतील प्रकरण असेल तरच ॲक्शन घेता येते. त्यामुळे याप्रकरणी कार्यकारी अभियंता यांच्यावर ॲक्शन घेता आली नाही, दोषारोपपत्र दाखल करता आले नाही.

यावर समितीने अशी विचारणा केली की, हे त्या कालावधीत का करण्यात आले नाही, यावर सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समितीस असे विदित केले की, त्यांनी सन २००९-१० किंवा सन २०१०-११ मध्ये कळविले असते तर लगेच ॲक्शन घेता आली असती. तद्‌नंतर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती दिली की, समिती ज्या अधिका-यांविषयी चर्चा करीत आहेत त्यांच्या सेवानिवृत्तीच्या ४ वर्षापूर्वीचे हे प्रकरण आहे. हे प्रकरण सन २००८-०९ मधील आहे. ज्यावेळी समितीची भेट झाली त्यावेळी हे प्रकरण ४ वर्षापूर्वीचे होते. यामध्ये फायनान्शिअल अनियमितता नव्हती.

यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समितीस खुलासा केला की, फायनान्शिअल अनियमितता असती तर वेगळी ॲक्शन घेता आली असती. परंतु, फायनान्शिअल अनियमितता नसल्यामुळे काही करता येत नाही हे मी नम्रपणे समितीच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, त्यांनी भेटीच्या वेळीच सांगावयास पाहिजे होते की, असे करता येत नाही.

यावर समितीने अशी विचारणा केली की, त्यावेळी हे सांगितले नाही. त्यामुळे या सर्व गोष्टी पुढे आलेल्या आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद हिंगोलीच्या नविन प्रशासकीय इमारत बांधकामास रूपये ४८१.९८ लक्ष एवढी प्रशासकीय मान्यता ग्रामविकास व जलसंधारण विभागानी शासन निर्णय क्रमांक एसीडी/१०९९/सीआर/२७३/२६, दिनांक १८ जुले, २००० प्रदान करण्यात आली होती. सदरील बांधकामावर रूपये १५,२७,५७५ एवढा खर्च अध्यक्ष काम वाटप समिती तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, हिंगोली यांच्या शिफारशीनुसार विविध मजूर सहकारी संस्थेना कामे देऊन नोंदविलेला आहे.

सदरहू प्रकरणी प्रशासकीय मान्यता व निविदा मंजूरीची माहिती विषय समिती स्थायी समितीच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर केलेली नाही. निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरी घेण्यात आल्या नाहीत. पंचायती राज समितीच्या निर्देशाप्रमाणे प्रकरणात जबाबदार तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री.श्याम किवळेकर यांचेवर प्रशासकीय कार्यवाहीचा प्रस्ताव बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना विभागीय चौकशी तीन महिन्याच्या आत निकाली काढणे बाबत विनंती करण्यात आलेली आहे, त्यामुळे पुढे कोणतीही कार्यवाही न करता सदर प्रकरणी शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. **केवळ किरकोळ स्वरूपाच्या प्रशासकीय अनियमितता झाल्याच्या सबबी खाली श्री. एस. पी. किवळेकर, तत्कालीन कार्यकारी अभियंता हे दिनांक ३० जून, २०१५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे श्री. किवळेकर यांच्या विरूध्द कोणतीही शिस्त भंग विषयक कार्यवाही करता येणे शक्य नाही असे लेखी माहिती मध्ये नमूद करण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरण सन २००८-०९ मधील आहे. चार वर्षाच्या आतील प्रकरण नसल्यामुळे व आर्थिक अनियमितता झाली नसल्यामुळे कारवाई करण्यात आलेली नाही व दोषारोप पत्र दाखल करता आले नाही ही कृती हेतू पुरस्सरपणे तत्कालीन कार्यकारी अभियंता यांच्या संरक्षणासाठी जाणीव पूर्वक कारवाई करण्यास दिरंगाई केल्याचे दिसून येत आहे. सबब अशा प्रकारच्या अनियमितता भविष्यात पुन्हा घडू नयेत याकरीता सुयोग्य व्यवस्थापन व नियोजन करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद हिंगोली

## देखभाल दुरुस्तीमधुन हातपंप खरेदीवर केलेल्या खर्चाबाबत

**(परिच्छेद क्रमांक ३.५६२) (सन २००८-२००९)**

जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. हिंगोली सन २००८-०९ या वित्तीय वर्षात देखभाल दुरुस्तीमधून हातपंप खरेदीवर रुपये २९,७८,२९०/- खर्च केलेला आहे याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक पत्र क्र. झेडपीई/२००१/प्र.क्र.१३२/प.रा.०७ (२६), दिनांक ५ सप्टेंबर, २००२ नुसार दर करार अस्तित्वात नसताना निविदा बोलविण्यापूर्वी उद्योग संचालनालयाच्या मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून दर करार अस्तित्वात नसल्याबाबत लेखी स्वरुपात खात्री करण्याची कार्यवाही केलेली नाही.

(२) खरेदीपूर्वी वार्षिक गरज लक्षात घेवून वार्षिक एकत्रित खरेदीसाठी निविदा प्रसिध्द न करता रुपये ९,९२,८८०/- च्या खरेदीसाठी निविदा प्रसिध्दकरुन दर मागविले व त्याच दरावर पुन्हा खरेदी आदेश देऊन रुपये १९,८५,५६०/-ची खरेदी केलेली आहे.वार्षिक एकत्रित खरेदीसाठी निविदा मागविल्या असता तर जिल्हा परिषदेला स्पर्धात्मक दराचा फायदा मिळाला असता परंतू तशी कार्यवाही केलेली नाही.

(३) सदरील हात पंप हे टंचाई अंतर्गत खोदलेल्या विंधन विहिरी बसविण्यासाठी घेतले आहेत व देयकातून हात पंपाचे रक्कम कपात करुन देखभाल दुरुस्ती निधीत जमा दर्शविले आहेत. परंतू देखभाल दुरुस्तीमधून सदरील खर्च करण्याबाबत सक्षम अधिका-यांची मंजूरी घेतलेली नाही.

(४) टंचाई अंतर्गत मा. जिल्हाधिकारी यांनी १९४ विंधन विहिरींना मान्यता दिली पंरतु हातपंप खरेदी २१६ केली आहे. मान्यता व खरेदीमध्ये विसंगती आहे.

(५) टंचाई अंतर्गत किती विंधन विहिरींचे प्रत्यक्ष कामे झाली त्यापैकी किती ड्राय गेल्या किती विंधन विहिरी हातपंप बसविले याबाबतची माहिती लेखा परिक्षणात उपलब्ध झाली नाही. तसेच दिनांक ३१.३.२००९ अखेर ३१ हातपंप शिल्लक आढळून आले यावरुन आवश्यकतेपेक्षा जास्त खरेदीबाबत खात्री पटवावी.

(६) हातपंप खरेदी पोटी देखभाल दुरुस्ती निधीतून खर्च केलेली संपूर्ण रक्कम देखभाल दुरुस्ती निधीत जमा झाल्याबाबत खात्री पटवावी.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) डी.जी.एस. ॲन्ड डी च्या संकेत स्थळावर दर करार नसल्याची खात्री करुनच निविदा मागवून खरेदीची कार्यवाही करण्यात आलेली आहे. शिवाय खरेदी ही निविदा प्रक्रियाने केलेली आहे. सबब शासनाचे नुकसान झालेले नाही.

(२) रुपये ९,९२,८८०/- ची खरेदी ही सन २००८ च्या टंचाईसाठी निविदा मागवून करण्यात आलेली आहे. सदरील दर हे एक वर्षापर्यंत वैध असल्यामुळे उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-१०८८/(२५१२)/उद्योग ६ मंत्रालय, मुंबई, दि.२ जानेवारी, १९९२ परिच्छेद ७ मधील ५ नुसार मुळ आदेशातील संख्या आणि किंमत यापेक्षा पुनर्प्रत्ययी आदेश २०० % पर्यंत मर्यादित असावा असे आदेश असल्यामुळे सदर आदेशाच्या मर्यादेत रुपये १९,८५,५६०/- ची हात पंप संच खरेदी करणेत आलेली आहे.

(३) टंचाई अंतर्गत घेण्यात आलेल्या विंधन विहिरींवर हातपंप बसविण्यासाठी देखभाल दुरुस्ती निधीमधून हातपंप संच खरेदी करण्यासाठी टिप्पणी परिच्छेद ७, दिनांक ११/१२/२००८ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे. टिप्पणीची प्रत सोबत जोडली आहे.

(४) सन २००८ च्या टंचाईसाठी ७२ हात पंप संच खरेदी करण्यात आले होते. त्यापैकी ५१ हातपंप संच शिल्लक होते. सन २००९ च्या टंचाईमध्ये मा. जिल्हाधिकारी यांनी दिनांक १८/१२/२००८ अन्वये १९४ विंधन विहीरी घेण्यास मान्यता देण्यात आल्यामुळे शिल्लक हात पंप विचारात घेवून सन २००९ च्या टंचाईसाठी १४४ हातपंप संच खरेदी करण्यात आले आहेत. त्यामुळे मान्यता व खरेदी मध्ये कोणत्याही प्रकारची विसंगती नाही.

(५) जिल्हाधिकारी यांना टंचाई अंतर्गत मान्यता दिलेल्या १९४ विंधन विहीरीपैकी ३१ मार्च, २००९ अखेर १५३ विंधन विहीरी चे खोदकाम करण्यात आले. १५३ यशस्वी विंधन विहीरी वर हात पंप बसविण्यात आले. शिल्लक राहिलेल्या ४२ हातपंप संचाचा विनियोग पुढील वर्षाच्या टंचाई मध्ये करण्यात आलेला आहे.

ः६) हातपंप खरेदी पोटी देख भाल दुरुस्ती निधीमधून खर्च केलेली रक्कम देखभाल दुरुस्ती निधीमध्ये जमा केलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सामितीने मुख्यकार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. हिंगोली यांनी हात पंप दुरूस्तीवर रूपये २९,७८,२९०.०० इतका निधी खर्च केला आहे. सदर निधी खर्च करताना मूळ निविदेमध्ये समाविष्ट साहित्यापेक्षा जादा साहित्य खरेदी केले आहे. या जादा साहित्याची आवश्यकता होती काय, जादा साहित्याची आवश्यकता होती तर त्याचा विचार/समावेश निविदा काढतानाच का केला नाही, एकूण साहित्याची गरज कोणी व कशी निश्चित केली, यावर कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांनी समितीस असे सांगितले की, सन २००८ मध्ये उद्‌भवलेल्या टंचाईसाठी निविदा मागवून खरेदी करण्यात आलेली आहे. सदर दर हे एक वर्षापर्यंत वैध असल्यामुळे उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ७ मधील ५ नुसार पुनर्प्रत्ययी आदेश २०० टक्क्यांपर्यंत मर्यादित असावा असे नमूद केले असल्यामुळे हात पंप संच खरेदी करण्यात आले आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, दोन वेळा निधी खर्च केलेला आहे. सुरूवातीला रूपये ९,९२,८८०.०० इतका खर्च हातपंप खरेदीवर केला आहे व पुन्हा रूपये १९,८५,५६०.०० इतक्या रकमेची खरेदी केलेली आहे. टंचाई अंतर्गत जिल्हाधिका-यांनी १९४ विंधन विहिरींना मान्यता दिली होती. तथापि, २१६ हात पंप खरेदी केले आहेत. दुसरे असे की, हात पंप शिल्लक असताना देखील आवश्यकते पेक्षा जास्त हातपंप खरेदी केलेले आहेत. मागील वर्षाचे ५१ हातपंप शिल्लक असताना मंजूर विंधन विहिरी पेक्षा जास्तीचे हातपंप खरेदी करण्याचे प्रयोजन काय होते, हा जो अनावश्यक जादा खर्च झाला आहे त्यास कोण जबाबदार आहे. शासनाने दिनांक १०.१०.२००८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून त्याप्रमाणे रिपीट ऑर्डर देता येत नाही. पूर्णपणाने नियमबाह्य खरेदी केलेली आहे. शासनाने उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हा शासननिर्णय निर्गमित केला आहे. यावर कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी उत्तर दिले की, शासन निर्णयानुसार संख्या आणि किंमत यापेक्षा पुनर्प्रत्ययी आदेश २०० टक्कांपर्यंत असावा असे नमूद केले असल्यामुळे खरेदी करण्यात आलेली आहे.

समितीच्या मते प्रस्तुत प्रकरणी नियमबाहय खरेदी झाली आहे व समितीच्या मताशी कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा सहमत झाल्यामुळे समितीने तत्कालीन अधिका-यांस चौकशी करुन नियमानुसार कार्यवाही करावी व त्यासंबंधीचा अहवाल समितीस सादर करावा असे निदेश दिले.

तसेच जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने जिल्हा परिषद देखभाल दुरूस्ती अंतर्गत कृती आराखडा वेळेवर सादर करून देखील आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला मंजुरी घेऊन त्याची अंमलबजावणी पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता, श्री. यंबडवार यांनी केलेली नाही, अशी सभापती, शिक्षण यांनी समितीकडे तक्रार केलेली असल्याचे नमूद केल्यावर कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांनी खुलासा केला की, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरूस्तीबाबत सुधारित मार्गदर्शक सूचनांचा शासन निर्णय दिनांक १७.१०.२०१४ (परिशिष्ट२.१) रोजी निर्गमित झाला आहे. सर्व जिल्ह्यातील नळयोजना बंद होत्या,त्यामुळे त्यांची देखभाल दुरूस्ती करणे आवश्यक होते म्हणून त्याचा आराखडा तयार करण्यात आला व तो दिनांक ४ डिसेंबर २०१४ रोजी जलव्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आला. ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल दुरूस्तीकरिता अवलंबवावयाची कार्यपद्धती दिनांक १७ ऑक्टोबर २०१० च्या शासन निर्णयात नमूद केली असून त्यानुसार कार्यवाही केलेली आहे.

**यासंदर्भात समितीने २१ डिसेंबर, २०१५ रोजी विधानमंडळाच्या उभय सभागृहास आपला तिसरा अहवाल सादर केला. सदर अहवालात समितीने पुढीलप्रमाणे अभिप्राय व शिफारशी केल्या :-**

जिल्हापरिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद हिंगोली सन २००८-०९ या वित्तीय वर्षात देखभाल दुरुस्तीमधून हातपंप खरेदीवर रुपये २९,७८,२९०/-खर्च केलेला आहे. याप्रकरणी दर करार नसताना निविदा बोलविण्यापूर्वी उद्योग संचालनाल-याच्या मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून दर करार अस्तित्वात नसल्याबाबत लेखीस्वरुपात खात्री करण्याची कार्यवाही न

करणे, स्पर्धक निविदा न मागविणे, देखभाल दुरुस्तीमधून खर्च करण्यास सक्षम अधिका-यांची मंजुरी न घेणे, मा. जिल्हाधिकारी यांनी १९४ विंधन विहिरींना मान्यता दिली असताना केवळ २१६ हातपंपाची खरेदी केल्यामुळे मान्यता व खरेदीमध्ये विसंगती असून लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणे इत्यादीबाबत लेखा परिक्षणात आक्षेप आले होते व त्याबाबतचा खुलासा करताना जिल्हापरिषदेने या प्रकरणी शासनाचे नुकसान झालेले नाही अशी माहिती समितीला पाठविली.

मुख्यकार्यकारी अधिका-यांची साक्ष घेत असताना निधी खर्च करताना मूळ निविदे मध्ये समाविष्ट साहित्या पेक्षा जादा साहित्य खरेदी केले आहे. सदरच्या जादा साहित्याची आवश्यकता होती काय आणि त्यानुसार निविदा काढताना त्याचा समावेश का केला नाही, याबाबत कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस सांगितले की, सन २००८ मध्ये उद्‌भवलेल्या पाणी टंचाईसाठी निविदा मागवून खरेदी करण्यात आलेली आहे. सदर दर हे एक वर्षांपर्यंत वैध असल्यामुळे उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ७ मधील ५ नुसार पुनर्प्रत्ययी आदेश २०० टक्क्यांपर्यंत मर्यादित असावा असे नमूद केले असल्यामुळे हातपंप संच खरेदी करण्यात आले आहेत. समितीने या प्रकरणी सर्वंकष चौकशी करुन वस्तुस्थिती दर्शक कार्यवाही अहवाल समितीला सादर करण्याचे मुख्यकार्यकारी अधिकारी यांना निदेश दिले होते. त्यानुसार मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करुन चौकशी अहवाल समितीला पाठविला असता उक्त चौकशी अहवालात कोणीही दोषी आढळून आल्याचे दिसून आले नाही. तथापि, परिच्छेदात दर्शविण्यात आलेली रक्कम रु.३५४/-संबंधितांकडून दिनांक २३.६.२०१५ रोजी वसूल करुन शासन खाती चलनाद्वारे भरण्यात आलेली आहे. तथापि, संबंधित शाखा अभियंता ,श्री. एस.जी.पदमणे यांचा खुलासा अंशतः समाधानकारक असल्यामुळे त्यांची वेतनवाढ एक वर्षासाठी थोपविण्यात आलेली आहे. तसेच शासनाने केलेल्या कार्यवाहीत याप्रकरणी जबाबदार असणा-या तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री. श्याम किवळेकर यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमान्वये प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकामप्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे असे नमूद आहे. सदर चौकशी अहवालास शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने सहमती दर्शविली आहे.

समितीला लेखी स्वरुपात चौकशी अहवालात पाठविलेल्या माहितीत एकीकडे याप्रकरणात कोणीही दोषी आढळून आले नाही असा अभिप्राय व्यक्त करणे आणि दुसरी कडे अधिका-यांवर कार्यवाही प्रस्तावित करणेही बाब समितीला निर्णय घेण्यास अडचणीची ठरत आहे. समिती कोणत्याही निरपराध व्यक्ती वर कार्यवाही व्हावी यासाठी आग्रही नाही. तथापि, दोषी असणा-या अधिका-यांवर मात्र कार्यवाही होणे आवश्यक आहे असे समितीचे ठाम मत आहे. त्यामुळे या प्रकरणी सर्व संबंधित अधिकारी खरोखरच दोषी आहेत किंवा नाही याची पुन्हा चौकशी करुन निश्चित स्वरुपाची कार्यवाही करुन संबंधित अधिकारी दोषी असल्यास त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी आणि याप्रकरणी काही ही अनियमितता आढळली नसेल तर नाहक कार्यवाही न करता तसे स्पष्टपणे चौकशीत नमूद करावे आणि खरोखर दोषी किंवा निर्दोषत्व यापैकी एक निर्णय घेऊन संबंधितांवर कार्यवाही करावी व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, हिंगोली यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

मा.पंचायती राज समितीच्या निर्देशानुसार प्रकरणात पुनःश्च एकदा फेरचौकशी करण्यात आली व त्यामध्ये पुढील बाबी निदर्शनास आल्या.

(१) पाणी टंचाई २००८ करीता नविन विंधन विहिरी घेण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी त्यांचे पत्र क्रमांक२००८/पा.ट./कावि-४० दिनांक २८/०१/२००८ अन्वये एकूण २५३ विंधन विहिरी घेण्यास प्रशासकीय मंजुरी दिली आहे. सन २००८ च्या टंचाई अंतर्गत घेण्यात आलेल्या विंधन विहिरीवर हातपंप उभारणीसाठी विभागाकडे हातपंप शिल्लक नव्हते. हातपंप खरेदीचा दर करार सुध्दा उपलबध नव्हता. म्हणुन विभागाने टंचाई अंतर्गत निधी उपलब्ध नसल्यामुळे देखभाल दुरुस्ती निधी मधुन हातपंप संच खरेदी करण्यासाठी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक जिपहिं/ग्रापापु/कावि/१२४७/०८, दिनांक ०९/०५/२००८ अन्वये व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१चे कलम १२५ नुसार रुपये ९,९२,८८०/- एवढया खर्चास प्रशासकीय मंजुरी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर हातपंप संच खरेदी करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिर निवीदाप्रसिध्द करण्यासाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेवून दिनांक १२/०५/२००८ ते २६/०५/२००८ या

कालावधीत दैनिक लोकपत्र व दैनिक सुपर समाचार या वृत्तपत्रात हातपंप संच खरेदी करण्यासाठी जाहीर निविदा प्रसिध्द केली. प्राप्त निविदेनुसार हातपंप संचाचे दर प्रतीनग १३,७९०/- निश्चीत करुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली यांचे पुरवठा आदेश क्र.जिपहिं/ग्रापापु/भांडार/कावि/१४६४/०८ दिनांक ११/०६/२००८ अन्वयेसन २००८ च्या टंचाईसाठी ७२ हातपंप संच रुपये ९,९२,८८०/- चे खरेदी केल्याचे दिसुन आले.

(२) सन २००९ च्या टंचाई करीता मा. जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र. २००८/पा.टं./कावि-४०२००८ दि. १८/१२/२००८ अन्वये १९४ नविन विंधन विहिरी घेण्यास प्रशासकीय मंजुरी दिली आहे.

(३) सन २००९ च्या टंचाई आराखडयात १९४ नविन विहीरी प्रस्तावित असल्यामुळे सदर विंधन विहीरीवर हातपंप उभारणीसाठी विभागाकडे ५१ हातपंप संच शिल्लक होते, ही बाब विचारात घेवुन सन २००९ च्या टंचाईसाठी १४४ हातपंप संच खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१चे कलम १२५ अन्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश दि. १५/१२/२००८ नुसार १९८५७६०/- एवढया खर्चास देखभाल दुरुस्ती अंतर्गत प्रशासकीय मंजुरी घेण्यात आलेली आहे.

वरील बाबी हया फेरचौकशी अहवालामध्ये आढळुन आलेल्या आहेत व त्यानुसार उक्त खरेदीमध्ये कोणत्याही प्रकारची नियमबाहयता झालेली नसल्याचे फेरचौकशीत निष्पन्न झाले आहे. तसेच खरेदीमध्ये तत्कालीन कोणतेही अधिकारी/कर्मचारी दोषी आढळुन आलेले नाहीत. सबब कोणत्याही अधिकारी/ कर्मचारी यांचे विरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही. सदर अहवाल दिनांक २४/०८/२०१६ अन्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात आलेला आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-**

हातपंप संच खरेदीवर जास्तीचा खर्च झालेला नाही आणि हातपंप खरेदी मध्ये अनियमितता झालेली नाही. त्यामुळे संबंधित अधिका-यांवर कोणती ही कार्यवाही केलेली नाही.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २००८-०९ व सन २००९-२०१० च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत पाचवा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १२ जून, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने अशी विचारणा केली की, समितीने फेर चौकशी करावयास सांगितले होते. परंतु, आपण फेर चौकशी मध्ये अनियमितता झालेली नाही, असे नमूद केलेले आहे. ही बाब सत्य आहे काय, यावर उप सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस असा खुलासा केला की, सन २००८ व २ ००९ या दोन वर्षात एकूण २१६ हातपंप खरेदी करण्यात आले होते. सन २००८ मध्ये २५३ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी २१ योजनापूर्ण झाल्या असून २१ हातपंप बसविण्यात आले. सन २००८-०९ मध्ये ७२ हातपंप विकत घेण्यात आले होते. त्यापैकी २१ हांतपंप बसविण्यात आले व ५१ हातपंप शिल्लक होते. सन २००९-१० मध्ये १९४ योजनांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती. त्यापैकी केवळ १४४ हातपंप विकत घेण्यात आले. अगोदरच्या वर्षातील ५१ व पुढील वर्षातील १४४ असे १९४ हातपंप पुढील वर्षी बसविण्यात आले. सन २००८-०९ व २००९-१० मध्ये एकूण ४४७ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. परंतु, दोन वर्षात केवळ २१५ हातपंप बसविण्यात आले.

यावर समितीने अशी विचारणा केली की, ही कामे टंचाईमधून मंजूर झाली होती. हातपंप बसविणे, पेटी लावणे यासहकामे मंजूर होतात. मग देखभाल दुरुस्ती मधून हातपंप कसे काय बसविण्यात आले? यासाठी कोणत्या अधिका-याची मंजुरी घेण्यात आली होती? यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केलेकी, लेखी माहिती मध्ये जिल्हाधिकारी यांची मंजुरी घेण्यात आल्याचे नमूद केले आहे. परंतू ३१५ हेड अंतर्गत खर्चक रण्यात आलेला आहे. ३१५ हे हेड जिल्हापरिषदे कडे आहे.

टंचाईचा निधी वेळच्या वेळी प्राप्त झालेला नसल्यामुळे देखभाल दुरुस्तीचा निधी वापरण्यात आलेला आहे अशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली असता समितीने अशी विचारणा केली की, त्यासाठी कोणाची मंजुरी घेण्यात

आली होती? यावर मुख्य कार्यकारी अधिकारीयांनी समितीस माहिती दिली की, मुख्य कार्यकारी अधिका-यांची मंजुरी घेण्यात आली होती.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिका-यांना मंजुरी देण्याचे अधिकार आहेत काय? ३१५ हे देखभाल दुरुस्तीचे हेड आहे. जिल्हापरिषदेच्या उत्पन्नातून पाणीपुरवठ्यासाठी २० टक्के निधी दिला जातो. जिल्हापरिषदेच्या सर्व साधारण सभेने त्या हेड मधून पैसे खर्च करण्याचे अधिकार दिले होते काय? आपण टंचाईमधून मंजुरी घेतलेली आहे. मग त्याकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शासन व जिल्हाधिकारी यांची आहे.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, त्यांनी टंचाईमधून हे काम मंजूर करुन घेतल्याचे दिसते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्या हेडचे पैसे उपलब्ध नव्हते. म्हणून जिल्हापरिषदेने पैसे दिले. परंतु, त्यासाठी जिल्हापरिषदेच्या जनरलबॉडीची परवानगी घ्यावयास पाहिजे.यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, शासनाकडून वेळेवर पैसेन आल्यामुळे त्यांनी जिल्हा परिषदेचा निधी खर्च केला. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हापरिषदेच्या मंजुरी शिवाय त्या हेडचे पैसे कसे काय खर्च करु शकता? आपण टंचाईसाठी जिल्हापरिषदेच्या खात्यातून पैसे विथ्ड्रॉ केलेले आहेत.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केलेकी, या कामासाठी टंचाईमधून पैसे मंजूर झाले होते. परंतु, ते पैसे वेळेवर प्राप्त झाले नाहीत. म्हणून जिल्हापरिषदेने आपल्या बजेट मधून पैसे खर्च केले आणि शासनाकडून पैसे प्राप्त झाल्यानंतर त्याचे समायोजन केले. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, तात्पुरत्या स्वरुपात असले तरी तुम्ही त्या हेडमधून या कामावर पैसेखर्च करण्यापूर्वी जनरलबॉडीची परवानगी घेतली होती काय किंवा त्यांना इन्फॉर्म केलेहोते काय? शासनाकडून वेळेवर पैसे प्राप्त झाले नाहीत. म्हणून जिल्हापरिषदेने आपल्या बजेट मधून तात्पुरत्या स्वरुपात पैसे खर्च केले आणि शासनाकडून पैसे प्राप्त झाल्या नंतर त्याचे समायोजन केले.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, याबाबत जिल्हापरिषदेच्या सर्व साधारण सभेला अवगत करण्यात आलेले नाही. शासनाकडून पैसे प्राप्त झाल्यानंतर सुद्धा त्यांना माहिती देण्यात आलेली नाही. प्रथम पैसे खर्च केले आणि पैसे प्राप्त झाल्यानंतर पुन्हा ते त्या हेडमध्ये जमा केले.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, त्यांनी जिल्हापरिषदेच्या कन्सॉलिटेडेड फंडातून तात्पुरत्या स्वरुपात पैसे काढून ते टंचाईच्या कामावर खर्च केले असले तरी त्यांनी जनरलबॉडीला अवगत करणे क्रम प्राप्त होते.

यावर समितीने अशी सुचना केली की, वास्तविक पाहता सचिव महोदयांनी याबाबी सर्व मुख्यकार्यकारी अधिका-यांच्या निदर्शनास आणून दिल्या पाहिजेत. प्रत्येक ठिकाणी अशा घटना घडतात. समितीने या विषयावर वित्त सचिवांची साक्ष घ्यावयास पाहिजे. मुख्य लेखा व वित्त अधिका-यांना विषय समित्यांचा कन्सेंटन घेता केवळ मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या ऑर्डने पैसे विथ्ड्रॉ करण्याचे अधिकार आहेत काय?

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, विभाग या संदर्भात एक परिपत्रक निर्गमित करेल. शासनाकडून पैसे प्राप्त होणार आहेत याची खात्री आहे. कारण, शासनाने त्यासाठी परवानगी दिलेली आहे. परंतु, पैसे प्राप्त होण्यासाठी वेळ लागत असेल तर टंचाईचा विषय असल्यामुळे इमर्जन्सी मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पैसे खर्च करण्याची वेळ आली तर जिल्हापरिषदेला अवगत करणे किंवा कार्योत्तर मंजुरी घेणे क्रम प्राप्त आहे. संबंधित अधिका-यांनी तसे करणे आवश्यक आहे. जिल्हापरिषदेच्या निधीचा कशाप्रकारे वापर होत आहे याची जनरलबॉडीला माहिती असली पाहिजे.

विभागाने त्या संदर्भातील परिपत्रक काढून राज्यातील सर्व जिल्हापरिषदांना त्याची प्रत पाठवावी असे समितीने निदेश दिले तसेच यासंदर्भात गाईडलाईन ठरली पाहिजे. सचिव महोदय आपण या चौकशीमुळे समाधानी आहात काय अशी विचारणा केली असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केलेकी, या मध्ये फायनान्शिअल प्रोसेस वगळली तर इतर काही अडचण नाही. सन्माननीय सदस्यांनी फायनान्शिअल प्रोसिजर संदर्भातील लॅप्सेस आमच्या निदर्शनास आणून दिलेले आहेत. हे पुन्हा होऊ नये यासाठी एक परिपत्रक काढतो. परंतु, यामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार किंवा लॅप्स दिसून येत नाही. त्यांनी हे चांगल्या हेतूने केले होते. परंतु, त्यांनी जनरलबॉडीलावि विश्वासात घ्यावयास पाहिजे होते.

यावर समितीने अशी सुचना केली की, जिल्हापरिषदेचे पदाधिकारी कॅशबुक बघत नाहीत. बीडीएस वरुन किती पैसे काढण्यात आले, हे पदाधिकारी बघतात काय? सर्वसाधारण सभेत जी माहिती दिली जाते त्यावर पदाधिकारी विश्वास ठेवतात.

जिल्हापरिषदेचा निधी खर्च करताना त्यासाठी विषय समित्यांची मंजुरी घेतलेली आहे काय, बिलेबरोबर आहेत काय, कागदपत्रे जोडलेली आहेत काय या सर्वबाबी तपासल्याशिवाय मुख्य लेखा व वित्त अधिकारी पैसे विथ्ड्रॉ करु शकत नाहीत.

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हापरिषद, हिंगोली अंतर्गत सन २००८-०९ या वित्तिय वर्षात देखभाल दुरूस्तीमधून हात पंप खरेदीवर रूपये २९,७८,२९०/-एवढा खर्च केलेला आहे. हात पंप खरेदीसाठी निधी खर्च करतांना मुळ निविदेमध्ये समाविष्ट साहि त्यापेक्षा जादा साहित्य खरेदी केले आहे. या प्रकरणी संबंधित शाखा अभियंता श्री. एस. जी. पदमणे यांचा खुलासा अंशतः समाधनकारक असल्यामुळे श्री. पदमणे यांची वेतन वाढ एक वर्षासाठी थोपविण्यात आलेली आहे. तसेच तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री. श्याम किवळेकर यांच्या विरूध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांच्याकडे सादर करण्यात आलेला असताना फेरचौकशी मध्ये मात्र हातपंप साहित्य खरेदीमध्ये कोणत्याही प्रकारची नियमबाहय झालेली नसल्याचे तत्कालीन कोणतेही अधिकारी / कर्मचारी दोषी आढळून आलेले नाहीत. या सबबी खाली कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांचेविरूध्द कारवाई न करणे हा विरोधाभास समितीस दिसून आला आहे.

विभागीय सचिवांसमवेत झालेल्या साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, सन २००८-०९ मध्ये ७२ हातपंप विकत घेण्यात आले होते. त्यापैकी २१ हातपंप बसविण्यात आले ५१ हातपंप शिल्लक होते सन २००९-१० मध्ये १९४ योजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली होती. त्यापैकी केवळ १४४ हात पंप विकत घेण्यात आले. अगोदरच्या वर्षातील ५१ व पुढील वर्षातील १४४ असे एकूण १९४ हात पंप पुढील वर्षी बसविण्यात आले. सन २००८-०९ व सन २००९-१० मध्ये एकूण ४४७ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि दोन वर्षात केवळ २१५ हात पंप बसविण्यात आले. ३१५ हे शीर्ष देखभाल दुरूस्ती करीता जिल्हापरिषदेकडे आहे सदर शीर्षाचे पैसे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या परवानगीने उपलब्ध होऊ शकतात. तथापि, जिल्हापरिषदेच्या मंजुरी शिवाय याशिर्षाखालील रक्कम खर्च करण्यात आलेली असल्याचे दिसून येते. शासनाकडून पैसे प्राप्त झाल्यानंतर जरी सदर रक्कमेचे समायोजन केले असले तरी जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या परवानगी विना व सर्वसाधारण सभेला विश्वासात घेऊन ठराव न करता परस्पर खर्च केलेला असल्याचे दिसून येते.

समितीच्या भेटीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी या सर्व गोष्टी निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे होत्या, त्यामुळे समिती या प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करते, या नियमांची एक प्रकारे पायमल्ली झालेली आहे. जिल्हापरिषदेचे पदाधिकारी बीडीएस वरून काढण्यात आलेली रक्कम पाहत नाहीत, सर्वसाधारण सभेमध्ये अधिका-यामार्फत जी माहिती दिली जाते ती ग्राहय समजून परवानगी दिली जाते. विषय समितीची मंजुरी घेतलेली आहे काय, देयके बरोबर आहेत किंवा कसे या सर्व बाबी तपासल्या विना मुख्य लेखा व वित्त अधिकारी रक्कम निष्काषित करू शकत नाहीत. सबब, असे प्रकार राज्यातील जिल्हापरिषदांमध्ये वारंवार होऊ नयेत याकरीता ग्रामविकास विभागाने एक परिपत्रक काढून राज्यातील सर्व जिल्हापरिषदांना निर्गमित करावे अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, पुणे

## शालेय पोषण आहार अनुदान वाटप

**परिच्छेद क्रमांक ३.७९ (सन२००८-२००९)**

पंचायत समिती, भोर यांनी शालेय पोषण आहार योजनेत रक्कम रु. ४,५१,९८८/-इतका जादा खर्च केलेला आहे. याबाबत लेखा परिक्षकांनी खालीलप्रमाणे आक्षेप दिले आहेत.

शालेय पोषण आहार योजनेतुन पंचायत समिती भोर यांनी इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी प्राप्त रक्कम रुपये ४७,७६,०००/- असताना खर्च रुपये ६५,०७,३५१/- करुन जादा खर्च रक्कम रुपये- १७,३१,३५१/- केला आहे. त्याची मागणी नाही. तसेच इ. ६वी ते ८वी चे विदयार्थीकरीता प्राप्त अनुदान रक्कम रुपये १८,१७,०००/- असताना खर्च रक्कम रुपये २२,६८,९८८/- करुन जादा खर्च रुपये ४,५१,९८८/- केला आहे. तसेच पंचायत समिती मुळशी यांची सदर अनुदानाची मागणी नसताना अनुक्रमे रक्कम रुपये ४७,५७,०००/- व रुपये २१,१३,०००/- एकुण रु. ६८,७०,०००/- इतकी रक्कम वर्ग केली होती त्यापैकी रक्कम रु.५९,२०,६५७/- खर्च करुन शिल्लक रक्कम रुपये ९,४९,३४३/- परत केलेली नाही. तरी पंचायत समिती भोर यांनी जादा खर्च कोणत्या निधीतुन केला? तसेच रक्कम शासनाकडे भरणा केल्याचे दाखवावे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.**

याबाबत सादर करण्यात येते की या कार्यालयाने सन २००८-०९ मध्ये मागणी प्रमाणे सुधारित अनुदान भोर व मुळशी यांना अदा केले आहे. खालील प्रमाणे अनुदान मागणी, वितरण व खर्चाची माहिती देणेत येत आहे.

**सन २००८-०९ पंचायत समिती भोर**

| **इयत्ता** | **मागणी** | **अनुदान वितरण ज्ञापन क्र. ४** | **अनुदान वितरण ज्ञापन क्र. ५** | **खर्च अनुदान** |
|---|---|---|---|---|
| १-५ | ६५३५८५४ | ४७७६००० | ६५०८००० | ६५०७३५१ |
| इयत्ता | मागणी | अनुदान वितरण ज्ञापन क्र. ३ | अनुदान वितरण ज्ञापन क्र. ४ | खर्च अनुदान |
| ६-८ | ३०७७४२५ | १८१७००० | २२६९००० | २२६८९८८ |
| एकूण १ ते ८ | ९६१३२७९ | ६५९३००० | ८७७७००० | ८७७६३३९ |

सन२००८-०९मध्ये भोर तालुक्यात इयत्ता १ली ते ५वी करीता या कार्यालयाचे दि. ३१/३/२००९ रोजीचे अनुदान वितरणाचे ज्ञापन क्र. ४ अन्वये रक्कम रुपये ४७,७६,०००/- इतके अनुदान वितरीत केले होते. तथापि गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती भोर यांच्या पत्र जा.क्र./२०३/ दि.३०/०३/२००९ अन्वये अनुदान मागणी करण्यात आल्याने या कार्यालयाचे सुधारीत अनुदान वितरणाचे ज्ञापन क्र. ५अन्वये इयत्ता १ली ते ५वी साठी रक्कम रुपये ६५,०८,०००/- इतके अनुदान वितरीत केले आहे. त्यानुसार त्यांनी रक्कम रुपये ६५,०७,३५१/- इतका खर्च केला आहे. तसेच इयत्ता ६वी ते ८वी करीता या कार्यालयाचे दि. ३१/३/२००९ रोजीचे अनुदान वितरणाचे ज्ञापन क्र. ३ अन्वये रक्कम रुपये १८,१७,०००/- इतके अनुदान वितरीत केले होते.

तथापि, या कार्यालयाचे सुधारीत अनुदान वितरणाचे ज्ञापन क्र. ४ अन्वये इ. ६वी ते ८वी साठी रक्कम रुपये २२,६९,०००/- इतके अनुदान वितरीत केले आहे. त्यानुसार त्यांनी रक्कम रुपये २२,६८,९८८/- इतका खर्च केला आहे. सन २००८-०९ मध्ये भोर तालुक्यासाठी इ.१ली ते ५वी व इ. ६वी ते ८वी करीता एकूण अनुदान मागणी रक्कम रु.९६,१३,२७९/- असून एकूण प्राप्त रक्कम रु. ८७,७७,०००/- आहे व त्यापैकी एकूण खर्च रक्कम रु. ८७,७६,३३९/- आहे. त्यामुळे अनुदान वितरणापेक्षा जादा खर्च झालेला नाही.

## सन २००८-०९ पंचायत समिती मुळशी

| इयत्ता | मागणी | वितरीत अनुदान | खर्च अनुदान | शिल्लकअनुदान |
|---|---|---|---|---|
| १-५ | ५५,२९,५५०/- | ४७,५७,०००/- | ४६,६२,१८७ /- | ९४,८१३/- |
| ६-८ | २२,०३,५२५/- | २१,१३,०००/- | १२,५८,४७० /- | ८,५४,५३०/- |
| **एकूण** | **७७,३३,०७५/-** | **६८,७०,०००/-** | **५९,२०,६५७/-** | **९,४९,३४३/-** |

सन २००८-०९ मध्ये मुळशी तालुक्यासाठी इयत्ता १ली ते ५वी करीता रुपये ५५,२९,५५०/- एवढी मागणी असून, इयत्ता ६वी ते ८वी करीता रक्कम रुपये २२,०३,५२५/- एवढी मागणी आहे. मुळशी तालुक्याची एकूण मागणी रक्कम रुपये ७७,३३,०२५/- एवढी असून एकूण वितरीत अनुदान रक्कम रुपये६८,७०,०००/- एवढे आहे. एकूण खर्च रक्कम रुपये ५९,२०,६५७/- इतका असून एकूण शिल्लक रक्कम रुपये ९,४९,३४३/- एवढी आहे.

सन २००८-०९या आर्थिक वर्षामध्ये पुणे जिल्ह्यात ३१मार्च, २००९ अखेर शिल्लक रकमेचा अर्थ विभागाशी ताळमेळ घेऊन रक्कम रुपये १,७६,३७,५५८/- दिनांक ३ फेब्रुवारी, २०१२ रोजी चलनाने शासनास भरणा केलेली आहे. चलनाची प्रत नस्तीस उपलब्ध आहे. पुणे जिल्ह्यामध्ये सन २००८-०९ या कालावधीत एकूण प्राप्त रक्कमे पेक्षा जादा खर्च झालेला नाही.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

पुणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती, भोर यांनी शालेय पोषण आहारासाठी प्राप्त तरतुदी पेक्षा जादा खर्च कोणत्या निधीतून केला, विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात अनुदानाची मागणी करण्यात येते. शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या पट संख्येच्या तुलनेत ८० टक्के उपस्थिती असेल तर तेवढा खर्च व्हावयास हवा होता. २० टक्के विद्यार्थी उपस्थित नसतील तर तेवढ्या रकमेची बचत व्हावयास हवी होती. जादाखर्च होण्याची कारणे काय आहेत, पंचायत समिती, मुळशी कडील अखर्चित रक्कम शासनास केव्हा भरणा केली, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस उत्तर दिले की, पंचायत समिती, भोर व मुळशी यांच्या एकूण निधीच्या मागणी प्रमाणे त्यांना निधी देण्यात आला होता. भोर तालुक्याची मागणी रू. ६५,३५,८५४/- होती, पहिली ते पाचवी व सहावी ते आठवी अशा २ प्रकारच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार पुरविला जातो. पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना रू. ६५,३५,८५४/- इतक्या रकमेची मागणी होती, अनुदान क्रमांक ४ अन्वये रू. ४७,७६,०००/- अनुदान दिले, अनुदान वितरण ज्ञापन क्रमांक ५ अन्वये अंतिम सुधारित करून रू. ६५,०७,३५१/- अनुदान त्यांना दिले. इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी प्राप्त झालेल्या अनुदाना पैकी रुपये ६५,०७,३५१/- खर्च करण्यात आला आहे. इयत्ता सहावी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी रुपये ३०,७७,४२५/- रुपयांची मागणी करण्यात आली होती. अनुदान वितरण ज्ञापन क्रमांक-३ नुसार रुपये१८,१७,०००/- रुपये व अनुदान वितरण ज्ञापन क्रमांक-४ नुसार रुपये २२,६९,०००/- अनुदान प्राप्त झाले होते. यामध्ये सुधारित अनुदान वितरित केले आहे. इयत्ता सहावी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारावर प्रत्यक्ष खर्च रुपये २२,६८,९८८/- खर्च झाला आहे. इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारासाठी रुपये ९६,१३,२७९/- रुपयांची मागणी करण्यात आली होती. परंतु अंतिम सुधारित अनुदान रुपये८७,७७,०००/- प्राप्त होते. प्रत्यक्ष खर्च मात्र रुपये ८७,७६,३३९/- झाला आहे. यामध्ये जादा खर्च झालेला नाही. मागणी नुसारच खर्च झालेला आहे. शालेय पोषण आहारापोटी करण्यात आलेली मागणी आणि प्रत्यक्षात झालेला खर्च यामध्ये तफावत असल्याबाबतचा परिच्छेद लेखा परीक्षणात काढण्यात आला होता. इयत्ता पहिली ते पाचवी साठी रुपये ४७,७६,०००/- अनुदान वितरित करण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात ६५,०७,३५१/- रुपयांचे अनुदान दिले होते आणि तेवढा खर्च झालेला आहे. लेखा परीक्षणात असा मुद्दा काढला होता की, ४७,७६,०००/- रुपयांच्या मागणीच्या तुलनेत ६५,०७,३५१/- रुपये खर्च केला आहे. या मुद्याच्या अनुषंगाने आमचे उत्तर असे आहे की, इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी आमचे सुधारित अंदाज ६५ लाख रुपयांचे होते.

समितीच्या निदर्शनास आले की, त्यावेळी अतिरिक्त अनुदानाची मागणी करण्यात आलेली नव्हती. त्यावर आर्थिक वर्ष संपण्याच्या दिवशी शेवटची मागणी केल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले असता समितीने मागणी पत्र दाखविण्याची किंवा त्या संदर्भातील कागदपत्रे दाखवावित अशी सूचना केली. परंतु जिल्हा परिषदेच्या अधिका-यांकडून कोणतेही मागणीपत्र समितीस सादर करण्यात आले नाही किंवा दाखविण्यात आले नाही. तसेच सुरुवातीलाच ६५ लाख रुपयांची मागणी का करण्यात आली नाही असे विचारले असता, त्यावर मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या कडून समितीस उत्तर प्राप्त झाले नाही.

अहवाल वर्षात मुळशी तालुक्यासाठी इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारासाठी एकूण रु. ७७,३३,०७५/- इतक्या रकमेची मागणी करण्यात आली होती. परंतु यातील रु. ९,४९,३४३/- इतकी रक्कम शिल्लक राहिली. एका बाजूला भोर पंचायत समितीला जादा मागणी करावी लागली आणि दुस-या बाजूला मुळशी पंचायत समितीने मागणी केलेल्या रकमेपैकी जवळजवळ ९.५ लाख रुपये शिल्लक राहिले. यावर समितीने अशी विचारणा केली की, मुळशी पंचायत समितीने शालेय पोषण आहारासाठी जादा रकमेची मागणी का केली, समितीच्या मते भोर पंचायतसमिती मध्ये २१ लाख रुपये जादा खर्च होतो आणि मुळशी पंचायत समितीमध्ये प्राप्त अनुदाना पैकी ९.४९ लाख रुपये शिल्लक राहतात. याचा अर्थ जिल्हा परिषदेने योग्यप्रकारे नियोजन करुन मागणी केली नव्हती काय, याप्रश्नावर देखील समितीस उत्तर प्राप्त झाले नाही.

मुळशी पंचायत समितीने त्यांच्याकडे शिल्लक असलेली रक्कम दि. ०३.०२.२०१२ रोजी शासनाकडे चलनाद्वारे जमा केली असल्याचे मुख्य कार्यकारी अधिका-यांनी समितीस सांगितले.

सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील ही रक्कम तीन वर्षा पेक्षा अधिक काळ जिल्हापरिषदे कडे पडून राहिली असल्यामुळे याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणी चौकशी करुन एक महिन्याच्या कालावधीमध्ये समिती समोर अहवाल सादर करावा असे निदेश समितीने दिले.

**यासंदर्भात समितीने २१ डिसेंबर, २०१५ रोजी विधानमंडळाच्या उभय सभागृहास आपला पाचवा अहवाल सादर केला. सदर अहवालात समितीने पुढीलप्रमाणे अभिप्राय व शिफारशी केल्या :-**

समितीने दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी पूणे जिल्हा परिषदेला भेट देवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. उक्त साक्षीत परिच्छेद क्र. ३७९ शालेय पोषण आहार योजनेतून पंचायत समिती भोर यांनी प्राप्त तरतूदी पेक्षा जादा खर्च रु. १७,३१,३५१/- व रु. ४,५१,९८८/- केलेला असणे तसेच पंचायत समिती, मुळशी यांना मागणी नसताना रु. ६८,७०,०००/- इतका खर्च केला असताना त्या पैकी रक्कम रु. ५९,२०,६५७/-खर्च करुन शिल्लक रक्कम रुपये ९,४९,३४३/- परत केलेला नसणे याबाबत समितीने मागणीपत्र अवलोकनार्थ मागितले असता ती मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे साक्षीच्या वेळी प्राप्त झाली नसल्यामुळे सदर प्रकरणी चौकशी करुन समितीला अहवाल सादर करण्याचे निदेश दिले.

समितीने निदेश दिल्यानुसार या प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल तपासणी करिता समिती नियुक्त केली. सदर समितीमध्ये श्रीमती स्नेहल पाटील, लेखाधिकारी व श्री. कुलकर्णी, सहाय्यक लेखाधिकारी हे अधिकारी होते. या समितीने लेखा विषयक तपासणी केली असता पंचायत समिती भोर येथे उपलब्ध अभिलेखानुसार अनुदानापेक्षा जास्त खर्च झालेला नाही असे दिसून आले. तसेच पंचायत समिती, मुळशी कडील उपलब्ध अभिलेखा नुसार खर्च कमी झालेचे दिसून आले. चौकशी समिती च्या अहवालानुसार सर्व सबंधित शिक्षणाधिकारी, लेखाधिकारी अधिक्षक, शालेय पोषण आहार,गट शिक्षणाधिकारी व सहायक लेखा, सहाय्यक लेखाधिकारी,यांचेवर कारवाई प्रस्तुत करण्यात येऊ नये असे शिक्षणाधिकारी यांनी प्रस्तावित केले. विभाग प्रमुखांनी संबंधीत कर्मचा-यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केलेला असला तरी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यावर मुख्य लेखाधिकारी व जिल्हा अधिकारी यांचे मार्फत पूर्ण तपासणी केली. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी (१) सदरहू प्रकरणी जादाच्या मागणीपत्रावर कोणत्याही प्रकारचा आवक/शिक्का/दिनांक नसल्याने मागणी त्याच कालावधीत केली याची खात्री करता येत नाही. २) मुळशी तालुक्याच्या बाबतीत अखर्चित रक्कम ९,४९,३४४/- शासनास भरणा केल्या बाबतचा तपशील विभागाने उपलब्ध करुन दिलेला नाही, असे अभिप्राय व्यक्त केल्यावरुन मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी संबंधित अधिका-यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. समितीच्या निदेशानुसार करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अभिप्राय हे एकमेकांशी विसंगत असल्याची बाब उक्त अधिका-यांच्या शिस्तभंगाच्या कारवाई मध्ये अडथळा उत्पन्न करु शकते. शिक्षणाधिका-यांनी आपल्या विभागातील अधिका-यांना पाठीशी घातले असले तरी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाही बाबत समिती समाधान व्यक्त करते. सर्व संबंधितांवर सुरु केलेली शिस्तभंगाची कारवाई तातडीने पूर्ण करुन सदरचे प्रकरण तीन महिन्यात निकाली काढण्यात यावे व त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात अवगत करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

शालेय पोषण आहार योजनेमध्ये विद्यार्थ्यांना निकृष्ट आहार मिळत असणे. मुदत बाहय मालाचा पुरवठा केला जाणे. धान्याला कीड लागलेले असणे अशा बाबी समितीच्या निदर्शनास आल्या. विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान शालेय पोषण आहार योजनेतील निविदा प्रक्रिया जिल्हानिहाय करणे, डायरेक्ट कॅशट्रान्सफर करणे, वितरण व्यवस्थे मध्ये गुणवत्त नियंत्राणाची

व्यवस्था करणे, धान्यातील घटकांची जिल्हावार प्रयोगशळांमधून तपासणीकरुन घेणे, अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे असे समितीचे ठाम मत झाले आहे. शालेय पोषण आहार योजनेबाबत गटस्तरावर डायरेक्ट कॅश ट्रान्सफर तसेच उर्वरीत शाळांसाठी जिल्हा पातळीवरील निविदा प्रक्रिया अवलंबविण्याच्या शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी. वितरण व्यवस्थे मध्ये मालाची गुणवत्ता राखण्यासाठी जिल्हावार प्रयोगशाळांमधून नियमित तपासण्या करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र घेणे अनिवार्य करावे अशी शिफारस समिती करीत आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-**

सदर प्रकरणी लेखाधिकारी, सहा. लेखाधिकारी व वरिष्ठ सहायक लेखा यांची चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आली. चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार भोर व मुळशी तालुक्यात अनुदानापेक्षा जास्त खर्च झालेचे दिसून आले नाही, असे नमूद केले आहे.

तथापि, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी तपासले प्रमाणे ज्ञापन क्र.५ आदेश वितरित करताना कोणत्याही प्रकारची टिपणी अर्थ विभागामार्फत न पाठवता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी न घेता शिक्षणाधिकारी यांनी मुख्यालय स्तरा वरील रुपये १३५.१० लक्ष अनुदानातून रुपये १७.३२ लक्ष इतके अनुदान भोर तालुक्यास वितरीत केले आहे. तसेच, जादाच्या मागणी पत्रावर कोणत्याही प्रकारचा आवक शिक्का नसल्याने मागणी त्याच कालावधीत केली याची खात्री करता येत नाही असे आक्षेप दिले आहे.

१) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे यांचे कडीलजोड पत्र जा.क्र. शिक्षण/प्राथ/ रा.प.आ./६८४/२०१५दि.०५/११/२०१५ अन्वये तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद, पुणे यांचा शिस्तभंगाची कारवाई करणे बाबतचा प्रस्ताव आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आयुक्त (शिक्षण) यांच्यामार्फत तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद, पुणे यांना दिनांक १७/०२/२०१६ च्या ज्ञापनाव्दारे सक्त ताकीत देण्यात आलेली आहे.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, पुणे यांचेकडील जोडपत्र जा.क्र. शिक्षण/प्राथ/रा.प.आ./६८७/२०१५, दि. ०५/११/२०१५ अन्वये तत्कालीन शालेय पोषणआहार, जिल्हापरिषद, पुणे यांचा शिस्तभंगाची कारवाई करणेबाबतचा प्रस्ताव मा. संचालक लेखा व कोषागारे नवीन प्रशासकीय कुटीर क्र. १५, १६ प्लॅट क्र. १७६ फ्रिप्रेस जनरल मार्ग मुंबई, यांचेकडे सादर करणेत आला आहे. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद पुणे यांचेकडील पत्र क्रमांक शिक्षण/प्राथ/रापआ/४२५/२०१७ दि. २२/०६/२०१७अन्वये पुन्हा प्रस्ताव सादर केला आहे. लेखा व कोषागारे, मुंबई या कार्यालयाकडून दिनांक २६/०२/२०१८च्या पत्रान्वये`तत्कालीन लेखाधिकारी यांच्या खुलाश्यासह इतर त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनाकळविण्यात आले आहे. या अनुषंगाने तत्कालिन लेखा अधिकारीयांना दिनांक ०४/०३/२०१८च्या पत्रान्वये पत्र मिळाल्यापासून ४ दिवसांच्या आत खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तथापि, अद्यापपर्यंत खुलासा अप्राप्त आहे.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे कडील जोड पत्र जा.क्र. शिक्षण/प्राथ/रा.प.आ./६८८/२०१५, दि.०५/११/२०१५अन्वये तत्कालीन लिपिक यांना जोड पत्र १ ते ३ सह ज्ञापन देण्यात आले असून संबंधिताचा खुलासा प्राप्त आहे. सदरचा खुलासा पाहता संबंधित लिपिक यांनी सदर आदेशामध्ये माझी कोठेही स्वाक्षरी नाही असे स्पष्टीकरण दिले आहे. समक्ष तोंडी म्हणणे मांडण्यासाठी संधी दिली असता व सदर वितरण नस्ती अवलोकन केले असता कोठेही स्वाक्षरी आढळून आली नाही. सदर १ ते ५ चे ज्ञापन क्र. ५ व ६ ते ८ चे ज्ञापन क्र. ४ त्यांचे अपरोक्ष झाले आहेत. त्याचप्रमाणे लेखाधिकारी श्रीमती पाटील यांचे अहवालात सदर प्रकरणात गैरव्यवहार झालेला नाही असे स्पष्ट होत आहे. त्यामुळे श्रीमती नायकोडी कनिष्ठ सहायक यांचे विरोधात शास्ती करण्याची आवश्यकता नाही.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे.**

**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग :-**

शालेय पोषण आहार योजनेतंर्गत जिल्हा स्तरावरुन शाळा स्तरावर निधी वितरणाच्या विलंबाचा परिणाम आहाराच्या गुणवत्तेवर होतो. सदर विलंब टाळण्यासाठी शिक्षण आयुक्त यांनी दिनांक ०३/११/२०१६ च्या परिपत्रकान्वये सर्व जिल्ह्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना इंधन-भाजीपाला अनुदान आणि स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे मानधन थेट जिल्हा स्तरावरून शाळास्तरावर RTGS द्वारे करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने सध्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे मानधन आणि इंधन व भाजीपालासाठीचा निधी जिल्हा स्तरावरुन थेट संबंधितांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच, सन २०१८-१९ पासून इंधन व भाजीपाला यासाठीचा निधी आणि नागरी भागातील शाळांना देण्यात येणारा अन्न शिजविण्याच्या खर्चाचा निधी प्राथमिक शिक्षण संचालनालया स्तरावरुन थेट शाळा व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ०२/०४/२०१८ च्या पत्रान्वये घेतला आहे. यामुळे प्रत्येक जिल्ह्यात एकाच वेळी इंधन व भाजीपाला यासाठीचा निधी जलद गतीने वितरीत करणे शक्य होणार नाही.

तसेच, निधी वितरण Public Financial Managament (PFMS) प्रणालीद्वारे होणार असल्याने याबाबत होणा-या विलंबावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे.

शालेय पोषण आहार योजनेतंर्गत तांदुळाची वाहतूक व ग्रामीण भागात धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी पुरवठेदार नियुक्ती सन २०१६-१७ या वर्षापासून जिल्हानिहाय ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

योजनेबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार दररोज दोन पालकांनी शाळेत उपस्थित राहून शालेय पोषण आहाराच्या दर्जाबाबत पाहणी करुन चव घ्यावी व त्याची नोंद चव रजिस्टरवर घेण्यात यावी, अशी तरतुद आहे.

तसेच, शालेय पोषण आहार योजनेतंर्गत पुरविण्यात येणा-या अन्नाचा दर्जा शासन मान्य प्रयोगशाळेतून तपासून घेण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेच्या सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत पाचवा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने अशी विचारणा केली की, शिक्षणाधिका-यांनी आपल्या विभागातील अधिका-यांना पाठीशी घातले असले तरी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत समिती समाधान व्यक्त करते. सर्व संबंधितांवर सुरु केलेली शिस्तभंगाची कारवाई तातडीने पूर्ण करुन सदरचे प्रकरण तीन महिन्यात निकाली काढण्यात यावे व त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात अवगत करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे. शालेय पोषण आहार योजनेबाबत गट स्तरावर तसेच उर्वरित शाळांसाठी जिल्हा पातळीवर निविदा प्रक्रिया अवलंबिण्याच्या शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी. वितरण व्यवस्थेमध्ये मालाची गुणवत्ता राखण्यासाठी जिल्हावार प्रयोगशाळा मधून नियमित तपासण्या करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र घेणे अनिवार्य करावे, अशी शिफारस समितीने केली होती. याबाबतची वस्तुस्थिती कृपया समिती समोर नमूद करावी.

यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, शिक्षण विभागाशी संबंधित कार्यवाही सुरु झालली आहे.

तद्नंतर समितीने पुढे अशी विचारणा केली की, महाराष्ट्रामध्ये शालेय पोषण आहाराच्या संदर्भात अन्नधान्याचा पुरवठा केला जातो. धान्य शिजवून मुलांना दिले जाते, परंतु आलेल्या साहित्याचे टेस्टींग प्रयोगशाळेमध्ये केले जाते का? गुणवत्तेच्या संदर्भात महाराष्ट्रामध्ये शालेय पोषण आहारामध्ये पुरविण्यात येणारे धान्य चांगल्या क्वॉलिटीचे, उत्तम दर्जाचे पुरविले जात नाही. सॅम्पल दाखविताना वेगळे दाखविले जाते आणि मालाचा पुरवठा वेगळा केला जातो. अतिशय निकृष्ट दर्जाचा धान्य पुरवठा केला जातो. अशा स्वरुपाची माहिती महाराष्ट्रात वर्तमान पत्रात छापून आलेली आहे. औरंगाबाद, पुणे, अमरावती येथील प्रयोगशाळेमध्ये आलेल्या धान्याचे सॅम्पल टेस्टींग केले जाते का? ज्या सॅम्पलची तपासणी केली जाते तोच पुरवठा केला जातो की वेगळ्या

प्रकारचा धान्य पुरवठा केला जातो? जिल्हास्तरावर शिक्षकापर्यंत जो साहित्य पुरवठा केला जातो तो वेगळ्या क्वॉलिटीचा केला जातो का, हे पाहिले जात नाही. धान्याची ५० किलोची बॅग असेल तर त्या बॅगमध्ये ३० किलो, ४० किलोच धान्य आढळून येते. अशा स्वरुपाच्या बातम्या वर्तमान पत्रात छापून येतात. कमी वजनाचा होत असलेला धान्य पुरवठा तपासण्यासाठी एखादी वेगळी यंत्रणा आपल्या विभागाने डेव्हलप केली आहे का?

यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, जो पुरवठाधारक असतो त्याच्या गाडीतून आलेल्या मालाची तपासणी व्हायला पाहिजे. प्रयोगशाळेमध्ये सॅम्पल टेस्टींग झाल्यानंतर ज्या लोकांनी सर्टिफॉय केले त्याची सही केली जाते की नाही हे मला पहावे लागेल. समितीनेपुढे अशी विचारणा केली की, शाळेच्या शिक्षकापर्यंत, मुख्याध्यापकापर्यंत अशी व्यवस्था असायला पाहिजे. डाळ, तांदुळ, मिरची या धान्याचे सॅम्पल टेस्टिंग होते आणि पुरवठा धारक सर्टिफॉय करतो, परंतु त्या धान्याची टेस्टिंग केलेले आहे हे शिक्षक सांगू शकत नाहीत. यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, धान्याचा जो पुरवठा केला जातो त्याचे सॅम्पल घेतले जात नाही. गट विकास अधिकारी, गट शिक्षणाधिकारी हे सॅम्पलमधून खालच्या स्तरावर धान्य पाठवितात.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, टेंडर मंजुरीच्या वेळी जे सॅम्पल दाखविल्या जाते तेच टेंडर मंजुर होते. प्रत्येक पुरवठ्या नंतर पुन्हा सॅम्पलची तपासणी न होता पुरवठा धारकाला पेमेंट दिले जाते. टेंडरच्या वेळी सॅम्पल पाहिल्याशिवाय टेंडर मंजूरच होत नाही. परंतु त्यानंतर कॉस्ट वाढते. टेंडरच्या वेळीच धान्याचे टेस्टिंग होते, परंतु त्यानंतर पुरवठा झालेल्या धान्यामध्ये खडे, अळ्या आढळून येतात. अशा स्वरुपाच्या बातम्या वर्तमान पत्रात छापून येतात. समिती जेव्हा दौरे करते तेव्हा अनेक ठिकाणी निकृष्ट स्वरुपाचे धान्य समितीला आढळून आलेले आहे. यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस खुलासा केला की, सॅम्पल टेस्टिंग हे मुख्याध्यापकांच्या सहीने होत नाही. बीडीओंकडून सॅम्पल टेस्टिंग करुन धान्याचा पुरवठा शाळेला केला जातो.

समितीने पुढे अशी विचारणा केली की शाळेमध्ये आलेल्या धान्याचे सॅम्पल टेस्टिंग केले पाहिजे आणि त्यानंतरच ते विद्यार्थ्यांना दिले पाहिजे, परंतु असे का होत नाही? चांगल्या क्वॉलिटीचा माल त्या मुलांना मिळाला पाहिजे, असा संदेश जनतेमध्ये गेला पाहिजे. तसेच समितीने अशी सूचना केली की, सचिवांनी काही शाळांना भेटी देऊन या धान्याची तपासणी करणे आवश्यक आहे. काही शाळांमध्ये धान्य ठेवलेल्या ठिकाणी उंदीर फिरताना आपल्याला दिसतात. इतकी वाईट अवस्था आपल्याला कोठेच पहायला मिळत नाही. शालेय पोषण आहारात जो धान्य पुरवठा केला जातो त्या प्रत्येक बॅगमध्ये १० किलो धान्य हे कमी दिले जाते आणि पैसे मात्र पूर्ण ५० किलोचे दिले जातात. महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये वजनकाटे नसतात. शाळेमधील मुख्याध्यापकांना विचारले की, वजनकाटा कोठे आहे तर ते सांगतात की, पुरवठाधारकांच्या गाडीमध्ये जो काटा होता त्यावरुनच आम्ही माल स्वीकारला, परंतु याची पुन्हा खात्री केली जात नाही. म्हणून प्रत्येक शाळेमध्ये वजनकाटा असला पाहिजे. आपल्या गाडीतच असलेल्या वजनकाट्यावर मुल्यमापन करुन धान्य स्वीकारल्या जाते. ते चांगल्या क्वॉलिटीचे आहे की नाही, यासाठी राज्य सरकारने तसे आदेश संबंधिताना दिले पाहिजे. मालाची गुणवत्ता तपासण्याच्या संदर्भात यंत्रणेच्या माध्यमातून तजवीज केली पाहिजे, याबाबत आपण कृपया काळजी घ्यावी. मुख्याध्यापक जेव्हा या ५० किलोच्या गोण्या स्वीकारतात त्यामध्ये दहा किलो, वीस किलो धान्य कमी असते. वेळीच पुरवठाधारकांकडून त्याची मोजणी करणे आवश्यक आहे.

यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, प्रत्येक शाळेमध्ये वजनकाटा असायला पाहिजे. धान्याचे आपल्या काट्यावर वजनकरुनच ते स्वीकारले पाहिजे. त्या धान्याचा दर्जा चांगला आहे की नाही हे तपासण्याची व्यवस्था असायला पाहिजे. जर धान्य चांगले नसेल तर मुख्याध्यापकांना रिजेक्ट करण्याचा अधिकार आहे. या विषयासंबंधी योग्य पध्दतीने कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे असे समितीने निर्देशित केले.

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हा परिषद पुणे, अंतर्गत शालेय पोषण आहार वाटप योजनेमध्ये पंचायत समिती, भोर यांनी इयत्ता १ली ते ५ वीच्या विदयार्थ्यांसाठी रुपये ६५,०७,३५१/- इतका खर्च करण्यात आला आहे. इयत्ता सहावी ते आठवीपर्यंतच्या विदयार्थ्यांसाठी ३०,७७,४२५/ -रुपयांची मागणी करण्यात आली होती. इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारासाठी रुपये ९६,१३,२७९/- मागणी करण्यात आली होती, पंरतु अंतिम सुधारित अनुदान रुपये ८७,७७,०००/- प्राप्त होणे, प्रत्यक्ष खर्च मात्र रुपये ८७,७६,३३९/- झाला आहे. यामध्ये जादा खर्च झालेला नाही, इयत्ता पहिली ते पाचवीसाठी रु. ४७,७६,०००/- अनुदान वितरीत करण्यात आले होते परंतु प्रत्यक्षात ६५,०७,३५१/- रुपये अनुदान दिले होते आणि तेवढा खर्च झालेला आहे. लेखा परिक्षणामध्ये असा आक्षेप घेण्यात आला होता की, ४७,७६,०००/- रुपयांच्या मागणीच्या तुलनेत ६५,०७,३५१/- रुपये खर्च केला आहे. रुपये ६५ लाख

सुधारित अंदाज होते. तथापि, जिल्हा परिषदेच्या अधिका-यांकडून कोणतेही मागणी पत्र समितीस सादर करण्यात आले नाही किंवा दाखविण्यात आले नाही तसेच सुरुवातीलाच ६५ लाख रुपये मागणी का करण्यात आली नाही याचे उत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून प्राप्त झाले नाही.

पंचायत समिती, मुळशी यांना इयत्ता पहिली ते आठवीच्या विदयार्थ्यांच्या शालेय पोषण आहारासाठी एकूण ७७,३३,०७५/- मागणी करण्यात आली होती, त्यातील ९,४९,३४३/- इतकी रक्कम शिल्लक का राहिली याचे उत्तर समितीस प्राप्त झाले नाही व ही रक्कम ३ वर्षापेक्षा अधिक काळ जिल्हा परिषदेकडे पडून राहिली.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी तत्कालिन शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांचा शिस्तभंगाची कारवाई करणेबाबतचा प्रस्ताव आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने शिक्षणाधिका-यांना (प्राथ.) ज्ञापनाद्वारे सक्त ताकिद देण्यात आलेली आहे. तसेच लेखाधिकारी, शालेय पोषण आहार जिल्हा परिषद, पुणे यांचा शिस्तभंगाची कारवाई करणेबाबतचा प्रस्ताव मा. संचालक लेखा व कोषागारे, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला आहे. तथापि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी लेखाधिकारी यांचे अहवालात सदर प्रकरणात गैरव्यवहार झालेला नाही असे स्पष्ट होत असल्याने शास्ती करण्याची आवश्यकता नाही असे नमूद केलेले आहे.

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत निधी वितरणाचा विलंब टाळण्यासाठी शिक्षण आयुक्त यांनी दिनांक ३/११/२०१६च्या परिपत्रकान्वये सर्व जिल्हयाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना इंधन भाजीपाला अनुदान आणि स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे मानधन आणि इंधन व भाजीपाल्याचा निधी जिल्हास्तरावरुन थेट संबंधितांच्या बँकेत जमा करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सन २०१८-१९ पासून इंधन भाजीपाला या साठीचा निधी आणि नागरी भागातील शाळांना देण्यात येतात. अन्न शिजविण्याच्या खर्चाचा निधी प्राथमिक शिक्षण संचालनालयस्तरावरुन थेट शाळा व्यवस्थापकाच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय शासनाने दि. २/४/२०१८च्या पत्रान्वये घेतला आहे. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तांदळाची वाहतूक व ग्रामीण भागात धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी पुरवठेदार नियुक्ती सन २०१६-१७ पासून जिल्हानिहाय ई-निविदा प्रारुप राबविण्यात आली आहे.

उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीबाबत समिती समाधान व्यक्त करते, तथापि सर्व संबंधितांविरुध्द सुरु केलेली शिस्तभंगाची कारवाई तातडीने पूर्ण करुन सदरचे प्रकरण तीन महिन्यात निकाली काढण्यात यावे. याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

शालेय पोषण आहार योजनेबाबत गटस्तरावर तसेच उर्वरित शाळांसाठी जिल्हा पातळीवर निविदा प्रक्रिया अवलंबविण्याच्या शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेऊन अमंलबजावणी करावी. वितरण व्यवस्थेमध्ये मालाची गुणवत्ता राखण्यासाठी जिल्हावार प्रयोग शाळांमधून नियमित तपासण्याकरुन त्याबाबतचे प्रमाणपत्र घेणे अनिवार्यकरणे संदर्भात वस्तुस्थिती समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी.

**शालेय पोषण आहाराच्या संदर्भात अन्नधान्याचा पुरवठा केला जातो. शालेय विदयार्थ्यांना धान्य शिजवून दिले जाते त्याची चाचणी प्रयोगशाळेमध्ये करण्यात यावी. शालेय पोषण आहारासाठी पुरविण्यात येणारे धान्य चांगल्या गुणवत्तेचे, उत्तम दर्जाचे असावे, धान्य/तांदळाची पोती देयकामध्ये दर्शविल्या वजनाप्रमाणे असावी त्याअनुषंगाने सर्व संबंधितांना आणखी कडक स्वरुपाच्या सुचना देण्यात याव्यात. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, पुणे

## ग्राम पंचायतीतील गैरव्यवहाराची प्रकरणे

### (१) पंचायत समिती शिरुर येथील ग्रामनिधीतील संशयित अपहार (परिच्छेद क्रमांक ३.१०४०) (२००८-०९)

पंचायत समिती शिरुर ग्राम निधीतील १४ ग्रामपंचायतीकडील संशयित अपहार सन १९८५-८६ ते २००५-०६ या कालावधीतील रु. ४,३८,८९९.२१ आहे. यापैकी रु. २,४५,७४५/-वसुल झालेली आहे. उर्वरीत रु. १,९३,१५४.२२ सबंधित ग्रामसेवकाकडून वसुल करण्याबाबत ठोस कार्यवाही करुन शासनाची संशयित अपहारामध्ये गुंतलेली रक्कम वसुल करुन शासन सदरी जमा करुन पुर्तता लेखा परीक्षणास दाखवावी.

जवाहर रोजगार योजना निधीतील ६ ग्रामपंचायतीतील संशयित अपहार सन १९८९-९० ते २००१-०२ या कालावधीतील रु.६,५८,४८२/- आहे. यापैकी रु.९,२००/- वसुल झालेली असुन उर्वरीत अपहाराची रक्कम सबंधित ग्रामसेवक /सरपंच यांचे कडुन वसुल करण्याबाबत कार्यवाही करुन वसुल रक्कम शासन सदरी जमा करुन पुर्तता लेखा परीक्षणास दाखवावी.

उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.

पंचायत समिती शिरुर यांची एकुण १४ प्रकरणे प्रलंबित होती. सदर प्रकरणांची पुर्तता केलेली असून रक्कम रू. १,९३,१५४.२२ संबंधित ग्रामसेवकांकडून वसूल करणेत आली असून त्याची कागदपत्रे उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | ग्रामपंचायतीचे नाव | वसूल केलेली रककम |
|---|---|---|
| १ | बाबुळसर बु. | १,३७,८९९ |
| २ | केंदूर | ८,७२० |
| ३ | पिंपळेजगताप | १५,४२० |
| ४ | केंदूर | २१,५५५ |
| ५ | खंडाळे | १०,६४५ |
| | एकूण . . | १,९४,२३९ |

जवाहर योजना निधीतील संशयित अपहाराची रक्कम रू. ६,४९,२८२/- पैकी रू. ५,६५,१९०.५०/- रक्कम समायोजित करणेत आली आहे. उर्वरीत रक्कम रु. ८८,३४०.५०/- समायोजन व वसूल करणेची कार्यवाही चालू आहे. (सदर कालावधीतील ग्रामसेवक, श्री. आर. एस. जगताप हे मयत असून त्याचे कुटुंबियांकडून रक्कम वसूल करणेची कार्यवाही चालू आहे.)

**(२) पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (परिच्छेद क्रमांक ४.३५२ (२) (२००८-०९). सदरहू परिच्छेदातील पंचायत समिती निहाय प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत.**

**(१) पंचायत समिती हवेली:-** पंचायत समिती हवेली लेखा परिक्षण सन २००८-२००९ या कालावधीत पंचायत समिती अधिपत्याखालील ग्रामपंचायती मध्ये झालेल्या अपहार प्रकरणाची माहिती घेताना पंचायत समिती कडे एकुण १०१ ग्रा.पं. असुन त्यातील सदर वर्षात ८ ग्राम पंचायतमध्ये अफरातफर झाल्याची दिसुन येते तर या वर्षाचे पूर्वीचे २३ प्रकरणे आहेत. वित्तीय वर्षात एकही प्रकरणे निकाली काढलेले नाही. सदरची बाब गंभीर स्वरुपाची असून अफरातफर प्रकरणाकडे पंचायत समिती चे दुर्लक्ष दिसते. सदरच्या प्रकरणामध्ये गुंतलेली रक्कम लेख्या बाहेर आहे. तरी सदर प्रकरणाबाबत जातीने लक्ष्य घालुन प्रकरणे निकाली

काढणेबबात दक्षता घेण्यात यावी प्रकरणाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पं.स. | मागील प्रलंबित प्रकरण व गुंतलेली रक्कम | सन २००८-२००९ मधील प्रकरणे व गुंतलेली रक्कम | एकुण प्रकरणे व गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | हवेली | २३<br>९४४०५६० | ११<br>४२८६५० | ३४<br>९८६९२१० |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.**

सदर परिच्छेदात नमुद ३४ प्रकरणे आहेत त्यापैकी,

(१) ९ प्रकरणे ज्या ग्रामपंचायतींशी संबधित आहेत त्या ग्रामपंचायती पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगर पालिकेत समाविष्ट झाल्या आहेत परंतु सदर प्रकरणापैकी ८ प्रकरणामधील अपहाराची रक्कम रुपये ४५,५४९/- पुर्ण वसुल करुन गटविकास अधिकारी यांचे अनामत सदरी चलनाने भरणा करुन घेतलेली आहे. चलनांची प्रत अभिलेख्यात उपलब्ध आहे. उर्वरित एक ग्रामपंचायत संदर्भात संबधित ग्रामविकास अधिकारी श्री. पी. एस. देखणे यांचेवर सहकार नगर पोलिस स्टेशन येथे गुन्हा क्र. १२७/९८ दाखल केला आहे व चीफ कोर्ट पुणे येथे केस नंबर २८१/९९ अन्वये केस असुन ती प्रलंबित आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी आदेश क्र. ८/४२८ /०८ दि. १७/१०/२००८ अन्वये श्री. देखणे योजना ५० % निवृत्ती वेतन कायम रोखुन ठेवणे ही शिक्षा दिलेली आहे.

(२) ७ प्रकरणांमध्ये ग्रामपचायतींचे संबधित लेखा परिक्षण कालावधीतील दप्तर लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन न दिल्यामुळे लेखा परिक्षण झालेले नाही. संबधित ग्रामसेवकांना नोटीस देण्यात आल्या असुन त्यांचेवर पुढील प्रशासकीय कारवाई सुरु आहे. पैकी श्री जी. डी. बोराटे तत्कालिन ग्रामसेवक यांना सेवेतुन बडतर्फ करणेत आलेले आहे.

(३) १४ प्रकरणांची पुर्तता झाली असुन मंजुरीचे आदेश प्राप्त आहेत.

(४) २ प्रकरणांचे पुर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) २ प्रकरणांची चौकशी पुर्ण झालेली असुन संबधितांच्या स्थावर मालमत्तेवर बोजा चढविण्याची कार्यवाही सुरु आहे. तत्कालिन ग्रामसेवक श्री. जी. डी. बोराटे यांना जिल्हा परिषद सेवेतुन बडतर्फ करणेत आलेले आहे.

**(२) पंचायत समिती खेड** - पंचायत समिती खेड यांची सन २००८-०९ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायत अपहार प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत.

| योजना | सुरवातीची शिल्लक | नविन प्रकरणे | एकुण | निकाली | अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| ग्रामनिधी | ८ | २ | १० | — | १० |
| जवाहर रोजगार योजना | २ | २१ | २३ | — | २३ |

सन २००८-०९ या वर्षात ग्रामपंचायत अपहार प्रकरणे एकही निकाली का काढले नाही याबाबत खुलासा करावा.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.**

**ग्रामनिधी**:-सदर परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे खेड विकास गटात सन २००८-२००९ अखेर एकुण १० प्रकरणे असुन पैकी ०६ प्रकरणे संशयित व कायमस्वरुपी अपहार आक्षेपित आहेत.

सदर ०६ प्रकरणांपैकी ०४ प्रकरणात अपहारीत रक्कम रु.१२६३०९/-इतकी रक्कम वसुल करणेत आलेली असुन ०१ प्रकरणात रु. ३२,६२९/- चा बोजा संबधित ग्रामसेवकाच्या मालकीच्या ७/१२ सदरी दाखल करणेत आलेला आहे तसेच ०१ प्रकरणात समायोजन पुर्ण करणेत येऊन सदर प्रकरणास जिल्हा परिषदेने मंजुरी दिलेली आहे. (एकुण ०६)

उर्वरीत ०४ प्रकरणांपैकी लेखा परिक्षणास अभिलेखे/दप्तर उपलब्ध न करुन दिलेमुळे आक्षेप घेणेत आलेला असुन त्यापैकी ०१ प्रकरणाचे अप्राप्त अभिलेखे ग्रा.पं. मध्ये उपलब्ध करुन घेणेत आले आहे. ०१ प्रकरणाचे सन १९९८-९९ ते सन २००५-०६ चे लेखापरिक्षण पुर्ण करुन घेणेत आलेले असुन उर्वरीत सन १९९२-९३ ते सन १९९७-९८ चे अभिलेखे उपलब्ध न करुन दिल्याबद्दल संबधित ग्रामसेवकावर प्रशासकीय कारवाई करणेत येत आहे. ०१ प्रकरणात आक्षेपात नमुद असलेप्रमाणे पुर्ण कालावधीचे म्हणजेच सन १९९४-९५ ते सन२००५-२००६ चे लेखा परिक्षण पुर्ण करुन घेणेत आलेले असुन उर्वरीत ०१ प्रकरणात प्राथमिक चौकशी पुर्ण करणेत येऊन अभिलेखे उपलब्धततेबाबत संबधित कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करणेत आलेली असुन अद्याप संबधित कालावधीचे अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत, ते त्यांचेकडुन उपलब्ध करुन घेणेची कार्यवाही करणेत येत आहे. (एकुण ०४) अवलोकनार्थ सदर प्रकरणांचा तक्ता पुढीलप्रमाणे :—

| योजना | एकुण प्रकरणे | वसुली पुर्ण प्रकरणे | बोजना नोंद प्रकरणे | समायोजन सह मंजुर प्रकरणे | दप्तर उपलब्ध झालेली / ले.प. बाकी प्रकरणे | लेखा परिक्षण पुर्ण झालेली प्रकरणे | अंशतः लेखा परिक्षण पुर्ण झालेली प्रकरणे | दप्तर उपलब्ध नसलेली प्रकरणे | अखेर शिल्लक/ प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामनिधी | १० | ०४ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ० |

जरोयो/जग्रासयो/संग्रारोयो :- सन २००८-२००९ अखेर एकुण २३ प्रकरणे असुन पैकी १५ प्रकरणे संशयित व कायमस्वरुपी अपहार आक्षेपित आहेत. पैकी ०७ प्रकरणात अपहारीत रक्कम रु. १६७९९३/- वसुल करणेत आलेली असुन ०३ प्रकरणात रु.२९३०६८/- समायोजन पुर्ण करणेत आलेले आहे वसुलपात्र व पुर्तता कार्यवाही पुर्ण करुन समायोजित प्रकरणांपैकी जिल्हा परिषदेने ०३ प्रकरणास मंजुरी दिलेली आहे. उर्वरीत ०१ प्रकरण जि. प. कडे मंजुरीसाठी सादर करणेत आलेले आहे. उर्वरीत ०८ प्रकरणे प्रलंबित आहेत. (एकुण १५)

वरील एकुण २३ प्रकरणांपैकी उर्वरीत ०८ प्रकरणे लेखा परिक्षणास अभिलेखे/दप्तर उपलब्ध न करुन दिलेमुळे आक्षेप घेणेत आलेला असुन त्यापैंकी ०२ प्रकरणात दप्तर उपलब्ध करुन घेणेत येऊन पुर्ण कालावधीचे लेखा परिक्षण पुर्ण करुन घेणेत आलेले असुन ०१ प्रकरणाचे अशंतः लेखा परिक्षण पुर्ण करुन घेणेत आलेले आहे. तसेच उर्वरीत ०५ प्रकरणात अभिलेखे/ दप्तर संबधित जबाबदार कर्मचारी यांचेकडुन उपलब्ध करुन घेणेची कार्यवाही सुरु आहे. (एकुण ०८) अवलोकनार्थ सदर प्रकरणांचा तक्ता पुढीलप्रमाणे :—

| योजना | एकुण प्रकरणे | वसुली पुर्ण प्रकरणे | योजना नोंद प्रकरणे | समायोजन सह मंजुर प्रकरणे | दप्तर उपलब्ध झालेली / ले.प. बाकी प्रकरणे | लेखा परिक्षण पुर्ण झालेली प्रकरणे | अंशतः लेखा परिक्षण पुर्ण झालेली प्रकरणे | दप्तर उपलब्ध नसलेली प्रकरणे | अखेर शिल्लक/ प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज.रो.यो. | २३ | ०३ | ० | ०४ | ० | ०२ | ०१ | ०५ | ०८ |

सन २००८-०९ या कालावधीमध्ये अपहार प्रकरणांमध्ये संबधित तत्कालीन जबबादार कर्मचारी हे मयत, सेवानिवृत्त झाले असल्याने तसेच अपहारीत वसुल पात्र रकमांची वसुली या कार्यालयाचे पातळीवर सुरु असलेने अंतिमतः प्रकरणे परिपुर्ण पुर्तया होऊ न शकलेने प्रलंबित प्रकरणे निकाली काढणेबाबत अंतिम कार्यवाही करता आलेली नाही.

(३) **पंचायत समिती आंबेगाव** - पंचायत समिती आंबेगाव यांचे सन २००८-२००९ चे लेखा परिक्षण केले असता, ग्राम पंचायत अफरातफर प्रकरण खालीलप्रमाणे आहेत. एकुण ग्राम पंचायत १०३ आहेत.

(१) ग्रामपंचायत अपहार एकुण -११,

ग्रामपंचायत गैरव्यवहार प्रकरणे -०८- रक्कम रुपये१,२४,८७,५८१/-

दप्तर उपलब्ध नसलेली प्रकरणे -०३,

(तळेघर, गंगापुर व आमोंडी)

एकुण -११- वसुल रक्कम रुपये -५७,४०,७७४/-

**प्रलंबित**

२) ज.रो. योजना एकुण प्रकरणे -२४

गैरव्यवहाराची प्रकरणे -१६- रक्कम रुपये८२,४१,४११.१५

दप्तर उपलब्ध नसलेली प्रकरणे -०८

(तळेघर,गंगापूर,आमोंडी,फुलवडे,चिखली,तळेघर,कोंढवळ)

एकुण -२४ वसुल रक्कम रुपये ८२,४१,४११.१५

**प्रलंबित**

सन २००८-०९ मध्ये ग्राम निधीची रक्कम वसुलात आणून संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करुन लेखापरिक्षणास दाखवावे.त ासेच उर्वरीत प्रकरणी गटविकास अधिकारी यांनी जातीने लक्ष घालून सदर प्रकरणे निकालात काढण्याबाबत विस्तार अधिकारी (पंचायत) यांना ठराविक मुदत देऊन, सदर प्रकरण निकालात काढावीत प्रगती अहवाल लेखा परिक्षणास दाखवावा.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.**

(१) ग्रामनिधी आंबेगाव विकास गटात सन २००८-०९ मध्ये तपासणी कालावधी मध्ये ग्रामनिधीची अपहाराची एकुण ११ प्रकरणे होती. सदर प्रकरणांमध्ये रक्कम रुपये १,२४,८७,५८१/- इतकी रक्कम नमुद केलेली आहे. तथापी प्रत्यक्षात रक्कम रुपये १,२४,५९,७९६/- इतकी आहे .

| अ.क्र. | ग्रामनिधी | प्रकरणांची संख्या | अपहाराची रक्कम | समायोजनाची रक्कम | वसुलपात्र रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | गैरव्यवहाराची प्रकरणे | ८ | १,२४,५९,७९६ | १,१९,९३,५५६ | ४,६६,२४० |
| २ | दप्तर उपलब्ध नसलेली प्रकरणे | ३ | १,७५,०७१ | १,७३,५२० | १,५५१ |
| | एकुण | ११ | १,२६,३४,८६७ | १,२१,६७,०७६ | ४,६७,७९१ |

१) दप्तर उपलब्ध नसलेल्या तीन ग्रामपंचायतीं पैकी आमोंडी ग्रामपंचायतीचे दप्तर उपलब्ध करुन घेऊन, लेखा परिक्षण करण्यात आलेले असून, अपहार प्रकरणांतील समायोजीत रक्कम रु.१,७३,५२०/- व वसुलपात्र रक्कम रु. १,५५१/- ची पुर्तता करण्यात आलेली असून, त्यास मंजुरी घेण्यात आलेली आहे. मंजुरी आदेश दप्तरी दाखल आहे.

२) ग्रामपंचायत तळेघरचा पदभार असलेल्या श्री. आर. जी. गावडे, तत्कालीन ग्रामसेवक यांना बडतर्फ करण्यात आलेले असून, ते मयत आहेत.

३) ग्रामपंचायत गंगापुर बु.या पंचायतीचे दप्तर उपलब्ध करुन देणेबाबत संबंधित ग्रामसेवकावर कारवाई करण्यात येत आहे.

(२) **जवाहर रोजगार योजना.**

जवाहर रोजगार योजनेची अपहाराची एकुण प्रकरणे २४ होती. सदर प्रकरणांमध्ये रक्कम रु.८२,४१,४११.१५ इतकी नमुद केलेली आहे. तथापी प्रत्यक्षात रक्कम रुपये ७९,५४,१७२/- इतकी आहे. तसेच दप्तर उपलब्ध नसलेली ०८ प्रकरणे शकामध्ये नमुद केलेली आहेत. प्रत्यक्षात ०७ दप्तर उपलब्ध नसलेली प्रकरणे आहेत.

| अ.क्र. | ज.रो.यो./ ज.ग्रा.स.यो. | प्रकरणांची संख्या | अपहाराची रक्कम | समायोजनाची रक्कम | वसुलपात्र रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गैरव्यवहाराची प्रकरणे | १७ | ७९,५४,१७२ | ७७,८०,८०७ | ३२,७४१ | १,४०,६२४ ची वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे. |
| २ | दप्तर उपलब्ध नसलेली प्रकरणे | ७ | ६९,९५० | ६२,२७१ | ७,६७९ | |
| | एकूण | २४ | ८०,२४,१२२ | ७८,४३,०७८ | ४०,४२० | १,४०,६२४ |

(१) दप्तर उपलब्ध नसलेल्या सात अपहार प्रकरणांपैकी कोंढवळ ग्रामपंचायतीचे दप्तर उपलब्ध करुन घेऊन, लेखा परिक्षण करण्यात आलेले असून, अपहार प्रकरणांतील समायोजीत रक्कम रु. ६२,२७१/- व वसुलपात्र रक्कम रु. ७,६७९/- ची पुर्तता करुन, मंजुरी आदेश दप्तरी दाखल आहे.

(२) ग्रामपंचायत तळेघर (ज.रो.यो/सं.ग्रा.रो.यो.) या पंचायतीचा पदभार असलेल्या श्री. आर. जी. गावडे, तत्कालीन ग्रामसेवक यांना बडतर्फ करण्यात आलेले असून, ते मयत आहेत.

(३) चिखली या पंचायतीचा पदभार असलेल्या श्री. आर. जी. गावडे , तत्कालीन ग्रामसेवक यांना बडतर्फ करण्यात आलेले असून ते मयत आहेत.

(४) ग्रामपंचायत गंगापुर खु. या पंचायतीचे दप्तर उपलब्ध करुन देणे कामी सबंधीत ग्रामसेवकांना नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

(५) आमोंडीया पंचायतीचे दप्तर उपलब्ध करुन देणे कामी संबंधित ग्रामसेवकांना नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

(६) ग्रा. पं. फुलवडे या ग्रामपंचायतीचे दप्तर उपलब्ध करुन घेण्यात आलेले असून, लेखापरिक्षण करणेकामी पत्र व्यवहार केला आहे .

**(४) पंचायत समिती जुन्नर** - पंचायत समिती सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण केले असता ग्रामपंचायत विभागाकडील अपहार प्रकरणांची माहिती घेताना पंचायत समितीकडे एकूण ग्रामपंचायतीं पैकी १५ ग्रामपंचायतीं मध्ये अपहार झालेचे दिसुन येते.

ग्रामनिधी फंडातील रु. ४०३३८२/- एवढी रक्कम १९६४-६५ ते २००५-०६ या कालावधीत गुंतलेली आहे. जवाहर रोजगार योजनेमध्ये १४ ग्रामपंचायतींमध्ये अपहार झालेला असुन रु. १७४६२६२/- सन १९८९-९० ते २००१-०२ या कालावधी कालावधीपासून गुंतलेली आहे. ग्रामनिधी पैकी प्रत्यक्ष वसूली रु. ३५६७५/- व जवाहर रोजगार योजनेतून रु.२०१७८/- इतकीच रक्कम वसुल झालेली आहे. सदरच्या प्रकरणांमध्ये गुंतलेल्या रक्कमा अद्याप लेख्या बाहेर आहेत. तरी सदर अपहार

प्रकरणात वसुली बाबात विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी त्या स्तरावरुन प्राध्यान्याने प्रकरणे निकाली काढणेबाबत दक्षता घेण्यात यावी व अपहार रक्कम वसुलबाबातठोस कार्यवाही करुन जास्तीत जास्त अपहारीत रक्कम वसूलात आणून पुर्तता लेखा परिक्षणात दाखवावी.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हापरिषद, पुणे यांचेकडून खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.**

सदर परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे ग्रामनिधी १५ प्रकरणांची सद्यस्थिती खालील प्रमाणे.

| अ. क्र. | ग्राम पंचायत नाव | अपहार निदर्शनास आलेले वर्ष | अपहारीत रक्कम | वसुली केलेली रक्कम | समायोजीत रक्कम | प्रकरणाची सद्यःस्थिती/पुर्तता कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | कांदळी | १९९९-२००० ते २००४-०५ | २३५००.०० | ०.०० | २३५००.०० | समायोजनाने कार्यवाही पुर्ण. |
| २ | निमदरी | १९९५-९६ ते २००५-०६ | २७८२.२६ | २७८२.२६ | ०.०० | वसुलीने कार्यवाही. पुर्ण. |
| ३ | मांदारणे | १९९५-९६ ते २००५-०६ | १०९४०.०० | ०.०० | १०९४०.०० | समायोजनाने कार्यवाही पुर्ण. |
| ४ | निमगिरी | १९९८-९९ ते २००५-०६ | ५८४५.०० | ५८४५.०० | ०.०० | वसुलीने कार्यवाही पुर्ण. |
| ५ | राजुरी | १९९५-९६ ते २००५-०६ | २१३३५.५० | २१३३५.५० | ०.०० | वसुलीने कार्यवाही पुर्ण. |
| ६ | निमगाव त.म्हाळुंगे | १९९८-९९ते १९९९-२००० | ५०९५.०० | ०.०० | ५०९५.०० | समायोजनाने कार्यवाही पुर्ण. |
| ७ | निरगुडे | १९९४-९५ते २००५-०६ | १२२००.०० | ५२००.०० | ७०००.०० | वसुलीने व समायोजनाने कार्यवाही पुर्ण. |
| ८ | पेमदरा | १९९२ - ९३ते १९९८-९९ | १२९०९.७० | १८७० | ११०३९ | वसुलपात्र रु. १८७०/- संबधिताकडून वसुली केली असुन उर्वरित रक्कमेचे समायोजन करणेत आलेले असुन पुर्तता कार्यवाही पुर्ण. |

**तक्ता**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | आणे | १९९३-९४ ते १९९४-९५ | ६३०४६.९५ | ०.०० | ०.०० | संबंधित जबाबदार ग्रामसेवक यांची वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आलेली आहे. |
| १० | आगर | १९९९-२००० | १४९८४२ | ४८८७५ | ०.०० | फौजदारी गुन्हा दाखल मुळ दप्तर जाक्र.५८/२००२ अन्वये दप्तर पोलिस स्टेशनच्या ताब्यात. |
| ११ | मढ | १९६३-६४ | ४८४८ | ४८४८ | ०.०० | वसुल रकमेची पुर्तता करण्यात आली. |
| १२ | सुराळे | १९६४-६५ | ४२२६.१२ | ०.०० | ०.०० | प्रकरणी गुन्हा दाखल होऊन सी. सी. नं. ४३०/७४ दि.२७/७/७६ने केसचा निकाल लागला तथापि निकाल केस अप्राप्त. |
| १३ | गोद्रे | १९९३-९४ ते २०००-०१ | २११९२.०० | २००००.०० | ०.०० | रु.२००००/-वसुल करुन उर्वरीत रक्कम रु.११९२/ -वसुलीची कार्यवाही सुरु आहे. |
| १४ | बस्ती | १९९२-९३ ते २००५-०६ | ५१११६.१० | ०.०० | ०.०० | कारणे दाखवा नोटीस दि.२६/६/२०१५ रोजी बजावण्यात आली आहे. |
| १५ | रानमळा | १९९२-९३ ते २००५-०६ | १४८०५.०० | ०.०० | १४८०५.०० | समायोजनाने पुर्तता करणेत आली. |
| | | एकूण एंकदर | ४०३६८३.६ | ११०७५५.७६ | ७२३७९.०० | |

तसेच परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे जवाहर रोजगार योजना अंतर्गत एकू ण १४ प्रकरणाची सद्यःस्थिती खालील प्रमाणे.

**तक्ता**

| अ.क्र. | ग्राम पंचायत नाव | अपहार निदेर्शनास आलेले वर्ष | अपहारीत रक्कम | वसुली केलेली रक्कम | समायोजीत रक्कम | प्रकरणाची सद्यःस्थिती/पुर्तता कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | विठ्ठलवाडी | १९९३-९४ ते १९९८-९९ | ४३७४४.०० | १८७७५.०० | २४९६९.०० | वसुलीने व समायोजनाने कार्यवाही पुर्ण |
| २ | कांदळी | १९९९-०० ते २०००-०१ | ८००००.०० | ०.०० | ३००००.०० | समायोजनाने कार्यवाही पुर्ण |
| ३ | निमगिरी | १९९८-९९ ते २००५-०६ | ३२१७२०.०० | ०.०० | ३२१७२०.०० | समायोजनाने कार्यवाही पुर्ण |
| ४ | मांदारणे | १९९३-९४ ते १९९८-९९ | २०५२५६.०० | ०.०० | २०५२५६.०० | समायोजनाने कार्यवाही पुर्ण |
| ५ | गोळेगाव (जरोयो) | १९९३-९४ ते १९९८-९९ | २७४७०.०० | ०.०० | २७४७०.०० | समायोजनाने कार्यवाही पुर्ण |
| ६ | रानमळा (जरोयो) | १९९२-९३ ते १९९८-९९ | १६२००.०० | ०.०० | १६२००.०० | समायोजनाने कार्यवाही पुर्ण |
| ७ | निमगीरी | १९८९-९० ते १९९४-९५ | ४५००.०० | ४५००.०० | ०.०० | वसुलीने कार्यवाही पुर्ण |
| ८ | चिंचोली | २००२-०३ ते २००५-०६ | ८३२५.०० | ८३२५.०० | ०.०० | वसुलीने कार्यवाही पुर्ण |
| ९ | आपटाळे | १९९८-९९ | १३२८९.०३ | १४०३.९५ | ०.०० | वसुलीने कार्यवाही पुर्ण |
| १० | आणे | १९८९-९० ते १९९४-९५ | ३७८७१३.०० | ०.०० | ०.०० | वेतनवाढतात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आलेली आहे. |

**तक्ता**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | आगर | १९९९-०० | २३५३५२.५० | ०.०० | ०.०० | फौजदारी गुन्हा दाखल जाक्र.५८/०२ अन्वये नमुद कालावधीतील ग्रा.पं. कडील दप्तर पोलिस स्टेशन कडे जमा |
| १२ | पेमदरा | १९८९-९० ते १९९८-९९ | ५२१५४.४० | ०.०० | ०.०० | वेतन वाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आलेली आहे. |
| १३ | निमगाव तर्फे म्हाळुंगे | १९८९-९० ते १९९८-९९ | ७३२७.०० | ०.०० | ०.०० | कारणे दाखवा नोटीस दि.२६/६/२०१५ रोजी बजावण्यात आली आहे. |
| १४ | मढ (जरोयो) | १९९३-९४ ते १९९८-९९ | ३१०००.०० | ०.०० | ०.०० | कारणे दाखवा नोटीस दि.२६/६/२०१५ रोजी बजावण्यात आली आहे. |
| | | एकुण | १४२२०५०.०० | ३३००३.९५ | ६२५६१५.०० | |

| अ. क्र. (१) | लेखाशिर्ष प्रकरणे (२) | एकुण प्रकरणे (३) | निकाली रक्कम (४) | एकुण अपहारीत रक्कम (५) | समायोजित रक्कम (६) | वसुलकेलेली एकूण रक्कम (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामनिधी | १५ | ७ | ४०३६८३.६३ | ११०७५५.७६ | ७२३७९.०० |
| २ | जवाहर रोजगार योजना | १४ | ९ | १४२२०५०.०० | ६२५६१५.०० | ३३००३.९५ |

तरी वरिल प्रमाणे एकूण २९ ग्रामपंचायती मधील अपहारा संबंधी कार्यवाही करणेत आली आहे. तथापि, आणे बस्ती, सुराळे, पेमदरा, निमगावत. म्हाळुंगे या ग्रामपंचायतींची वसुली बाबत कार्यवाही चालु असून संबंधितांवर कारवाई करणेत आली आहे. उपरोक्त वस्तुस्थितीनुसार खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

(५) पंचायत समिती दौंड - अफरातफर प्रकरणाबाबत पंचायत समिती, दौंड यांचे सन २००८-०९ लेखा परिक्षण केले असता ग्रामपंचायत ।अफरातफरीची प्रकरणे खालीलप्रमाणे

१. खोरवडी - सन १९९२ - १९९३ त`२००५-०६ रु. ३,३५,१४६

२. खोरवडी - सन १९९२-१९९३ ते २००५-०६ रेकॉर्ड उपलब्ध नाही.

३. सोनवडी-सन १९९२-९३ ते २००५-०६ रेकॉर्ड उपलब्ध नाही.

**एकुण रु. ३,३५,१४६/-**

**जवाहर रोजगार योजना**

१. कानगांव- सन १९९९ ते २००० र. रु. ३६१६४९/-

२. लिंगाळी- सन १९८९- ९० ते १९९८ -९९ र.रु. २९८८४७/-

३. सोनवडी-सन २००२-०३ चे रेकॉर्ड उपलब्ध नाही.

४. मळदसन १९८९-९० ते १९९८-९९ रेकॉर्ड उपलब्ध नाही.

५. खोरवडी-सन २००२-०३ ते २००५-०६ रु.६००००/-

६. सोनवडी- सन २००२-०३ ते २००५-०६ रेकॉर्ड उपलब्ध नाही.

७. सोनवडी-सन १९८९-९० ते १९९८-९९ रेकॉर्ड उपलब्ध नाही.

**एकुण रु . ७,२०,४९६/-**

सर्वाना नोटीस दिलेल्या आहेत. लिंगाळी व खोरवडी यांना अंतिम नोटीस दिल्या आहेत. तरी उर्वरीत प्रकरणे गट विकास अधिकारी यांनी जातीने लक्ष घालुन सदर प्रकरणे निकालात काढणेची कार्यवाही करावी व पुर्तता अहवाल लेखा परिक्षणास दाखवावा.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, पुणे यांचे कडून खालील प्रमाणे खुलासा करण्यात आलाः-**

**१. खोरवडी** - सदर कालावधीतील संशयित अपहारातील रकमेच्या प्रमाणकांची सर्व पुर्तता झाली असुन जिल्हा परिषद `कडील आदेश क्रं.जिप/पंचा/आस्था- १६/३२६/१३ दि. ४/४/२०१३ अन्वये तसेच जिप/पंचा/आस्था- १६/१७/२०१४ दि. ३/२/२०१४ ने रु. ३,३५,१४६ चे समायोजनास मान्यता मिळालेली आहे. याप्रकरणी संबंधित ग्रामसेवक यांना नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. नस्ती सोबत आदेश व ग्रा.से. यांना दिलेल्या नोटीसांच्या प्रती जोडलेल्या आहेत.

**२. खोरवडी** - सन१९९२-१९९३ ते २००५-०६ पैकी ९२-९३ ते ९५-९६ चे लेखा परिक्षण करणे बाकी होते. आत्ता सदर कालावधीचे सर्व रेकॉर्ड उपलब्ध झाले आहे. त्याबाबत ग्रामसेवक खोरवडी यांनी दि.१/३/२०१४ रोजीचे पत्रान्वये पंचायत समितीस कळविलेले आहे.या बाबत उप.मु.का.अ.जि.प. पुणे व सहा.संचालक स्थानिक निधी लेखा, पुणे यांना या कार्यालयाने पुढील लेखा परिक्षण करणे कामी जाक्रं/पंचा/तक्रार/कावि/३३३/ १४ दिनांक १/३/२०१४ व जाक्रं/पंचा/तक्रार/१०४९/१५दि.११/६/२०१५ चे पत्रान्वये कळविलेले आहे.संबंधित ग्रामसेवक यांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत .नस्ती सोबतपत्राची प्रत व ग्रामसेवक यांना दिलेल्या नोटीसाची प्रत जोडलेली आहे.

**३. सोनवडी-** येथील सन १९९२-९३ ते १९९८-९९ व २००२-०३ ते २००५-०६ पर्यंतचे लेखा परिक्षण झाले असुन यापैकी १९९९-२००० ते२००१-०२ चे लेखापरिक्षण बाकी होते. त्याबाबतचे पुरावेसोबत लेखापरिक्षण अहवाल प्रत अवलोकनार्थ सादर केली आहे. उर्वरीत सन १९९९-२००० ते २००१-०२ या कालावधीतील दप्तर ग्रामपंचायतीकडे उपलब्ध झालेबाबत या कार्यालयाकडील पत्र जाक्रं/पंस/पंचा/३४३/१३दि.८/३/२०१३ अन्वय`जिल्हा परिषदेस कळविलेले होते. उप. मु. का. अ. (पं) जि. प. पुणे यांनी सहा.संचालक स्थानिक निधी लेखा पुणे यांना जाक्रं/जिप/पंचा/आस्था-१६/४६९/१३दि.१२/८/२०१३ अन्वये लेखा परिक्षण करणेबाबत कळविलेले आहे. तसेच या कार्यालयाकडील जाक्रं/पंचा/तक्रार/१०४९/१५दि.११/६/२०१५ अन्वये पुनशः सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखा पुणे यांना व जिल्हापरिषदेस कळविणेत आले आहे. या प्रकरणी संबंधित ग्रामसेवक श्री. ए. जी. राऊत यांना निलंबित करुन खाते निहाय चौकशी करण्यात आलेली आहे. सध्या ते सेवानिवृत्त आहेत. नस्ती सोबत पत्राची प्रतव ग्रामसेवकयांना दिलेल्या नोटीसाची प्रत जोडलेली आहे.

**जवाहर रोजगार योजना :**

**१. कानगांव**-सदर शकात नमूद केलेली संशयित अपहारातील रु. ३६१६४९/- ची पुर्तता झाली असुन जिल्हा परिषदेकडील मंजुरी आदेश जाक्रं/जिप/पंचा/आस्था-१६/२१/१४/दि.७/२/२०१४ अन्वये रु. ३,६१,६४९/- चे समायोजनास मंजुरी मिळाली असुन संबंधित ग्रामसेवक श्री. एन. पी. शिंदे यांना नोटीस बजावली आहे. नस्ती सोबत आदेश व ग्रामसेवक यांना दिलेल्या नोटीसाची प्रत जोडलेली आहे.

**२. लिंगाळी** -सदर शकात नमूद केलेल्या संशयित अपहारीत रु.२९८८४७/- ची पुर्तता झाली असून जिप कडील आदेश जाक्र/जिप/पंचा/आस्था-१६/१०/१३, दि.३/१/२०१३ ने रु. ७२० व जिप/पंचा/आस्था-१६/६६८/१४, दि. ३०/५/२०१४ ने रु. २,९८,८४७/- समायोजित रक्कमेस मान्यता मिळालेली आहे. तत्कालीन ग्रामसेवक श्री. येडे व श्री.कांबळे यांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. सध्या दोघेही सेवानिवृत्त आहेत. नस्ती सोबत आदेश व ग्रामसेवक यांना दिलेल्या नोटीसा जोडलेल्या आहेत.

**३. सोनवडी**-सन २००२-०३ चे रेकॉर्ड उपलब्ध असून त्याचे लेखापरिक्षण झालेले आहे संबंधित ग्रामसेवक यांना नोटीस देण्यात आलेली आहे. नस्ती सोबत लेखापरिक्षण अहवाल जोडला आहे.

**४. मळद**-सदरील कालावधी पैकी सन १/४/१९८९ ते ३१/३/१९९१ या कालावधी व्यतिरिक्त उर्वरीत कालावधीचे म्हणजे सन १९९१-९२ ते १९९८-९९ या कालावधीचे लेखापरिक्षण झालेले आहे. व १/४/१९८९ ते ३१/३/१९९१ या कालावधीचे दप्तर ग्रामपंचायतकडे उपलब्ध झालेबाबत ग्रामसेवक मळद यांनी दि. २०/२/२०१४ रोजी कळविलेले असून या कार्यालयाने जाक्र/पंचा/तक्रार/कावि/३२६/२०१४, दि. १/३/१४ व जाक्र /पंचा/तक्रार/१०४९/१५, दि.११/६/१५ अन्वये पुढील लेखापरिक्षण होणेबाबत जिल्हापरिषद व लेखापरिक्षण विभागास कळविलेले आहे. या प्रकरणी संबंधितास नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. नस्ती सोबत लेखापरिक्षण अहवाल व नोटीसाची प्रत जोडली आहे.

**५. खोरवडी**-सदर बाबत या कार्यालयाने संबंधित ग्रामपंचायतकडुन पुर्तता करुन घेतली असून या कार्यालयाने पस/पंचा/९६३/१०/११, दि. १/१/२०११ ने जिल्हा परिषदेकडे मान्यतेसाठी सादर केलेले आहे. यास जिल्हा परिषदकडील आदेश जाक्र/जिप/पंचा/१५-१६/११५३/१५, दि. १७/६/२०१५ नेर· रु. ६००००/- समायोजित रक्कमेस मान्यता मिळालेली आहे. संबंधित ग्रामसेवक श्री. के. बी. येडे हे सेवानिवृत्त असुन श्री. पी. टी. गुणवरे हे मयत आहेत. त्यांना नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. नस्तीसोबत आदेश व नोटीसांची प्रत जोडलेली आहे.

**६. सोनवडी**-ग्रामपंचायत सोनवडी जवाहर रोजगार योजना या योजनेचे सन २००२-०३ ते २००५-०६ च्या कालावधीचे लेखापरिक्षण पुर्ण झालेले आहे. संबंधित ग्रामसेवक श्री. बी. जी. ओमासे यांना नोटीस देणेत आलेली आहे. नस्तीसोबत लेखा परिक्षण अहवाल प्रत व नोटीस प्रत जोडली आहे.

**७. सोनवडी**-सदर लेखापरिक्षण सन १९८९-९० ते १९९८-९९ या कालावधीचे पुर्ण झालेले आहे. त्याबाबतचे अहवाल नस्तीसोबत जोडलेला आहे.

शकात नमूद केलेली सर्व प्रकरणे पंचायत समिती स्तरावरुन निकालात काढणेत आलेली आहेत.

(६) **पंचायत समिती पुरंदर** - पंचायत समिती, पुरंदर यांच्याकडील ग्रामपंचायत विभागाकडील अफरातफर नोंदवही तपासली असता ग्रामनिधी मधील अफरातफरीची प्रकरणे असून त्यामध्ये एकुण २४,२८,६७०/- रक्कम गुंतलेली आहे. एकुण प्रकरणांपैकी सन १९९३-९४ ते सन २००५-०६ या कालावधीतील ग्रामपंचायतीची अपहाराची प्रकरणे आहेत. सदरची प्रकरणे निकाली काढणेचे दृष्टीने विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) गट विकास अधिकारी यांनी काय प्रयास केले तसेच संबंधीत ग्रामसेवकाकडून वसूलीबाबत कोणती ठोस कार्यवाही केली याचा खुलासा लेखापरिक्षणास करावा. अपहारामध्ये गुंतलेल्या रक्कमेपैकी जास्तीत जास्त रक्कम वसुलात आणुन पुर्तता लेखापरिक्षणास दाखवावी.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून खालील प्रमाणे खुलासा करण्यात आला.**

सन १९९३-९७ ते सन २००५-०६ या कालावधीतील ग्रामपंचायत अपहाराची ग्रामनिधीची सात प्रकरणे व जवाहर रोजगार योजनेची सहा प्रकरणे आहेत. त्या प्रकरणामध्ये एकूण रक्कम ग्रामनिधीची रु. १२,५५,६३१/- व जवाहर रोजगार योजनेची रु. ३,१७,८४७/- एकूण रक्कम रु. १५,७३,४७८/- गुंतलेली होती. त्या प्रकरणांमधील रु. १५,३५,०४८/- रुपये समायोजित करणेत आलेली आहेत. तसेच रु. ३८,४३०/- प्रत्यक्षात वसुल करण्यात आलेले आहेत. एकूण रु. १५,७३,४७८/- ची सर्व

ग्रामपंचायत अपहार प्रकरणे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद, पुणे यांचेकडील आदेशान्वये अंतिम निकाली निघालेली आहेत. त्या प्रकरणांचे अंतिम निकाली आदेश सोबत सादर करण्यात आलेले आहेत. मुळ लेखा परिक्षणशकाचे अवलोकन केले असता लेखापरिक्षण शकातील नमूद केलेली रक्कम व प्रत्यक्षात लेखा परिक्षण शकामध्ये असलेली रक्कम पुढीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | ग्रामपंचायतीचे नाव | लेखा परिक्षण शकामध्ये नमुद केलेली रक्कम | प्रत्यक्षात शकामध्ये निदर्शनास आलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १ | सटलवाडी | ९,३३,११८/- | १९३५०८/- |
| २ | दिवे | १०१४०३/- | १०१४३४/- |
| ३ | पांगारे | ४६२५४/- | ४४८५७/- |
| ४ | हारगुडे | ३२१७५५/- | ३२१७७५/- |
| ५ | निळुंज | ४४३८७०/- | ४५२६५६/- |
| ६ | परिंचे | १२४९३९/- | १३४९३९/- |
| | परिंचे | १२४९३९/- | १३४९३९/- |
| ७ | बेलसर | ९९७८०/- | ७२८४७/- |
| ८ | परिंचे | २०२४५/- | ३९०९५/- |

वरील तक्त्यामधील अ. क्र. ६ मध्ये नमुद केलेले ग्रामपंचायत परिंचे येथील अफरातफर प्रकरण मुळ लेखा परिक्षणामध्ये दुबार नमूद करण्यात आलेले आहे.

सन १९९३-९४ ते सन २००५-०६ या कालावधीतील अफरातफरीची एकूण २४,२८,६७०/- गुंतलेली असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि मूळ परिच्छेदांचे अवलोकन केले असता (ग्रामनिधी १२,५५,६३१/- व जरोयो ३,१७,८४७/-) एकूण रक्कम रु.१५७३४७८/- असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यानुसार प्रत्येक अफरातफर प्रकरणांचे निकाली आदेश सोबत सादर केलेला आहे. त्यानुसार प्रत्येक प्रकरणांची स्वतंत्र नस्ती उपलब्ध करुन ठेवलेली आहे.

**(७) पंचायत समिती भोर**-पं. स., भोर यांचे सन २००८-०९ चे लेखापरिक्षण केले असता ग्रामपंचायत अफरातफरीचे प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत.

एकूण ग्रामपंचायत १३ आहेत.

(१) ग्रामपंचायत संशयित अपहार प्रकरणे :- १५

- गैरव्यवहार प्रकरणे - १४ रु. ४३,६६,२३२/-
- दप्तर उपलब्ध नसलेले प्रकरणे १

(दिडोशी) एकूण १५ रु. ४३,६६,२३२/-

(२) जवाहर रोजगार विहारीची एकूण प्रकरणे :- १५

- गैरव्यवहार प्रकरणे - ९ रु. ८,११,०६४/-
- दप्तर उपलब्ध नसलेले प्रकरणे १

(हिर्डोशी, उत्रोली, शिरवळ एकूण : १५
तर्फेभोर, कांबरे बु. करंदीक बु)

**एकूण एकंदर रु. ५१,७७,२९६/-**

सन २००८-०९ मध्ये ग्रामनिधीची रक्कम वसुलात आणून संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करुन लेखापरिक्षण दाखवावे. तसेच उर्वरीत प्रकरणी गटविकास अधिकारी यांनी जातीने लक्ष घालून सदर प्रकरणे निकालात काढण्याबाबत T.P.O. यांना ठराविक मुदत देऊन सदर प्रकरणे निकालात काढावित. सदरहू प्रगती अहवाल लेखापरिक्षण दाखवावा.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, पुणेयांचे कडून खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.**

लेखा परिक्षण शकामध्ये नमूद केलेल्या ग्रामनिधीच्या १५ प्रकरणांपैकी आज अखेर ग्रामनिधीची एकूण ११ प्रकरणे निकाली निघालेली आहेत.

तसेच शकात नमूद केले प्रमाणे जरोयो/जग्रासयो/संग्रासयो या योजनेमध्ये रक्कम रु. ८११०६४/- एवढी रक्कम गुंतलेली होती. सदर रक्कमेपैकी ६७४०६४/- रक्कमेची पुर्तता झालेली आहे. नस्तीसोबत मा.उप.मु.का.अ.(पं),जि.प., पुणे यांचे आदेश जोडले आहेत. ग्रामनिधी व जरोयो/जग्रासयो /संग्रासयो या योजनेमधील प्रकरणांचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | लेखा शिर्ष | शकप्रकरणे | | | प्रकरणात गुंतलेली रक्कम | निकाली प्रकरणे | समायोजित/ वसुल रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | गैर-व्यवहार | दप्तर उपलब्ध नसलेले | एकुण | | | |
| १ | ग्राम निधी | १४ | १ | १५ | ४३६६२३२ | ११ | ३०८२८०७ |
| २ | जरोयो | ९ | ६ | १५ | ८११०६४ | ६ | ६७४०६४ |

| अ. क्र. | लेखा शिर्ष | एकूण शक प्रकरणे | प्रलंबित प्रकरणे | रक्कम | पैकी समायोजित रक्कम | वसूल रक्कम | उर्वरित रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्राम निधी | १५ | ४ | १२८३४२५ | १९१०६५ | ४९५०४ | १०४२८५६ |
| २ | जरोयो | १५ | ९ | १३७००० | ७६९० | ६२४३ | १२३०६७ |

सदर प्रलंबित प्रकरणातील ग्रामपंचायती व ग्रामसेवकांची माहिती -

(१) ५ ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवकांना नोटीसा बजावल्या आहेत.

(२) ६ ग्रामपंचायतीचे ग्रामसेवकबडतर्फ आहेत.

(३) २ ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक मयत आहेत.

सन २००७-०८ मध्ये ग्रामपंचायत अफरातफरीची ४ प्रकरणे निदर्शनास आली. त्या सर्व प्रकरणांची पुर्तता झालेली असून सदर प्रकरणे मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), पुणे, जि.प.,पुणे यांचेकडून निकाली काढणेत आले आहेत. निकाली प्रकरणांचे आदेश नस्तीसोबत सादर करणेत येत आहेत.

**(८) पंचायत समिती वेल्हा** - सन २००८-०९ या वर्षात ग्रामपंचायत अफरातफर प्रकरणे ग्रामनिधी ३५ होते, त्यापैकी ९ निकाली निघाले व शिल्लक २६ राहिले असून जवाहर रोजगार योजना अफरातफर प्रकरणे ७२ होती, त्यापैकी ३ निकाली निघाली व ६९ शिल्लक राहिली. त्यामध्ये ग्रामनिधी रु. रक्कम २,०९,०८,१३१/- ज.रो.यो. रु. ८,३७,५८७/- एवढी शासनाची रक्कम पडून आहे. फारच थोडी प्रकरणे काढून इतकी प्रकरणे प्रलंबित का ठेवली आहेत याबाबतचा खुलासा करावा.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.**

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायत लेखापरिक्षण आक्षेपात ग्रामनिधी अफरातफर प्रकरण संख्या ३५ होती. त्यापैकी ९ प्रकरणे निकाली व २६ प्रकरणे शिल्लक आहे असे नमूद केले आहे. तथापि प्रत्यक्षात सन २००८-०९ मध्ये ग्रामनिधी ३६ प्रकरणे शिल्लक होती. सन २००७-०८ कालावधीत एकूण ग्रामनिधीची ६ प्रकरणे पंचायत विभागात मंजुरीस सादर करण्यात आलेली होती. त्यानंतरच्या कालावधीत सादर केलेली २१ प्रकरणे अशी एकूण २७ प्रकरणे सन २००९-१० ते २०१५-१६ अखेर मंजूर झालेली आहेत.

सन २००८-०९ मध्ये जवाहर रोजगार योजना अंतर्गत ७२ अफरातफरीची प्रकरणे प्रलंबित होती. तसेच ३ प्रकरणे निकाली निघाली व ६९ प्रकरणे शिल्लक असलेबाबत आक्षेपात नमुद केले आहे. तथापि प्रत्यक्षात ३३ संायित अपहाराची प्रकरणे आहेत. त्यापैकी ३ प्रकरणे पंचायत विभागात मंजुरीसाठी सादर करण्यात आली होती. त्यानंतरच्या कालावधीत सादर केलेली २४ प्रकरणे अशी एकुण २७ प्रकरणे सन २००९-१० ते २०१५-१६ अखेर मंजुर झालेली आहेत.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | शक प्रकरणे | प्रकरणात गुंतलेली रक्कम | सद्यःस्थिती प्रत्यक्ष प्रकरणे | प्रत्यक्ष प्रकरणात गुंतलेली रक्कम | निकाली प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामनिधी | ३५ | २०९०८१३१ | ३६ | ३२१०२५० | २७ |
| २ | जरोयो | ७२ | ८३७५८७ | ३३ | १६६७०४८ | २७ |

| अ. क्र. | लेखाशिर्ष | शक प्रकरणे | वसूल केलेली रक्कम | एकूण रक्कम | प्रलंबित प्रकरणे | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामनिधी | ३५ | १०२०२५ | २०४७०३७ | ०९ | ११६३११३ |
| २ | जरोयो | ७२ | २६९०८ | १३०३३८८ | ०६ | ३६३६६० |

सदर प्रलंबित प्रकरणातील ग्रामपंचायती व ग्रामसेवकांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

(१) ६ ग्रामपंचायतीच्या ३ ग्रामसेवकांना प्रकरणांची पुर्तता करणेकामी नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

(२) ४ ग्रामपंचायतीचे ४ ग्रामसेवक हे मयत आहेत.

(३) ५ ग्रामपंचायतीच्या ३ ग्रामसेवकांना निलंबित करुन बडतर्फ करण्यात आले आहे.

**(९) पंचायत समिती मुळशी**-पंचायत समिती, मुळशी यांचे सन २००८-०९ चे लेखापरिक्षण केले असता ग्रामपंचायत अफरातफरीचे प्रकरण खालीलप्रमाणे आहेत.

**१. जवाहर रोजगार योजनाः-**

१. गैरव्यवहार प्रकरण १२

२. दप्तर उपलब्ध नाही १७

एकूण प्रकरणे २९ रु. २,८३,३०२/-

**२. ग्रामपंचायत संशयित अपहारः-**

१. गैरव्यवहार प्रकरणे १९

२. दप्तर नसलेले ९

एकूण प्रकरणे २८ रु. ७,१९,०२०/-

एकूण प्रकरणे ५७ रु. १०,०२,३२२/-

सन २००८-२००९ मध्ये जवाहर योजनेची ३ प्रकरणे वसूल करणेत आलेली आहे. तसेच ग्रामनिधीची ६५ प्रकरणांची वसुली करणेत आली आहे.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.**

**१. जवाहर रोजगार योजनाः-**

१) पंचायत समिती मुळशी अंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये जवाहर रोजगार योजनेची २९ प्रकरणे आहेत. त्यापैकी १२ प्रकरणे गैरव्यवहाराची व १७ प्रकरणे दप्तर उपलब्ध नसलेली असून आक्षेपातील अपहारित रक्कम रु. २८३३०२/- दर्शविली असुन प्रत्यक्षात एकूण रु. २९८२०२/- आहे. अपहारित सर्व १२ प्रकरणांचा निपटारा झालेला असून सर्व अपहारित निधी पैकी रु. २५७८०२/- समायोजन व रु. ४०,४००/- रक्कम वसुल झालेली आहेत. असे एकूण रु. २९८२०२/- अपहारित निधी वसूल झालेला आहे.

२ ) १७ दप्तरे उपलब्ध नसलेल्या प्रकरणांशी संबंधित ग्रामसेवकांवर जिल्हा परिषदेकडून निलंबनाची कारवाई करुन १५ प्रकरणांची दप्तरे उपलब्ध करुन घेण्यात आली असून सदर दप्तरांचे लेखापरिक्षण होणेकामी मा. उप लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, पुणे यांना इकडील पत्र क्र.पंचायत/आस्था ४/८०८/१५, दिनांक १५/६/२०१५ अन्वये कळविले आहे. तसेच २ प्रकरणांत श्री. तापडे ग्रामसेवक यांचे कालावधीतील दप्तर प्राप्त न झालेने ती प्रलंबित आहेत. संबंधित ग्रामसेवकांवर निलंबनाची कार्यवाही करुन त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते.

**२. ग्रामपंचायत संशयित अपहारः-**

१) पंचायत समिती, मुळशी अंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये ग्रामनिधीची २८ प्रकरणे आहेत. त्यापैकी १९ प्रकरणे गैर व्यवहाराची व ९ प्रकरणे दप्तर उपलब्ध नसलेली असून त्यापैकी १६ प्रकरणांचा निपटारा झालेला असून त्यापैकी सदर ३ प्रकरणांपैकी २ प्रकरणातील वसुली रक्कम रु. २६१८/-वसूल करण्यात आली आहे. उर्वरित ०१ प्रकरणप्रलंबित आहे. अपहारित निधी पैकी रु. ६३५०६४/- समायोजन व रु. ८५१२१/- वसुल असे एकूण रु. ७२०१८५/- वसुल झालेले आहेत.

२) ९ दप्तरे उपलब्ध नसलेल्या प्रकरणांशी निगडीत असलेल्या ग्रामसेवकांवर जिल्हापरिषदेकडून निलंबनाची कारवाई करुन त्यांचेकडून सर्व ९ प्रकरणांची दप्तरे उपलब्ध करुन घेण्यात आली असून सदर दप्तरांचे लेखापरिक्षण होणेकामी मा. उप लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, पुणे यांच्याकडील पत्र क्र. पंचायत/आस्था ४/८०८/१५, दिनांक १५/६/२०१५ अन्वये कळविले आहे.

**(फ) पंचायत समिती वडगाव-मावळ** - पंचायत समिती, मावळयांचे सन २००८-०९ चे लेखा परिक्षण केले असता ग्रा. पं. अफरातफरीची प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत.

जवाहर रोजगार योजना १३ प्रकरणे रू. २३५७२२/-

ग्रामपंचायत संशयित ११ प्रकरणे अपहार रू. ३१०२२६.२५/-

---

एकूण २४ प्रकरणे रू. ५४५९४८.२५ मधील रक्कम

सन २००८-०९

१) जवाहर रोजगार योजनेची डोणे व वारू ग्रामनिधी प्रकरणे उकसान, कान्हे, थुगाव यांची प्रकरणे मान्यतेकरिता सादर केलेली आहेत. तरी उर्वरित प्रकरणे गट विकास अधिकारी यांनी जातीने लक्ष घालुन निकालात काढणेबाबत कार्यवाही करावी व प्रगती अहवाल लेखा परिक्षणास दाखवावा.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.**

१) जवाहर रोजगार योजने अंतर्गत एकूण १३ प्रकरणांपैकी ५ प्रकरणे आर्थिक प्रलंबित होती. रू. २,३५,७२२/- त्यापैकी अद्यापपर्यंत ५ प्रकरणांची रू. १,४४,६१७/- वसुल केली असून उर्वरित रक्कम रू. ९१,१०५/- समायोजित करणेत आलेली आहे. तसेच ८ प्रकरणे दप्तर उपलब्ध नसलेली असून त्यापैकी २ प्रकरणांचे दप्तर उपलब्ध झालेले असून लेखापरिक्षण करून मिळणेसाठी स्थानिक निधी लेखा परीक्षा कार्यालयास कळवणेत आलेले आहे. तसेच एका प्रकरणाचा तत्कालीन ग्रामसेवक हा मयत झालेला आहे. उर्वरित ५ प्रकरणी संबंधित ग्रामसेवकांवर मुंबई ग्रा.पं. अधिनियम १९५८ यातील कलम १७९ अन्वये कारवाईचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

**जवाहर रोजगार योजना**

| अ.क्र. | ग्रा. पं.नाव | एकूण रक्कम | वसुल रक्कम | समायोजित रक्कम | शिल्लक रक्कम | मंजुरी आदेश | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | टाकवे बु. | ४०६१९ | ४०६१९ | ० | ० | क्र .जिप/पंचा/१६/ ३५५२०१३ दि.२४/५/२०१३ | रक्कम वसूल केली. |
| २ | डोणे | २५१५० | २५१५० | ० | ० | क्र.जिप/पंचा/१६/ १११४/२०१५ दि.१२/६/२०१५ | रक्कम वसूल केली. |
| ३ | वारू | ४६५६० | ४६५६० | ० | ० | क्र.जिप/पंचा/१६/ १११५/२०१५ दि.१२/६/२०१५ | रक्कम वसूल केली. |
| ४ | वडेश्वर | १०९०९३ | १७९८८ | ९११०५ | ० | क्र.जिप/पंचा/५१/ ४/२०१५दि.१४/६/२०१५ | जि.प.कडे पुर्ततेसाठी सादर |
| ५ | थुगाव | १४३०० | १४३०० | ० | ० | क्र.जिप/पंचा/ आस्था/१६/३५४/२०१३ दि.२१/५/२०१३ | रक्कम वसूल केली. |
| | एकूण | २३५७२२ | १४४६१७ | ९११०५ | ० | | |

| अ.क्र. | ग्रा.पं.नाव | | मंजुरी आदेश | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ६ | आढले बु. | दप्तर उपलब्ध नसलेले | पंस/जा.क्र.१४९/१५ दि.१५/६/२०१५ | दप्तर उपलब्ध झालेले असून अहवाल जि.प.कडे सादर केलेला असून स्थानिक निधी लेखा परिक्षणास तपासणीसाठी विनंती करणेत आलेली आहे. |
| ७ | डोणे | दप्तर उपलब्ध नसलेले | पंस/जा.क्र./१४९/९५ | दप्तर उपलब्ध झालेले असून अहवाल जि.प.कडे सादर दि.१५/६/२०१५ केलेलाअसून स्थानिक निधीलेखा परिक्षणास तपासणीसाठी विनंती करणेत आलेली आहे. |
| ८ | कशाळ | दप्तर उपलब्ध नसलेले | | तत्कालीन ग्रामसेवक श्री. विनोद म्हस्के मयत आहेत. |

तक्ता–चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ९ | कुसवली | दप्तर उपलब्ध नसलेले | पंस/जा.क्र.७६८/१५ दि.२०-७-२०१५ | (१) मुंबई ग्रा.पं.अधिनियम १९५८ यातील कलम १७९ अन्वये तत्कालिन ग्रामसेवक, श्री.एस.एन. कचरे यांचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर.<br>(२) नियमानुसार कारवाईचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सोबत छायांकित सत्य प्रती. |
| (१०) | कुसवली | दप्तर उपलब्ध नसलेले | पंस/जा.क्र.७६८/१५ दि.२०-७-२०१५ | (१) मुंबई ग्रा.पं. अधिनियम १९५८ यातील कलम १७९अन्वये तत्कालिन ग्रामसेवक श्री.के.जी.रोकडे यांचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर.<br>(२) नियमानुसार कारवाईचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सोबत छायांकित सत्य प्रती. |
| (११) | कुसवली | दप्तर उपलब्ध नसलेले | पंस/जा.क्र.७६८/१५ दि.२०-७-२०१५ | मुंबई ग्रा.पं.अधिनियम १९५८ यातील कलम १७९ अन्वये तत्कालीन ग्रामसेवक श्री.एस.एन.कचरे व श्री.के.जी.रोकडे यांचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर. |
| (१२) | येळसे | दप्तर उपलब्ध नसलेले | पंस/जा.क्र.७६८/१५ दि.२०-७-२०१५ | (१) मुंबई ग्रा.पं.अधिनियम १९५८ यातील कलम १७९अन्वये तत्कालिन ग्रामसेवक श्री. एस. एन. कचरे यांचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर.<br>(२) नियमानुसार कारवाईचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सोबत छायांकित सत्य प्रती. |
| (१३) | येळसे | दप्तर उपलब्ध नसलेले | पंस/जा.क्र.७६८/१५ दि.२०-७-२०१५ | (१) मुंबई ग्रा.पं.अधिनियम १९५८ यातील कलम १७९ अन्वये तत्कालिन ग्रामसेवक श्री. एस. एन. कचरे यांचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर.<br>(२) नियमानुसार कारवाईचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सोबत छायांकित सत्य प्रती. |

(२) ग्रामनिधी योजनेअंतर्गत एकूण ११ प्रकरणे प्रलंबित होती त्यापैकी ७ प्रकरणे आर्थिक कारणासाठी प्रलंबित होती. त्यातील रू.३,१०,२२६/- पैकी अद्यापपर्यंत ७प्रकरणांची रू.१,०७,५५९/- वसुल केली असून रक्कम रू.१,४३,७६७/- समायोजित करणेत आलेली आहे. उर्वरित रक्कम रू.५८,९००/- तत्कालीन सरपंच यांचे मिळकतीवर बोजा चढविणेत आलेला आहे. तसेच दप्तर उपलब्ध नसलेले एकूण ४ प्रकरणे आहेत. त्यातील २ प्रकरणांचे दप्तर उपलब्ध झालेले असून अहवाल लेखा परिक्षणासाठी स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाकडे सादर केलेला आहे. उर्वरित २ प्रकरणांचा मुंबई ग्रा.पं. अधिनियम १९५८यातील कलम १७९ अन्वये कारवाईचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

**ग्रामनिधी**

| अ.क्र (१) | ग्रा.पं. नाव (२) | एकूण रक्कम (३) | वसुल रक्कम (४) | समायोजित रक्कम (५) | शिल्लक रक्कम (६) | मंजुरी आदेश (७) | शेरा (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उकसान | १५८१२ | १०६६२ | ५१५० | ० | जा.क्र.जिप/पंचा/ आस्था/१६/११६२ दि.११/१२/२०१२ | रक्कम वसूल झाली सोबत मंजूरी आदेश. |
| २ | कान्हे | २८९७.२५ | २८९७.२५ | ० | ० | जा.क्र.जिप/पंचा/ आस्था/१६/१३६ दि.२८/१/२०१३ | रक्कम वसूल झाली सोबत मंजूरी आदेश. |
| ३ | थुगाव | ५००० | ५००० | ० | ० | जा.क्र.जिप/पंचा/ आस्था /१५-१६/१११२ दि.१२/६/२०१५ | रक्कम वसूल झाली सोबत मंजूरी आदेश. |
| ४ | वराळे | १४४५२ | ५८३२ | ८६२० | ० | जा.क्र.जिप/पंचा/ आस्था/१५-१६/११२१ दि.१२/६/२०१५ | रक्कम वसूल झाली सोबत मंजूरी आदेश. |
| ५ | वडगाव | ३००८७ | ५९ | ३००२८ | ० | जा.क्र.जिप/पंचा/ आस्था/१५-१६/११२० दि.१२/६/२०१५ | रक्कम वसूल झाली सोबत मंजूरी आदेश. |
| ६ | पाटण | २००१ | १७५ | १८२६ | ० | जा.क्र.जिप/पंचा/ आस्था/१५-१६/१११९ दि.१२/६/२०१५ | रक्कम वसूल झाली सोबत मंजूरी आदेश. |
| ७ | मळवंडीढोरे | २३९९७७ | ८२९३४ | ९८१४३ | ५८९०० | | तत्कालीन सरपंच श्री. काशिनाथ किसन ढोरे, मु.मळवंडी ढोरे, ता.मावळ यांचे मिळकतीवर रू.५८९००/- चा बोजा दाखल करणेत आलेला आहे. सोबत ८-अ चा उतारा तसेच रक्कम रू.१८१०७७/- ची पुर्तता करून प्रस्ताव जि.प.कडे मंजूरीसाठी सादर. |
| | एकूण | ३१०२२६ | १०७५५९ | १४३७६७ | ५८९०० | | |

| अ.क्र. (१) | ग्रा.पं.नाव (२) | (३) | मंजुरी आदेश (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| ८ | वारू | दप्तर उपलब्ध नसलेले | जा.क्र.१२४/२०१५ दि.१८/५/२०१५ | दप्तर उपलब्ध झालेले असून अहवाल जि.प.कडे सादर केलेला असून स्थानिक निधी लेखापरिक्षणास तपासणीसाठी विनंती करणेत आलेली आहे. |
| ९ | आढले बु. | दप्तर उपलब्ध नसलेले | पंस/जा.क्र.१४९/१५ दि.१५/६/१५ | दप्तर उपलब्ध झालेले असून अहवाल जि.प.कडे सादर केलेला असून स्थानिक निधी लेखा परिक्षणास तपासणीसाठी विनंती करणेत आलेली आहे. |
| १० | येळसे | दप्तर उपलब्ध नसलेले | पंस/जा.क्र.७६८/१५ दि.२०/७/१५ | (१) मुंबई ग्रा.पं. अधिनियम, १९५८यातील कलम १७९ अन्वये तत्कालिन ग्रामसेवक श्री.एस.एन.कचरे यांचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर (२) नियमानुसार कारवाईचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सोबत छायांकित सत्यप्रती. |
| ११ | दिवड | दप्तर उपलब्ध नसलेले | पंस/जा.क्र./७६८/१५ दि.२०/७/१५ | (१) मुंबई ग्रा.पं. अधिनियम, १९५८यातील कलम १७९ अन्वये तत्कालिन ग्रामसेवक श्री.बी. आर. कांबळे यांचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर. (२) नियमानुसार कारवाईचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सोबत छायांकित सत्यप्रती. |

**(१) जिल्हापरिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे (परिच्छेद क्रमांक ३.८१२) (२०११-१२)**

ग्रामपंचायतीकडील संशयित अफरातफर प्रकरण व लेखापरिक्षणास दप्तर उपलब्ध करून न दिल्याबाबतच्या ग्रामपंचायतीबाबत.

पंचायत समिती इंदापूर यांचे सन २०११-१२ च्या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण केले असता ग्रामपंचायत विभागाकडील ग्रामपंचायत अपहार प्रकरणाची नस्ती तपासली असता खालीलप्रमाणे ग्रामनिधींचे ज.रो.यो.ज.ग्रा.स.यो.सं.ग्रा.रो.यो.व लेखापरिक्षणास दप्तर उपलब्ध करून दिल्याबाबतच्या सद्यस्थिती खालीलप्रमाणे.

**अ-संशयित अपहार प्रकरणाबातची माहिती (ग्रामनिधी)**

| अ.क्र. | ग्रामपंचायत संख्या | वर्षापासून प्रलंबित | संशयित अपहारित रक्कम रुपये | जिल्हा परिषद, पुणे यांचे कडे कार्यवाहीची स्थिती | प्रलंबित रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | २१ | १९६४-६५ ते २००५-०६ | ९५,४१,०२५/- | निरंक | ९५,४१,०२५/- |

**ब-ज.रा.यो/ज.ग्रा.रो.यो. संशयित अपहाराबाबत**

| अ.क्र. | ग्राम पंचायत संख्या | वर्षापासून प्रलंबित | संशयित अपहारीत रक्कम रुपयं | जिल्हा परिषद पुणे यांचेकडे कार्यवाहीची स्थिती | प्रलंबित रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३१ | १९८९-९० ते २००५-०६ | १९,५२,४२०/- | निरंक | १९,५२,४२०/- |

**क-दप्तर लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत**

| अ.क्र. | निधीचे नाव | लेखापरीक्षण वर्ष | ग्रामपंचायत संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामनिधी | १९८९-९० ते २००६-०७ | १० | ग्रामपंचायत लेखापरिक्षण झालेले नाही. |
| २ | ज.रो.यो. | १९८९-९० ते १९९८-९९ | ९ | ग्रामपंचायत लेखापरिक्षण झालेले नाही. |
| ३ | ज.ग्रा.स.यो. | १९९९-०० ते ९८-९९ | ३ | ग्रामपंचायत लेखापरिक्षण झालेले नाही. |
| ४ | सं.ग्रा.रो.यो. | २००२-०३ ते ०३-०४ | ३ | ग्रामपंचायत लेखापरिक्षण झालेले नाही |

मुंबई ग्रामपंचायत नियम १९५९ मधील ६प्रमाणे विस्तार अधिकारी पंचायत यांनी ग्रामपंचातीच्या दप्तरांची तपासणी करून ते योग्य रितीने ठेवण्यात आले किंवा कसे तसेच शासन निधीचा अपहार योग्यते मार्गदर्शन करून निधीचा योग्य विनियोग करणेबाबत दक्षता घेण्यात यावी.

ग्रामनिधी / जरायो / ज.ग्रा.सो.यो./सं.ग्रा.रो.यो./निधीचे अपहार प्रकरण`पाहिली असता वसुलीबाबतची सद्यस्थिती पाहता सदरची कार्यवाही लेखापरिक्षणास अपेक्षित नाही., अपहार प्रकरणात गुंतलेल्या अपहारित रक्कम वसुलीबाबतची ठोस कार्यवाही काय केली ? विस्तार अधिकारी तसेच गट विकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष वसुली करणेबाबत काय कार्यवाही केली याबाबत सविस्तर खुलासा करून पुर्तता दाखवावी.

ग्रामपचायतींचे दप्तर लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही तरी संबंधित ग्रामपंचायतींचे दप्तर उपलब्ध करून देणेबाबत विस्तार अधिकारी यांनी काय कार्यवाही केली ? तरी दप्तर उपलब्ध करून लेखापरिक्षणास सादर करावी.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हापरिषद, पुणे यांचेकडून खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.

पंचायत समिती इंदापूर यांचे सन २०११-१२च्या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात घेतलेल्या आक्षेपांची खालीलप्रमाणे पूर्तता करून खुलासा सादर करीत आहे.

**अ-संशयित अपहार (ग्रामनिधी) प्रकरणाबाबत खालीलप्रमाणे पुर्तता केलेली आहे.**

| अ.क्र | प्रलंबित अपहारीत ग्रा.पं.संख्या | संशयित अपहारित रक्कम | निकाली प्रकरणे संख्या | रक्कम वसूल परंतु निकाली नसलेली प्रकरणे संख्या | एकूण समायोजित/ वसूल रक्कम | प्रलंबित परंतु वसूलीची कार्यवाही प्रकरणे संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | २१ | २३४१०३५ | १३ | ५ | ८५३०२१ | ३ |

एकूण २१ ग्रामपंचायतींची अपहारित रक्कम रुपये ९५,४१,०२५/- नसून ती रक्कम रुपये २३,४१,०३५ इतकी आहे. संशयित अपहार प्रकरणांपैकी ग्राम पंचायत लासुर्णेमध्ये प्रत्यक्षात रू.७,९९,१९३/-ग्राम पंचायतच्या लेखापरिक्षण अहवालात रक्कम नमुद आहे. तथापि पंचायत समितीचे लेखापरिक्षणातही रक्कम रू.७९,९९,१८३/- दाखविली आहे. त्यामुळे रु.७१,९९,९९०/- इतक्या रकमेची तफावत आहे. हे कृपया मान्य होणेस विनंती आहे. प्रलंबित ३ प्रकरणाबाबत वसुलीची कार्यवाही चालू आहे.

**ब-ज.रा.यो/ज.ग्रा.रो.यो.संशयित अपहाराबाबत**

| अ.क्र | प्रलंबित अपहारित ग्रा.पं.संख्या | संशयित अपहारित रक्कम | निकाली प्रकरणे संख्या | रक्कम वसूल परंतु निकाली नसलेली प्रकरणे संख्या | एकुण समायोजित/ वसूल रक्कम | प्रलंबित परंतु वसूलीची कार्यवाही प्रकरणे संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | १४ | १९५२४२० | १४ | - | १४३५७४५ | २ |

शकात नमुद केल्याप्रमाणे एकूण ३१ प्रकरणांपैकी १४ ग्रामपंचायतींचे लेखापरिक्षण पूर्तता करून रक्कम वसूल करण्यात आलेली असून सदर प्रकरणे निकाली काढलेली आहेत. २ ग्रामपंचायतींचे वसूलीची कार्यवाही चालू आहे. तसेच उर्वरीत १५ ग्रामपंचायतींचे दप्तर उपलब्ध नसलेबाबत आक्षेप घेणेत आला होता. त्यामध्ये एक ग्रामपंचायत कालठण नं. १ दुबार आहे. त्याबाबत सविस्तर खुलासा अ. क्र. 'क' मध्ये सादर केलेला आहे.

**क-दप्तर लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत**

| अ.क्र | निधीचे नाव | दप्तर उपलब्ध नसलेल्या ग्रा.पं. संख्या | दप्तर उपलब्ध झालेल्या संख्या | ले.प. झालेल्या ग्रा.पं. संख्या | कोर्ट केस ग्रा. पं. संख्या | प्रलंबित परंतू कारवाई प्रस्तावित |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | ग्रामनिधी | ६ | ४ | १ | १ | ० |
| २ | ज.रो.यो. | १२ | ८ | १ | १ | २ |
| ३ | सं.ग्रा.रो.यो. | २ | १ | ० | ० | १ |

वरीलप्रमाणे २० ग्रामपंचायतींपैकी २ ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण झाले असून १३ ग्रामपंचायतींचे दप्तर लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. तसेच ३ ग्रामपंचायतींचे दप्तर उपलब्ध करून मिळणेबाबत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम १७९ अन्वये कारवाई प्रस्तावित आहे. व २ ग्रामपंचायतींचे दप्तर कोर्टात जमा आहे.

वरील संशयित अफरातफर प्रकरण व लेखापरीक्षणास दप्तर उपलब्ध न करून दिलेबाबत संबंधित ग्रामसेवकांवर प्राासकीय कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच अपहारीत रक्कम वसूल करून ती ग्रामपंचायतींच्या खात्यांमध्ये जमा करण्यात आलेली आहे. जी रक्कम समायोजीत करावयाची होती. त्याची पडताळणी व खात्री करून त्या रक्कमा समायोजीत करण्यास मान्यता दिलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

पुणे जिल्हा परिषदेकडून वरील तीनही आक्षेपावर प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० व ११ ऑगस्ट, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, परिच्छेद क्र. ३.१०४० मध्ये अपहाराच्या एकूण प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम रू. १,९९,७३,९०४/- ची वसुली पूर्ण पणे केव्हा होईल, सदर वसुली अद्याप न होण्याची कारणे काय आहेत व त्यास कोण जबाबदार आहे, अशा प्रकारच्या अपहार प्रकरणांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून जिल्हापरिषदेने कोणते प्रतिबंधात्मक उपाय योजले आहेत? तसेच परिच्छेद क्र. ४.३५२ मध्ये पुणे जिल्ह्यातील एकूण १० पंचायत समित्यांकडील ग्रामनिधीची १६९ व जवाहर योजनेची २०३ अशा एकूण ३७२ प्रकरणांमध्ये एकूण रू. ४,९१,२९,१३४/ इतकी रक्कम अडकली आहे, ही संपूर्ण रक्कम वसूल केव्हा होणार आहे? आणि परिच्छेद क्र. ३.८१२ मध्ये अफरातफरीची २१ प्रकरणे होती. लेखा परीक्षणाच्या वेळी १९६४-६५ ते २००५-०६ या कालावधीतील ग्रामनिधीच्या संशयित अपहाराची प्रलंबित रक्कम रुपये ९५,४१,०२५/- इतकी दर्शविली होती. परंतु प्रत्यक्षात ग्रामनिधीच्या संशयित अपहाराची प्रलंबित रक्कम ही २३,४१,०३५/- इतकी आहे, ही संपूर्ण रक्कम वसूल केव्हा होणार आहे ?

यावर संबंधित अधिका-यांकडून समितीला समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही. अतः ज्याप्रकरणी अपहार झाल्याचे सिध्द झालेले आहे अशा प्रकरणी फौजदारी कारवाई करावी. हा विषय गंभीर आहे. या सर्वप्रकरणांच्या संदर्भात चौकशी करून कारवाई करावी आणि त्या संदर्भातील अहवाल समितीला सादर करण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

**यासंदर्भात समितीने २१ डिसेंबर, २०१५ रोजी विधानमंडळाच्या उभय सभागृहास आपला पाचवा अहवाल सादर केला. सदर अहवालात समितीने पुढीलप्रमाणे अभिप्राय व शिफारशी केल्या :-**

विभागीय साक्षीच्या वेळेला विभागीय सचिवांनी या प्रकरणी माहिती देताना समितीस असे सांगितले की, प्रलंबित प्रकरणांमध्ये सन १९६० पासूनची प्रकरणे असून यामध्ये काही बाबी संशयास्पद प्रकारच्या आहेत. जुने रेकॉर्ड मिळत नाहीत, संबंधित कर्मचारी मयत झालेले असणे, छोट्या रकमा वसूल होण्याची शक्यता नसणे या रकमांना सरसकट माफी माफ करण्याची आवश्यकता इत्यादी बाबी समितीसमोर आलेल्या आहेत. जुन्या प्रकरणांमध्ये वसुली होत नसल्यामुळे वसुलीसाठी प्रयत्न न करणे हे समितीला पटणारे नाही. शासनाचा अपहारीत पैसा हा कुठल्याही परिस्थितीत कोणालाही माफ करता येणार नाही कारण तो जनतेचा पैसा आहे. सदरच्या रकमा वेळीच वसूल करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची असल्याने त्या विभागाने वेळीच कार्यवाही केली असती तर हे प्रश्न आजच्या घडीला समितीसमोर उपस्थित झाले नसते म्हणून या विषयासंदर्भात शासनाने कठोरपणे यापुढील काळात निर्णय घेणे आवश्यक आहे आणि जुन्या बाबीची पुनरावृत्ती न होता अशा अपहारीत किंवा गैरव्यवहारांच्या प्रकरणांमध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये ६ महिन्याच्या आत संबंधित अपचारीत कर्मचा-यांच्या विरोधास संपूर्णपणे चौकशी करुन प्रक्रण निकाली काढण्या संदर्भात शासनाने सर्वंकष परिपत्रक राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना निर्गमित करावे अशी समितीची शिफारस आहे.

सन २००८-०९ मधील लेखा परिच्छेद क्र. ३.१५/ ३.१६/ ३.८०/ ३.४९९/ ३.३४७/ ३.१९४/ ३.५००/ ३.७३७/ ३.१०३७/ ४.३१३/ ५.३३(८)/ ३.१०४०/ ४.३५२/ ५.३३(५) इत्यादी लेखा परिच्छेद तसेच सन २०११-१२ मधील लेखा परिच्छेद क्रमांक ३.१८/ ३.९५/ ३.४०५/ ३.६०१/ ३.७०६/ ३.८१२/ ४.११/ ४.१३४/ ३.१३५/ ४.२२८/ ४.२८५/ ४.३४५/ ४.२४६ याप्रकरणी निर्यय घेत असताना एकत्रित चर्चेला घेतले. समितीने राज्यातील विविध जिल्हा परिषदांना भेट दिली असता ज्या जिल्हा परिषदांमध्ये गैरव्यवहार व अपहाराची प्रकरणे उघडकीस आलेली आहेत. सदरची प्रकरणे जुनी असून सन १९५९ पासून प्रलंबित आहेत. या प्रकरणांमध्ये शासनाचा कोटयवधी रुपयांचा निधी अडकून पडलेला आहे. या प्रकरणांमध्ये गैरव्यवहार व अपहार सिध्द होऊनही अद्याप पावेतो अपहारीत रकमा संबंधित जिल्हा परिषदांना शासन खाती जमा करण्यात आलेल्या नाहीत. या गैरव्यवहार अथवा अपहारांची चौकशी न होण्याची अनेक कारणे आहेत. संबंधित अधिकारी यांचा मृत्यू झालेला आहे, ते सेवानिवृत्त झालेले आहेत. काही कर्मचा-यांची त्या ठिकाणाहून इतरत्र बदली झाली असून ते इतर जिल्हयात सेवा करीत आहेत. सदरची वसूलपात्र रक्कम कोटयवधी रुपयांच्या घरात असल्याने मयत झालेल्या लाभार्थी व कर्मचारी वगळता इतर सर्वांकडून ती वसूल करुन समायोजित

करणे आवश्यक आहे. सदरच्या प्रकरणनिहाय रकमा सुमारे काही हजार ते लाखोच्या घरामध्ये आहेत. अशावेळी ज्या छोटयाछोटया रकमा आहेत. सुमारे १० हजार रुपयांच्या आसपासच्या रकमा वसूल होण्यास विलंब होत असल्याने संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचा-यांविरुध्द तातडीने प्रशासकीय कार्यवाही करणे गरजेचे आहे. या प्रशासकीय कार्यवाहीमध्ये शासनाचेजेवढे नुकसान झाले आहे, त्या प्रमाणात वेतनवाढी रोखणे किंवा योग्य प्रशासकीय कार्यवाही त्या कालावधीतील कर्मचा-यांविरुध्द करणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणामध्ये दोन पेक्षा जास्त कर्मचारी एकत्रितरित्या गुंतले आहेत व रक्कम सुमारे २५ हजाराच्या आसपास आहे अशा कर्मचा-याकडून प्रथमतः वसूलीसाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे. वसूली होत नसल्यास प्रशासकीय कार्यवाही करुन संबंधित कर्मचा-यांविरुध्द वेतनवाढी रोखण्याची कार्यवाही करुन ही रक्कम शासनखाती जमा करणे आवश्यक आहे. काही प्रकरणामध्ये रक्कम ५-१० हजाराच्या आसपास असते. अशा प्रकरणामध्ये फौजदारी गुन्हे दाखल केल्यास त्यात वकीलाची फी मोठया प्रमाणावर द्यावी लागते. अशा प्रकरणात फौजदारी गुन्हे दाखल न करता प्रशासकीय स्वरुपाची कडक व कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. अशा कर्मचा-यांची वेतन वाढ रोखून सेवा पुस्तिकेत तशी नोंद घेऊन प्रसंगी त्यांच्या पदोन्नतीवर परिणाम होईल, यादृष्टीने जिल्हा परिषदेने कार्यवाही करणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत अशी प्रकरणे तातडीने निकाली काढून संबंधित जिल्हा परिषदेने कार्यवाही करणे आवश्यक आहे. वर्षानुवर्षे ही प्रकरणे प्रलंबित राहिल्यास त्यामध्ये शासनाचा निधी नाहक अडकून पडतो. म्हणून अशी सर्व प्रकरणे पडताळणीकरुन गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात यावी. प्रलंबित प्रकरणामध्ये शासनाचा निधी त्वरेने वसूल करण्याबाबत शासनाने नवा शासन निर्णय किंवा सर्वंकष परिपत्रक सर्व जिल्हा परिषदांना निर्गमित करण्याची कारवाई तातडीने करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

उपरोक्त सर्व बाबीसंदर्भात शासनाने कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

**ग्रामपंचायतीतील संशयीत अपहारबाबत.**

(१) **ग्रामनिधी:**-पंचायत समिती शिरुर विकास गटातील ग्रामनिधीचे एकूण १४ ग्रामपंचायतीचे प्रकरणांपैकी ९ प्रकरणामधील अपहारीत रक्कम वसुल किंवा समायोजित करुन प्रकरणे पंचायत राजसमितीच्या भेटीपुर्वी निकाली काढण्यात आली होती. (सोबत आदेश जोडण्यात आले आहेत) उर्वरित ५ प्रकरणांमधील अपहारित रक्कम रुपये १, ९३,१५४.२१ वसुल व समायोजित करुन तेही निकाली काढणेत आलेली आहेत.

| अ.क्र. | ग्रामपंचायतीचे नाव | वसूल केलेली रक्कम |
|---|---|---|
| १ | बाबुळसर बु. | १,३७,८९९ |
| २ | केंदूर | ८,७२० |
| ३ | पिंपळेजगताप | १५,४२० |
| ४ | केंदूर | २१,५५५ |
| ५ | खंडाळे | १०,६४५ |
| | एकूण . . | १,९४,२३९ |

(२) जवाहर रोजगार योजनेच्या ६ प्रकरणांपैकी ५ प्रकरणे अपहारित रक्कम समायोजित करुन घेवुन निकाली काढण्यात आलेली आहेत. या प्रकरणातील ग्रामसेवक श्री आर. एस. जगताप हे मयत आहेत. त्यांच्या जागेवर अनुकंपा तत्वावर त्यांचा मुलगा नोकरीस असुन त्यांच्या पगारातुन रक्कम रु.३६०००/-वेतनातून दरमहा वसूल करणेत आले असुन उर्वरित रक्कम रु.५२,४३०.५० वसुलीची कार्यवाही दरमाहा त्यांच्या वेतनातुन चालु आहे. तसेच शासनाने पंचायत राज समिती लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवालातील ग्रामपंचायतीमधील गैरव्यवहारांच्या प्रकरणांबाबत पंरास-२०१७/प्रक्र. २६/वित्त९/मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक

८.६.२०१७ रोजी सर्वंकष परिपत्रक सर्व जिल्हा परिषदांना निर्गमीत केलेले आहे.

| अ.क्रं. | ग्रां.पं. नाव | वसुल रक्कम/समायोजीत रक्कम |
|---|---|---|
| १ | खंडाळे | ९,२००/- |
| २. | भांबारडे | ८७,४६८/- |
| ३. | शिरुर ग्रामीण | १,५७,२७२/- |
| ४. | आपटी | ३९,४११/- |
| ५. | वडगाव रासाई | ५९,७५०/- |
| ६. | मांडवगणफराटा | २१६९८१.५० |
| | समायोजीत रक्कम . . | ३६,५००/- |

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असून खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

(२) पुणे जिल्ह्यातील अपहार प्रकरणांबाबत पुढीलप्रमाणे खुलासा सादर करणेत येत आहे.

पुणे जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची संशयीत अपहाराची २५४ व लेखापरिक्षणास दप्तर उपलब्ध करुन न दिलेली ८० प्रकरणे होती. त्यापैकी संशयीत अपहाराची १८० प्रकरणांची पुर्तता झालेली असुन ती निकाली काढण्यात आलेली आहेत. उर्वरीत ७४ प्रकरणे अद्यापपर्यंत प्रलंबित आहेत. तसेच लेखापरिक्षणास दप्तर उपलब्ध नसलेल्या प्रकरणांपैकी ५८ ग्रामपंचायतीची दप्तरे उपलब्ध झालेली असुन त्यांचे लेखापरिक्षण करण्यासाठी स्थानिक निधी लेखा परिक्षक, पुणे यांना संबंधित गटविकास अधिकारी यांनी कळविलेले आहे.२२ प्रकरणामधील दप्तर उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

वरील प्रलंबित संशयीत अपहाराचे ७४ आणि दप्तर लेखापरिक्षणास उपलब्ध नसलेली २२ प्रकरणांमध्ये ५३ ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी जबाबदार असून संबधितावर खालीलप्रमाणे कारवाई करणेत आलेली आहे.

| अं.क्रं. | तालुका | प्रकरण संख्या | जबाबदार ग्रामसेवक | केलेली कारवाई |
|---|---|---|---|---|
| १ | आंबेगाव | ९ | ४ | २ मयत, २सेवानिवृत |
| २ | भोर | १० | ६ | २ मयत, २ बडतर्फ, १ सेवेतून कमी, १ वर रू.१०० प्रमाणे दंड वसुली करण्यात आलेली आहे. |
| ३ | दौंड | ० | ० | |
| ४ | हवेली | १८ | ५ | ८ ग्रा.प. १९९७ पूर्वीचे पुणे, पिंपरी चिंचवड म.न.पा.मध्ये समाविष्ट झाले असून सर्व प्रकरणांमधील वसुलपात्र रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. १ मयत, १ बडतर्फ, १ कोर्ट केस सुरू, २ वर रू.१०० प्रमाणे दंड वसुली करण्यात आलेली आहे. |
| ५ | पुरंदर | ० | ० | |
| ६ | खेड | २३ | १२ | ५ मयत, १ मालमत्तेवर बोजा दाखल ४ सेवानिवृत्त, २ वर रू. १०० प्रमाणे दंड वसुली करण्यात आलेली आहे. |
| ७ | मुळशी | ६ | १ | ४ ग्रा.प.चे मूळ लेखापरिक्षण अहवाल उपलब्ध नाहित.१ ग्रामसेवक सक्तीने सेवानिवृत्त |
| ८ | मावळ | २ | ५ | २ मयत, ३ वर रू.१०० प्रमाणे दंड वसुली करण्यात आलेली आहे. |
| ९ | जुन्नर | १२ | ६ | १ मयत, २ फौजदारी गुन्हे दाखल, ३ जणांच्या मालमत्तेवर बोजा दाखल, |
| १० | वेल्हा | १५ | १२ | ६ मयत, २ बडतर्फ, १ वेतनवाढ बंद, २ सेवानिवृत्त. |

वरीलप्रमाणे ९६ प्रकरणांमधील जबाबदार ५३ ग्रामसेवकांपैकी १९ ग्रामसेवक मयत,७ बडतर्फ आहेत.३ ग्रामसेवकांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे, २ ग्रामसेवक सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आलेले आहेत.१ ग्रामसेवकाची वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे, ४ ग्रामसेवकांचे मालमत्तेवर बोजा दाखल करण्यात आलेला आहे, १ ग्रामसेवकाचे सेवानिवृत्ती वेतनातून १ वर्षासाठी १/१० वेतन कपात करण्यात आलेली आहे व ८ ग्रामसेवक ५ वर्षापेक्षा अधिक कालावधीपूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत.दप्तर उपलब्ध नसलेल्या ६६ प्रकरणांमधील ८२ ग्रामसेवकांकडून रक्कम रू.१००/-प्रमाणे दंड वसुल करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असून खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे ?**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :**-जिल्हा परिषदेच्या खुलाश्यास सहमती दर्शविण्यात येत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेच्या सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत पाचवा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने अशी विचारणा केली की, गैरव्यवहारातील रक्कम वसुल करण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, रक्कम वसूल केलेली आहे.

तद्नंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अशी सुचना केली की, अफरातफरीमध्ये संशयित अपहार असतो. ऑडिटमध्ये व्हाउचर मॅरिलन्स असतात आणि ऑडिटर म्हणतात की, हा संशयित अपहार आहे. त्यानंतर ते व्हाउचर कुठून आणतात माहीत नाही. रत्नागिरीमध्ये जवळपास २ कोटी रुपयांचे समायोजन आढळलेले आहे. समायोजन म्हणजे ॲडजस्टमेंटच आहे. मुळात त्या व्हाउचरचे लेखा परिक्षण झालेले नाही. असे आदेश काढलेले आहेत की, जिथे तुम्ही समायोजन करता तिथे आधी लेखा परिक्षण करुन मग समायोजन करावे. आपण जसे १०० रुपये दंड आकारणी करुन सुटून जाऊ शकतो तसे नंतर समायोजन पण करेल.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, समायोजनाची मी काही प्रकरणे बघितली आहेत, समजा टँकरचे बिल असेल आणि त्याला अंतराच्या पावत्या दाखवल्या नाही किंवा जीपीएस बद्दलचा दाखला दिलेला नाही. ते पूर्णच रक्कम आक्षेपित करुन टाकतात. पूर्ण महिनाभर चाललेल्या टँकरला ६० ते ७० हजार रुपये आक्षेप आहे असे ते म्हणतात. आता ती पावती दाखवली आणि जीपीएस असल्याचे प्रमाणपत्र दाखवले तर तो अपहार नसतो. मग ते ६० हजार रुपये आपण समायोजित करतो. अशा प्रकरणांमध्ये आपण जर पुन्हा लेखा परिक्षणाची अट जर घातली तर त्या रकमा तशाच खूप दिवस पडून राहतील. त्यामुळे ग्रॉस रक्कम आपल्याला खूप मोठी दिसेल म्हणून या जिल्ह्यात एवढा अपहार झाला काय हे आपल्याला सायकॉलॉजिकल वाटत राहील.

तद्नंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी माहिती दिली की,आपण सांगताते फक्त पंचायत समिती, जिल्हा परिषदेसाठी आहे. ही रक्कम आपण तात्पुरती अमान्य करता तर यामध्ये तात्पुरती अमान्य वेगळा व संशयीत अपहार वेगळा आहे. संशयीत अपहाराची प्रकरणे ही ग्रामपंचायतीमध्ये उपस्थित होतात. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीला फक्त तात्पुरती अमान्य करता येतात. यांचा कम्पलायन्स आम्ही पाहतो पण ग्रामपंचायतीचा जो कम्पलायन्स आहे तो उप मुख्य कार्यकारी अधिकारी बघतात आणि आमच्या असे लक्षात आले की, अशा रकमा समायोजित केलेल्या आहेत. त्या वेळेस लेखा परिक्षकाला व्हाउचर म्हणजे प्रमाणकच माहीत नसतात. आपण सांगितले ते त्याचा एक भाग झाला आहे.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यांचे म्हणणे आहे की, ही एक बॅलेन्सिक गोष्ट आहे. ब-याच प्रकरणांमध्ये टँकर गेले होते पण असे यांनी बोलता बोलता असे सांगितले की, रत्नागिरी येथे २ कोटी समायोजन झाले आहे. यासाठी असे कोणते सिस्टिम बसवायचे की, यापण बाजूने होऊनये आणि सीईओ यांच्या म्हणण्याप्रमाणे जाणूनबुजून गैरव्यवहार होत आहे असे लोकांना वाटते. तर मला असे वाटते की, यामध्ये बॅलेन्स असे होऊ शकते की, समायोजन करण्याचे अधिकार अंतिमतः सीईओंना आहेत. त्या प्रमाणे त्यांना समायोजन करु द्या. आपण जेव्हा पुढच्या वेळी जाऊ तेव्हा मागच्या वेळी जे काही समायोजन झाले त्याच्या वेगाने सॅम्पल ऑडिट करावे. ग्राम पंचायत किंवा डेप्युटी सीईओ पातळीवर समायोजन झाले आणि त्यांच्या पातळीवरचे रेकॉर्ड सापडत नसेल तर ती खूप मोठ्या संशयाची बाब आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, ग्रामपंचायत स्तरावर समायोजन होते आणि ते न बघता डेप्युटी सीईओ मान्य करतात. आता आपण या रकमा वसूल केल्या आहेत म्हणजे कुठेतरी दोष आहे किंवा अनियमितता झाली म्हणून त्या वसूल केल्या आहेत. वसूली किंवा समायोजन यामध्ये दोष सिद्ध झाला आहे तर आपण यावर प्रशासकीय कार्यवाही का केलेली आहे,

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, याची माहिती प्रकरण निहाय काढून कारवाई करतो. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हे एक साधे प्रकरण आहे. कारण यामध्ये कोणालाही समजेल की, पैसे वसूल केले म्हणजे दोष सिद्ध झाला आहे म्हणून वसूली केली आहे. अन्यथा वसूली करण्याचे काही कारणच नव्हते. सन २०१५ ला ऑडिट झालेले आहे तर तेव्हाच त्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्याचे विभागाचे काम होते. आता सन २०१८ सुरु आहे आणि आपण ॲक्शन टेकनला आलो आहोत. पण ते अजूनपर्यंत केलेले नाही. मग हे काम सीईओंनी करायला हवे होते तर ते का केले नाही,

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, यावर ॲक्शन घेणे क्रमप्राप्त आहे. जर ती ॲक्शन घेतली नसेल तर पुढच्या २ महिन्यात ती घेणे क्रमप्राप्त आहे. तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, याविषयावरील डिटेल माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. ब-याच लोकांवर बडतर्फी आणि त्यानंतर त्यांना कंम्पलसरी सेवा निवृत्त करणे याबाबतची कार्यवाही केलेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत ग्राम पंचायतीतील गैरव्यवहाराची प्रकरणे या लेखा परिक्षणामधील परिच्छेदामध्ये सन १९६० पासूनची प्रकरणे आहेत. जुने अभिलेखे नसणे, संबंधित कर्मचारी मयत असणे, छोटया रकमा वसूल होण्याची शक्यता नसणे या रकमांना सरसकट माफी करण्याची आवश्यकता इत्यादी बाबी समिती समोर आल्या आहेत. उपरोक्त प्रकरणामध्ये शासनाचा कोटयावधी रुपयांचा निधी अडकून पडलेला आहे. या प्रकरणांमध्ये गैरव्यवहार व अपहार सिध्द होऊनही अपहारित रकमा संबंधित जिल्हा परिषदांच्या शासन खाती जमा करण्यात आलेल्या नाहीत. ज्या प्रकरणामध्ये दोनपेक्षा जास्त कर्मचारी एकत्रित गुंतले आहेत व रक्कम सुमारे २५ हजारांच्या आसपास आहे. अशा कर्मचा-यांकडून प्रथमतः वसुली साठी कार्यवाही करण्यात यावी रक्कम रुपये ५ ते १० हजारांच्या आसपास असल्यास फौजदारी गुन्हे दाखल केल्यास वकीलाची फी मोठया प्रमाणावर दयावी लागते अशा प्रक रणात फौजदारी गुन्हे दाखल न करता प्रशासकीय स्वरुपाची कठोर कारवाई करण्यात यावी. याप्रकरणी सर्वकष परिपत्रक सर्व जिल्हा परिषदांना निर्गमित करण्यात यावे अशी शिफारस समितीने केलेली होती. याशिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेला लेखी माहितीमध्ये पंचायत समिती शिरुर विकास गटातील ग्रामनिधीचे एकूण १४ ग्रामपंचायतीच्या प्रकरणापैकी ९ प्रकरणामधील अपहारित रक्कम वसूल/समायोजित करण्यात आली आहे. उर्वरित ५ प्रकरणामधील अपहारित रक्कम रु.१,९३,१५४/- वसुल व समायोजित करुन निकाली काढणेत आलेली आहे. तसेच जवाहर योजनेच्या ६ पैकी ५ प्रकरणाची अपहारीत रक्कम समायोजित करुन निकाली काढण्यात आलेली आहे. उर्वरित एक प्रकरणाची वसुली करण्यात यावी. पुणे जिल्हयातील ग्रामपंचायतीची अपहाराची २५४ व लेखा परिक्षणास दप्तर उपलब्ध करुन न दिलेली ८० प्रकरणे होती. संशयित अपहाराची १८० प्रकरणांची पूर्तता झालेली असून निकाली काढण्यात आली आहेत. उर्वरित ७४ अपहाराची प्रकरणे तसेच दप्तर उपलब्ध नसणे, उर्वरित २२ प्रकरणांमधील ५३ ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांच्या जबाबदारी निश्चित करुन रक्कमेची वसुली केल्याप्रकरणी समिती समाधान व्यक्त करते.

**अफरातफरीमध्ये संशयित अपहार झालेला असतो लेखा परिक्षणाच्या वेळी ज्या पावत्या दिल्या जातात त्या पावत्या कोठून उपलब्ध करण्यात येतात याची माहिती प्राप्त होत नाही. यासाठी जे समायोजन करण्यात येते ते एक प्रकारे पावत्या जूळवून घेण्यासाठी केलेले असते. मुळ पावत्यांचे लेखा परिक्षण झालेले नसते त्यामुळे ज्याठिकाणी समायोजन करण्यात येते त्याठिकाणी आधी लेखा परिक्षा करुन मग समायोजन करण्यात यावे कारण अशा प्रकरणामध्ये नाममात्र १०० रुपये दंड आकारुन सुटका होऊ शकते नंतर समायोजन सुध्दा करता येते त्यामुळे असे प्रकार लेखा परिक्षणामध्ये वारंवार राज्यामध्ये घडून येत असल्याने याप्रकारांना कायमचा पायबंद घालण्यात यावा यासाठी ग्रामविकास विभागाने व वित्त विभागाने लेखा परिक्षणावेळी सादर करण्यात येणारे अभिलेख, कागदपत्रे, पावत्या इत्यादीची सत्यता पडताळून पाहण्याच्या प्रचलित निकषामध्ये सुधारणा कराव्यात जेणेकरुन अपहार करुन समायोजन करता येणार नाही अथवा नाममात्र दंड आकारण्या ऐवजी प्रकरणाचे स्वरुप लक्षात घेऊन दंड आकारण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण पाच

# जिल्हा परिषद, पुणे

## शौचालय अनुदानाबाबत (ग्रामपंचायत, कारी, तालुका भोर, जिल्हा पुणे)

**परिच्छेद क्रमांक ५.३३ (सन २००८-०९)**

ग्रामपंचायतीने सन २००१-०२ मध्ये प्राप्त शौचालय अनुदानातून रक्कम रुपये २५१५००/- खर्च केला आहे. त्याबाबत खालील प्रमाणे आक्षेप देण्यात येत आहे.

१. प्रमाणक क्र. २ ते १२, १३, १४ ते ६१, ६२ व ६३ ते ७३ अशा एकत्र नोंदी घेऊन रोकड वही मध्ये रक्कम रुपये २५१५००/- खर्च नोंदविलेला आहे. लाभार्थ्यांची नावे नमुद केलेली नाही व सदरची रक्कम नावे स्वतः धनादेशाने काढली सहप्रमाणक क्रं. २ ते ७३, लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही. यावरुन रक्कम रुपये २५१५००/- शौचालय मुल्यांकन व मोजमाप पुस्तके चा अपहार झालेला आहे. त्याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, पुणे यांचे कडून खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.**

लेखा परिक्षण शकामध्ये नमुद केलेल्या प्रमाणकांची उपलब्धता संबंधित ग्रामसेवक यांचेकडून ग्रामपंचायतीकडे झालेली असून सदरच्या प्रमाणकान्वये ग्रामपंचायतीने खर्च केलेल्या रक्कमेची ग्रामपंचायतीने प्रत्यक्ष खात्री केलेली आहे. ज्या लाभार्थींना शौचालय बांधकामानंतर अनुदान देणेत आलेले आहे.त्याला भार्थीची शौचालये त्या कालावधीत पुर्ण झालेली होती व ती वापरातही होती याची खात्री झाले नंतर मा. गटविकास अधिकारी पं. स. भोर यांचेकडुन जमा झालेले शौचालय अनुदान ग्रामपंचायतीने प्रती लाभार्थी रु. ३५००/- याप्रमाणे दिलेले आहे. सदर अनुदान वाटपामध्ये ग्रामपंचायतीकडून अपहार अथवा अनियमितता झालेली नाही. याची खात्री ग्रामपंचायतीने केलेली आहे. सदर नस्ती उपलब्ध झालेली असुन त्या प्रमाणकाच्या सत्य प्रती सोबत सादर केलेल्या आहेत. सदर लाभार्थीची नावे रोज किर्दवर नमुद केलेली असुन रोज किर्दीच्या झेरॉक्स सत्य प्रत सोबत सादर केलेली आहे. एकंदरीत सदर शकामधील सर्वप्रमाणके असून शकाची पुर्तता झालेली आहे.

वैयक्तिक शौचालय बांधकाम कार्यक्रम सन १९९५-९६ ते २०००-०१ अंतर्गत सदर शौचालयाची बांधकामे करणेत आलेली असून त्या कालावधीमध्ये शौचालयाचे अंदाजपत्रक घेतले जात नव्हते व मुल्यांकनाबाबत संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांनी लाभार्थीने बांधलेल्या शैचालयाची पाहणी करुन शौचालय अनुदान वाटपाची पध्दत होती. त्यानुसार ग्रामपंचायतीने प्रत्यक्ष खात्री करुन शौचालयाचे अनुदान लाभार्थींना वाटप केलेले आहे. ज्या लाभार्थ्यांना अनुदान वाटप केलेले होते त्यांची पोहोच प्रमाणकांवर घेणेत आली होती.त्याची सत्य प्रत सोबत सादर केली आहे. तसेच ग्रामसेवक व सरपंच यांचा शौचालय वापरात असले बाबतचा पाहणी अहवाल सोबत सादर केला आहे. सदर शकामध्ये कोणताही अपहार झालेला नाही.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा) जि. प. पुणे यांचे कडील आदेश क्र. जिप/पंचा/आस्था-१६/१४९/२०१२, दि.३०/१०/१२ अन्वये ग्रामपंचायत कारी येथील शकात नमुद केले प्रमाणे रु. २५१५००/- चे समायोजन केलेले आहे. सोबत सदर आदेशाची सत्य प्रत सादर केलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

पुणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी साक्ष घेतली. सदरहू साक्षीत लेखा परीक्षणाच्या वेळी सह प्रमाणक क्र. २ ते ७३ उपलब्ध करुन देण्यात आले नाही. त्यामुळे या कामामध्ये रुपये २,५१,५००/- शौचालय मूल्यांकन व मोजमाप पुस्तिकेचा अपहार झाल्याचे दिसून येते. त्यामुळे या अपहाराची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे, असा लेखापरीक्षणात आक्षेप काढण्यात आलेला आहे. याबाबत जिल्हा परिषदेचा खुलासा काय आहे, यावर गट विकास अधिकारी, भोर यांनी समितीस विदीत केले की, हा परिच्छेद सन २००७-०८ च्या लेखा परीक्षणातील आहे. ग्रामपंचायतीने लेखा परीक्षणाच्या वेळी आवश्यक ती कागद पत्रे उपलब्ध करुन दिली नाही असा आक्षेप होता. परंतु नंतर च्या कालावधीत लेखा परीक्षणासाठी दप्तर उपलब्ध करुन दिले आहे. त्यानुसार रुपये २,५१,५००/ इतक्या रकमेचे समायोजन केले आहे. सदरहू समायोजनास दि. ३०/१०/२०१२ अन्वये मान्यता दिली आहे.

समितीने आणखी विचारणा केली की, लेखा परीक्षणाच्या वेळी दप्तर उपलब्ध करुन दिले नाही. लेखापरीक्षकांकडे आवश्यक ती कागदपत्रे सादर न करता परस्पर समायोजन कसे केले, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केलेकी, ग्रामपंचायत, हातनोशी येथील नोंदी मध्ये रुपये २,१७,०६७/- इतक्या रकमेचे समायोजन केल्या बाबतचे दप्तर दाखविले होते. परंतु व्हाऊचर दाखविले नव्हते. हा खर्च गटार दुरुस्ती किंवा दिवाबत्ती यासारख्या अनेक बाबींवरील आहे. या खर्चाच्या समायोजनास ग्रामपंचायत, हातनोशीने दि. ४/१२/२०१० रोजी च्या मासिक सभेत मान्यता दिली आहे. ग्रामपंचायतीच्या कार्यकारिणीनेच याखर्चाच्या समायोजनास मान्यता दिली आहे. तसेच यासंदर्भात विस्तार अधिकारी (पंचायत)यांच्या कडून पडताळणी करुन घेतली आहे. गटविकास अधिकारी, भोर यांनी ग्रामपंचायतीच्या कार्यकारिणीने या खर्चाला मान्यता दिल्यामुळे सदरहू खर्चाचे समायोजन करण्यास परवानगी द्यावी अशी मागणी केल्यामुळेच आम्ही हा खर्च समायोजित केला आहे.

या उत्तरामुळे समितीचे समाधान झाले नाही, समितीने पुन्हा विचारणा केली की, वास्तविक पाहता या ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण झालेले नाही. लेखापरीक्षण झाल्यानंतर सदरहू रकमेचे समायोजन करावयास पाहिजे होते. आपण सर्व व्हाऊचर बघितले आहेत काय, त्यावर मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सर्व पावत्यांची तपासणी केलेली आहे. असे समितीला स्पष्ट केले. समितीने आणखी विचारणा केली की, ग्रामपंचायत, वागजवाडी यांनी सन २००५-०६ ते २००६-०७ या कालावधीत संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, यशवंत ग्रामसमृध्दी योजना, इंदिरा आवास योजना, पाणीपुरवठा व स्वच्छता व १२ वा वित्त आयोग इत्यादी योजनांचे अभिलेखे उपलब्ध न झाल्यामुळे लेखापरीक्षणात आक्षेप घेण्यात आला. सदरहू अभिलेखे उपलब्ध करुन न देता हा परिच्छेद कसा वगळला आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, आता दप्तर लेखा परीक्षणासाठी उपलब्ध झाले आहे. याबाबत लेखा परीक्षकांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. हा परिच्छेद आम्ही वगळलेला नाही.

समितीने सदरहू उत्तरावर नाराजी व्यक्त केली, समितीच्या मते अशा बाबींवर कोठेतरी बंधन राहिले पाहिजे. या परिच्छेदा बाबतची माहिती जिल्हा परिषदेने जिल्ह्याच्या लेखापरीक्षकांकडून तपासून घ्यावी. असे निदेश समितीने दिले.

समितीच्या मते ग्रामपंचायत, कारी येथील शौचालय अनुदानाबाबत प्रमाणकांच्या नोंदी घेऊन रोकड वही मध्ये रक्कम रुपये २,५१,५००/- खर्च नोंदविलेला आहे. तसेच लाभार्थ्यांची नावे नमूद केलेली नाहीत. सदरहू रक्कम स्वतःच्या नावे धनादेशाने काढली. सहप्रमाणक क्र. २ ते ७३ लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे यामध्ये अपहार झाल्याचे दिसून येते. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामपंचायत, कारी यांनी दिनांक १५/९/२०१०च्या मासिक सभेत सदरहू खर्चास मान्यता दिली आहे.

**या संदर्भात समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीनंतर समितीने दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी विधानमंडळाच्या उभय सभागृहास आपला पाचवा अहवाल सादर केला. सदर अहवालात समितीने पुढील प्रमाणे अभिप्राय व शिफारशी केल्या :-**

'शौचालय अनुदानाबाबत ग्रामपंचायत कारी, ता. भोर, जि. पूणे' परिच्छेद क्र.५.३३ मध्ये प्रमाणक क्र.२ते७३ अशानोंदी घेऊनरोकडवहीमध्येरक्कमरु.२५१५००/- खर्चनोंदवलेला आहे. लाभार्थ्यांची नावे नमूद केलेली नाही व सदरची रक्कम स्वतः धनादेशाव्दारेकाढण्याबाबतची प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही या आक्षेपावर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरनस्ती उपलब्ध झाली असुन प्रमाणकाच्या सत्यप्रती सोबत सादर केल्या असल्याचे समितीस सांगण्यात आले. समितीस लेखापरिक्षकांचे कागदपत्रे सादर न करता परस्पर समायोजन केल्या प्रकरणी समितीने आक्षेप घेतल्यावर लेखा परिक्षकांना समायोजन केल्याचे दप्तर दाखविले होते परंतु प्रमाणके दाखविली नव्हती. खर्चाच्या समायोजनास ग्रामपंचायतीने मासिक सभेने मान्यता दिली असल्याचे समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले. समितीच्या मते या सर्व अनियमीततेवर बंधन आणणे आवश्यक आहे. अतः समितीने या परिच्छेदाबाबतची माहिती लेखापरिक्षकांक्डून तपासुन घेण्याबाबतच्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने सदरहू प्रकरणातील दप्तर पुन्हा तपासणीकरीता लेखापरिक्षकांकडे पाठविले आहे.

प्रस्तुत प्रकरणी समितीने पून्हा अभि लेखलेखापरिक्षकांकडून तपासून घेण्याचे निर्देश दिलेले असले तरी साक्षीचे वेळी सदर आक्षेप लेखा परिक्षक स्थानिकनिधी लेखायांच्या कडून करण्यात आलेला नसल्याचे संचालक, स्थानिक निधी लेखायांनी स्पष्ट केले. सबब सदरहू प्रकरणी लेखापरिक्षक पूणे हे स्थानिक स्तरावर निर्णय घेवू शकणार नसल्यामुळे त्यांनी हे प्रकरण निर्णयासाठी मुख्यालयाकडे पाठविलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी समितीच्या निदेशाप्रमाणे संबंधित सर्व अभिलेखे तीन महिन्याच्या आत लेखापरिक्षकांकडून तपासून घेण्याचे व त्यावरील त्यांचे अभिप्रायावर अनुपालन करुन तसा अहवाल समितीकडे पाठविण्यात यावा अशी शिफारस समिती करीत आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढील प्रमाणे आहे :-**

मा. पंचायतीराज समितीने केलेल्या शिफारशीनुसार ग्रामपंचायत कारी, ता. भोर, जि. पुणे येथील संशयित अपहार प्रकरण स्थानिक निधी लेखापरिक्षा, पुणे यांचे कडून तपासणी करणे कामी या कार्यालयाकडील पत्र क्र. जिप/पंचा/ १५-१६/१३१३/१५ दि.२४/०८/२०१५ (**परिशिष्ट ५.१**) अन्वये सदरचा प्रस्ताव स्थानिक निधी लेखापरिक्षा, पुणे यांना सादर करणेत आलेला आहे.

तसेच या कार्यालयाकडील पत्र दि. २१/१०/२०१५ (**परिशिष्ट ५.२**) दि. २५/०२/२०१६ (**परिशिष्ट ५.३**) व ०३/८/२०१६ (**परिशिष्ट ५.४**) अन्वये प्रस्तावांची तपासणी करणे कामी सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा, पुणे यांस स्मरणपत्र देणेत आलेली आहेत. तथापि संबंधित कार्यालयाकडून लेखापरिक्षण करण्यात आलेले नाही. तसेच या कार्यालयाकडील अर्ध शासकीय पत्र क्र. जिप/पंचा/आस्था-१/१०५७/२०१६, दि.०३/१०/२०१६(**परिशिष्ट ५.५**)व अर्धशासकीय पत्रक्र. जिप/पंचा१२/ ५४/१७दि. २०/०१/२०१७ (**परिशिष्ट ५.६**)अन्वये सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, पुणे यांना कार्यवाही करणेबाबत कळविणेत आले आहे. तसेच या कार्यालकडील पत्रक्र. जिप/पंचा/ १५/४२६/१६, दि. ०८/७/२०१६(**परिशिष्ट५.७**) अन्वये गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भोर यांना सदरचे लेखा परिक्षण करुन घेणेसाठी संबंधीत ग्रामसेवकव विस्तार अधिकारी पंचायतयांना सुचना देणेबाबत कळविणेत आलेले होते. स्थानिक निधी लेखा परिक्षकांकडून अहवाल प्राप्त झालेनंतर त्यानुसार कार्यवाही करणेची दक्षता घेणेत येत आहे. वरीलप्रमाणे खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे.**

**ग्रामविकास विभाग (वित्त४) :-जिल्हा परिषदेच्या खुलाश्यास सहमती दर्शविण्यात येत आहे.**

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेच्या सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत पाचवा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने अशी विचारणा केली की, ग्रामपंचायत, करी, ता. भोर, जि. पुणे यांनी सन २००१-०२ मध्ये प्राप्त शौचालय अनुदानातून रक्कम रुपये २,५१,५००/- एवढा आक्षेप घेण्यात आला होता. त्या संदर्भात समितीने लेखापरिक्षण करुन घेण्यास सांगितले होते, पण अद्याप पर्यंत लेखापरिक्षण झाले नाही किंवा ते करुन घेतले नाही. स्थानिक लेखानिधी कडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे, असे समितीला उत्तर देण्यात आले आहे. हे उत्तर योग्य आहे काय तसेच याबाबत दिनांक २५ फेब्रुवारी, २०१६ आणि दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ या वेळी त्यांनी सहाय्यक संचालक यांना दोन पत्र दिले होते. त्या नंतर दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१७ आणि दिनांक २० जानेवारी, २०१७ या वेळेस प्रस्ताव दिला होता तरी सुद्धा स्थानिक निधी लेखापरिक्षकाकडून अहवाल प्राप्त झाला नाही. या च`काय कारण आहेअशी समितीने विचारणा केली आणि संचालक, स्थानिक निधीलेखा यांनी दिनांक ०५ एप्रिल, २०१७ आणि दिनांक २३ जून, २०१७ अशा दोन वेळेला त्यांनी स्थानिक निधी लेखापरिक्षणाला अभिलेख देण्याबाबत शिफारस केली आहे ही बाब निदर्शनास आणून दिली. या वर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये दफ्तर दिले नसलेली नोंद ८० जणांची होती, त्यापैकी ५८ उपलब्ध करु न दिले आहेत आणि २२ आता पर्यंत झालेले नाही. त्या २२ वर जी काही वसुली करायची आहे, या मध्ये किती सेवानिवृत्त आहेत अशाप्रकारे कोणावर काय कारवाई केली आहे याची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, ग्रामविकास विभागाने सरळ स्थानिक निधी लेखा परिक्षणाकडे ही दखल घेण्याचे सांगितले पण वस्तुस्थितीसाठी याठिकाणी कोण आहे, याचे कारण आपण सांगितले नाही. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, पूर्ण अपहार हा २५४ कोटी रुपयांचा होता आणि त्यामध्ये १८० कोटी रुपयांची वसुली झाली आणि आता फक्त ७४ कोटी रुपये राहिलेले आहेत. स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाने ग्रामविकास विभागाला जी माहिती मागितली ती दिली. स्थानिक निधी लेखा यांचे कडे देखील कार्यवाहीचे मुद्दे असतात आणि स्थानिक निधीलेखापरिक्षक पंचायती राज समितीच्या शिफारशी मान्य करुन घ्याव्यात असा पाठपुरावा करीत असतील तरी अभिलेखे दिले जात नाही.

यावर उप मुख्य कार्यकारी यांनी समितीस विदित केले की,पंचायती राज समिती पुणे जिल्हा परिषदेला भेट देण्यासाठी ऑगस्ट, २०१५ मध्ये आली होती आणि त्यांच्या निर्देशाप्रमाणे दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्हा परिषदेने प्रस्ताव पाठवला आहे. स्थानिक निधी लेखा संचालनालयास शेवट चे स्मरणपत्र दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी दिले होते. दिनांक ६ एप्रिल, २०१८ (**परिशिष्ट ५.८**) तसेच दिनांक ७ मे, २०१८ (**परिशिष्ट ५.९**) रोजीचे स्थानिक निधीलेखा संचालनालयाचे पत्रजिल्हा परिषद पुणे यांना मिळाले आहे.

तद्नंतर विभागीय सचिवांनी विदित केले की, जिल्हा परिषद पुणे यांच्याकडून या प्रकरणामध्ये ज्याची पुर्तता राहिली होती यावर जास्त भर दिला होता. शिक्षणाचे एक प्रकरण आपल्या समोर आले नाही कारण आपण ते प्रकरण पुढे ढकलले आहे. याबाबत पूर्व चर्चा झाल्यानंतर त्या मध्ये असे आढळून आले की, एक विभाग म्हणतो की, आम्ही यांना काही प्रमाणात स्मरण केले आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणतात की, आम्ही त्यांना काही प्रमाणात स्मरण केले त्यामुळे दोघांमध्ये मेळ बसत नाही. श्री. कोहिनकर यांचे म्हणणे आहे की, माहे जानेवारी, २०१८ मध्ये प्रस्ताव पाठविला आहे. पण त्यांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये काही तरी लिहिले याची नोंद त्यांच्याकडे नाही.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ही गंभीर बाब आहे. त्यामुळे यांची नोंद ठेवली पाहिजे कारण दोन ते तीन वेळा स्मरण केल्यानंतरही या गोष्टींची माहिति येत नाही, अहवाल सादर होतनाही याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.

तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की,सुरुवातीला समितीने निर्देश दिल्याप्रमाणे दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ रोजी जिल्हा परिषदेने स्थानिक निधी लेखा परिक्षण विभागाला पत्र लिहिले, त्याची कार्यवाही सुरु झाली आणि वेळोवेळी स्मरणपत्रे देण्यात आली. त्या स्मरणपत्राला प्रतिसाद म्हणून यांनी दिनांक ०७ एप्रिल, २०१५ ला दिलेले पत्र जिल्हा परिषदेला मिळाले आहे. त्यानंतरची पुढची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर लवकरात लवकर सुरु करु. तसेच समितीने निर्देश दिल्यानंतरच दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ रोजी आम्ही लेखापरिक्षणासाठी प्रस्ताव पाठविला आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाचे म्हणणे आहे की, जिल्हा परिषदेने त्यांना अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नाही तर मगयासाठी कोण जबाबदार आहे? यावर मुख्यकार्यकारीअधिकारी यांनी विदित केले की, लेखा परिक्षकांनी हे अभिलेखे तपासून घ्यावेत, असे आदेश त्यांना दिले होते. तद्नंतर समितीने असे मत मांडले की,या प्रकरणाशी निगडीत मुख्य लेखा व वित्त अधिकारी किंवा संबंधित विभाग प्रमुख असतील म्हणजे ज्यांनी प्रमाणपत्र देऊन हे अभिलेखे पाठविले नसतील त्यांच्यावर कारवाई करावी लागेल. या प्रकरणाची चौकशी करुन विलंब करण्यास जे कारणीभूत असतील त्यांच्यावर तात्काळ जबाबदारी निश्चित करा.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद पुणे अंतर्गत ग्रामपंचायत कारी, ता. भोर, जि. पुणे या ग्रामपंचायतीने सन २००१-२००२ मध्ये प्राप्त शौचालय अनुदानातून रक्कम रु. २५१५०० एवढा खर्च केलेला आहे. हा परिच्छेदाचा आक्षेप सन २००७-०८ च्या लेखा परिक्षणातील आहे, यामध्ये रोकड वहीमध्ये रक्कम रुपये २५१५०० खर्च नोंदविलेला आहे, लाभार्थ्यांची नावे नमूद केलेली नाहीत व सदरची रक्कम नावे स्वतः धनादेशाने काढली असून सह प्रमाणक २ ते ७३ लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही. यावरून रक्कम रु. २५१५०० एवढा शौचालय मुल्यांकन व मोजमाप पुस्तकेचा अपहार झालेला आहे असे आक्षेप घेण्यात आलेले आहेत.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात प्राप्त खुलाशामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, प्रमाणकांची उपलब्धता संबंधित ग्रामसेवक यांचेकडून ग्रामपंचायतीकडे झालेला असून सदरच्या प्रमाणकान्वये ग्रामपंचायतीने खर्च केलेल्या रकमेची ग्रामपंचायतीने प्रत्यक्ष खात्री केलेली असून त्या लाभार्थ्यांची त्या कालावधीत शौचालये पूर्ण झालेली होती गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भोर यांचेकडून जमा झालेले शौचालय अनुदान ग्रामपंचायतीने प्रति लाभार्थी रु. ३५०० या प्रमाणे दिलेले आहे. सरपंच व ग्रामसेवक यांनी लाभार्थांच्या शौचालयाची पाहणी करून शौचालय अनुदान वाटपाची पद्धत होती त्यानुसार अनुदान वाटप केलेले आहे. उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या घेण्यात आलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, हा परिच्छेद सन २००७-०८ च्या लेखापरिक्षणातील आहे. ग्रामपंचायतीने लेखा परिक्षणाच्या वेळी

आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाही असा आक्षेप होता. परंतु नंतरच्या कालावधीत लेखा परिक्षणासाठी दप्तर उपलब्ध करून दिले आहे. त्यानुसार रुपये २,५१,५०० इतक्या रकमेचे समायोजन केले आहे. सदरहू समायोजन दिनांक ३०-१०-२०१२ अन्वये मान्यता दिलेली आहे. लेखापरिक्षकांना समायोजन केल्याचे दप्तर दाखविले होते परंतु, प्रमाणके दाखविली नाहीत खर्चाच्या समायोजनास ग्रामपंचायतीने मासिक सभेने मान्यता दिली.

समितीने या परिच्छेदाबाबतची माहिती लेखा परिक्षकांकडून तपासून घेण्याबाबतचे निदेश दिले आहेत. त्यानुसार जिल्हा परिषद पुणे यांनी स्थानिक निधी लेखा परिक्षा, पुणे यांचेकडून तपासणी करणेकामी दिनांक २४-८-२०१५ अन्वये सदर प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच दिनांक २१-१०-२०१५, दिनांक २५-२-२०१६ व ३-८-२०१६ अन्वये प्रस्तावांची तपासणी करणेकामी सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, पुणे यांना स्मरणपत्रे देण्यात आलेली आहेत आणि अर्धशासकीय पत्राद्वारे दिनांक २०-१-२०१७ रोजी स्थानिक निधी लेखा परीक्षा, पुणे यांना कळविण्यात आलेले आहे. तथापि, लेखा परिक्षण करण्यात आलेले नाही यावर स्थानिक निधी लेखा परिक्षण विभागाचे म्हणणे आहे की, पुणे जिल्हा परिषदेने अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाहीत. सदरची बाब लेखे उपलब्ध करून द्यावयाची आहे. **संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अनेकवेळा पत्रव्यवहार करूनही त्यांच्या पत्रांची दखल न घेणे हा एकप्रकारे पुणे जिल्हा परिषदेच्या अधिका-यांचा हा मस्तवालपणा प्रशासकीय दृष्ट्या निश्चितच दखल घेण्याजोगा आहे. यास्तव या प्रकरणी जबाबदार असणा-या वर नमूद अधिका-यांची प्राथमिक चौकशी करून दोषीतांचे खुलाशे मागवून त्यांचेविरूद्ध नियमानुसार शिस्त भंगाची कारवाई प्रस्तावित करावी. या प्रकरणी निगडीत मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच संबंधित विभाग प्रमुख उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) हे जबाबदार आहेत. अनेकवेळा पत्रे देऊनही अभिलेखे लेखापरिक्षणास पाठविली नाहीत ही बाब अत्यंत गंभीर आहे. त्यानुसार या प्रकरणी अभिलेख सादर करण्यास दिरंगाई करणा-या संबंधित तत्कालिन अधिकारी / कर्मचा-यांविरूद्ध तसेच संबंधित ग्रामसेवक ज्यांनी लाभार्थ्यांना अनुदान देऊन शौचालय मुल्यांकन व मोजमाप पुस्तकांचा अपहार केलेला आहे अशांविरूद्ध कठोर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद,पुणे

प्राथमिक शिक्षकांच्या समायोजनाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.९४ (सन २०११-१२)**

शिक्षण विभाग जिल्हा परिषद, पुणे यांनी प्राथमिक शिक्षकांच्या समायोजनाबाबत २०११-१२ मध्ये खालील प्रमाणे आक्षेप आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रंमाक जिपब/प्रक्रं.५११/प्र क्रं १४, दि. १८/५/२०११ अन्वये दिलेल्या निर्देशा प्रमाणे दि. ३० सप्टेबर २०११ अखेर प्राथमिक शिक्षकांचे संदर्भात पदनिश्चिती करून ऑक्टोबर २०११ अखेर समायोजनाची कार्यवाही पुर्ण होणे आवश्यक असताना शासन निर्णयाचे पालन करून पदनिश्चिती व समायोजनात अनियमितता झालेली आहे. एकूण १३ तालुक्यातील ६ तालुक्यामध्ये ५८ प्राथमिक शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरली होती. ७ तालुक्यामध्ये ४१ प्राथमिक शिक्षकांची पदे रिक्त होती त्यामूळे ४१ पदावर समावेशन शक्य असताना ते न केल्यामूळे अनियमितता झाली आहे.

(२) परिच्छेद क्रं ३७अ-पंचायत समिती, दौंड कडील निकषाप्रमाणे मंजूर पदे १००४, दिनांक ३०/९/२०११ रोजीची कार्यरत पदे ९९३ प्रत्यक्षात ११ उप शिक्षक पदे जास्त. शासन निर्णय १८/५/२०११ नुसार आक्टोंबर ११ पर्यत समायोजन करणे आवश्यक असताना समायोजन आदेश दि.२८/२/२०१२ रोजी विलंबाने काढून अनियमितता केलीआहे.

(३) परिच्छेद क्रं ३७ ब-पंचायत समिती बारामतीची आकृती बंधाप्रमाणे मंजूर पदे ८९३ व ४६ पदे समायोजन करून एकूण ९०५ पदे कार्यरत होती. प्रत्यक्षात ३४ पदे रिक्त असताना, १२ प्राथमिक शिक्षकांचे अतिरिक्त समायोजन करून अनियमितता केली.

(४) परिच्छेद क्र. ३७ क-पंचायत समिती आंबेगावची निकषाप्रमाणे शिक्षक आवश्यकता ७६३, प्रत्यक्ष कार्यरत प्राथमिक शिक्षक ७७० सबब एकूण ७ प्राथमिक शिक्षक अतिरिक्त झाल्याने शासन निर्णयानुसार कार्यवाही न करता, वेतन व भत्ते अदा करून अनियमितता झाली आहे.

(५) परिच्छेद क्र.३७ ड-पंचायत समिती मावळ येथीलमंजूरपदसंख्या८४२, प्रत्यक्षकार्यरत८३०, रिक्त पदे १२ येथे अन्य तालुक्यातील अतिरिक्त शिक्षकसमावेशनशक्यअसताना, शासननिर्णयदि.१८/५/२०११ अन्वये कार्यवाही करून समावेशन न करणेची अनियमितता झाली आहे.

(६) परिच्छेद क्र ३७ इ-पंचायत समिती, शिरूरकडे निकषाप्रमाणे मंजूर पद संख्या १०७९ येत असताना, प्रत्यक्षात कार्यरत प्राथमिक शिक्षक ११०९ आहेत. सबब ३० पदे अतिरिक्त कार्यरत आहेत. शासन निर्णयानुसार, अतिरिक्त प्राथमिक शिक्षकांचे समावेशन न करता, शासन निर्णयातील तरतूदीकडे दुर्लक्ष करून अतिरिक्त पदधारकांना वेतन व भत्ते अदा करून अनियमितता झाली आहे.

(७) परिच्छेद क्र. ३७ फ-पंचायत समिती जुन्नरकडे निकषांप्रमाणे ११५९ पदे असणे आवश्यक असताना मंजूर पदे ११७८ म्हणजेच १९ पदे उपशिक्षकांची जादा होत असताना, त्याचे अन्यत्र समावेशन न करता, शासन निर्णयातील तरतूदीचे उल्लंघन करून वेतन व भत्ते नियमबाहयपणे अदा करून अनियमितता झाली आहे.

(८) परिच्छेद क्र. ३७ ग-पंचायत समिती खेडकडे मंजूर पद संख्या १२६२ असताना प्रत्यक्ष कार्यरत पद संख्या १२६५ असून त्यांत उपशिक्षक/प्राथमिक शिक्षक पदे २४ कमी व २६ पदे जास्त असल्याने २ पदे अतिरिक्त ठरतात. शासननिर्णयानुसार समायोजनन करता वेतन व भत्ते अदा करून अनियमीतता झाली आहे.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीला जिल्हा परिषद, पुणे यांचे कडून खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.**

सन २०११-१२मध्ये जिल्हापरिषद पुणे प्राथमिक शाळातील दि.३०/९/२०११ चे पट संख्येनूसार शिक्षक निश्चीती मंजूर होवुन दि. २१.११.२०११ रोजी शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे यांचे कडून प्राप्त झाली त्यानंतर या कार्यालयाचे पत्र दि. ३०.११.२०११ अन्वये दि. १५.१२.२०११ अखेर तालुका स्तरावरून अतिरिक्त असलेल्या प्राथमिक शिक्षकांचे समायोजन करणे

बाबत कळवले आहे. तालुस्तरावरील समायोजना नंतर अतिरिक्त ठरलेल्या प्राथमिक शिक्षकांचे जिल्हा स्तरावरून समायोजन करणे आवश्यक होते, पंरतू माहे फेब्रुवारी/मार्च २०१२ मध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूका असल्याने आचारसंहिता कालावधीत व माहे एप्रिल मध्ये वार्षीक परिक्षेचा कालावधी असल्याने समायोजन करता आले नाही. नंतर माहे मे २०१२ मध्ये प्रशासकीय बदल्या झालेल्या शिक्षकांच्या रिक्त जागी अतिरिक्त शिक्षक समायोजित करण्यात आले. तसेच उर्वरित अतिरिक्त शिक्षक त्याच तालुक्यात पदवीधर, मुख्याध्यापक यांची पदे रिक्त असलेने त्याचे जागेवर तसे चसे वा निवृत्तीने रिक्त झालेल्या पदावर केंद्र प्रमूख, केंद्र समन्वयक, बीएड रजेवर असलेल्या शिक्षकांचे रिक्त पदावर जिल्हा स्तरावर समायो जनासाठी पात्र ठरलेले प्राथमिक शिक्षकांचे त्या त्यातालुक्यात समावेशन करण्यात आले. त्यामुळे इतर ७ तालुक्यातील रिक्त पदावर अतिरिक्त शिक्षकांचे समावेशन करण्यात आले नाही.

**पंचायत समिती दौंड येथे दि. ३०/९/२०११ चे पट संख्येनुसार खालीलप्रमाणे शिक्षक मान्य झाले आहेत.**

| पदनाम | मंजूर | कार्यरत | रिक्त (कमी) | अतिरिक्त | समायोजनस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| मुख्या. | ६९ | ५६ | १४ | १ | १ |
| पदवीधर | ५० | ४६ | ७ | ३ | २ |
| उपशिक्षक | ८८३ | ८९१ | २३ | २९ | २३+५ |
| एकूण | १००२ | ९९३ | ४४ | ३३ | ३१ |

वरील स्थिती नूसार दि.२८/२/२०१२ रोजी १ मुख्याध्यापक, २ पदवीधर शिक्षक व २३ उपशिक्षक असे २६ अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात आले आहे. उर्वरित ६ प्राथमिक शिक्षक व १ पदवीधर असे एकूण ७ अतिरिक्त शिक्षक होते पैकी १ प्राथमिक शिक्षक २९.२.२०१२ रोजी सेवानिवृत्त झाले व दि. ११.५.२०१२ रोजी ५ प्राथ. शिक्षकाचे समायोजन करणेत आले, व १ पदवीधर शिक्षकांने पदवीधर श्रेणी नाकारले नेते उपशिक्षक पदी अतिरिक्त झाले. परंतू त्या प्रशासकिय बदलीस पात्र झालेने त्यांची दि. ३०/६/२०१२ रोजी हवेली तालुक्यात बदली झाली.

**पंचायत समिती बारामती येथे दि. ३०/९/२०११ चे पट संख्येनुसार खालील प्रमाणे शिक्षक मान्य झाले आहेत.**

| पदनाम | मंजूर | कार्यरत | रिक्त (कमी) | अतिरिक्त | समायोजन स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| मुख्या. | ३८ | ४३ | १ | ६ | ३ |
| पदवीधर | २९ | २९ | ३ | ३ | ३ |
| उपशिक्षक | ८२६ | ८३३ | ३० | ३७ | २८ |
| एकूण | ८९३ | ९०५ | ३४ | ४६ | ३४ |

पंचायत समिती बारामती अंतर्गत एकूण ४६ प्राथ. शिक्षक अतिरिक्त होते त्यांचे ३४ रिक्त पदांवर दि. ०३.०१.२०१२ रोजी समायोजन करणेत आले. दरम्यान फेंब्रुवारी व मार्च २०१२ मध्ये जिप/पंस निवडणूक आचारसंहिता आल्याने व एप्रिल मध्ये वार्षिक परिक्षा असल्याने या कार्यालयाचे पत्र दि. ४/५/२०१२ अन्वये माहे मे व जून २०१२ मध्ये सेवा निवृत्तीने रिक्त होणा-या पदावर समायोजन करणे बाबत कळवलेनूसार ८ उप शिक्षक व ३ मुख्याध्यापक यांचे दि.१८/५/२०१२ रोजी समायोजन करण्यात आले. तर १ उपशिक्षकाचे दि. १/९/२०१२ रोजी रिक्त ठिकाणी समायोजन करणेत आले आहे.

**पंचायत समिती आंबेगाव येथे दि. ३०/९/२०११ चे पट संख्येनुसार खालीलप्रमाणे शिक्षक मान्य झाले आहेत.**

| पदनाम | मंजूर | कार्यरत | रिक्त (कमी) | अतिरिक्त | समायोजन स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| मुख्या. | ५२ | ५२ | ३ | ३ | ३ |
| पदवीधर | ४१ | ३९ | ३ | १ | १ |
| उपशिक्षक | ६७० | ६७९ | २७ | ३६ | ३६ |
| एकूण | ७६३ | ७७० | ३३ | ४० | ४० |

३० सप्टेंबर २०११ नुसार आंबेगाव विकास गटात वरील प्रमाणे ३ मुख्याध्यापक, १ पदवीधर व २७ उप शिक्षक यांचे दि.२.१.२०१२ रोजी रिक्त ठिकाणी समायोजन करण्यात आले. उर्वरित ९ शिक्षकांपैकी ३ शिक्षकांचे बदली व पदोन्नती झाले नेत्याचा समायोजनाचा प्रश्न आला नाही. तर ३ शिक्षकांचे तात्पुरते समायोजन नवीन साखर शाळेवर करणेत आले. तर ३ शिक्षकांचे पदवीधर, मुख्याध्यापक यांचे रिक्त झालेल्या पदावर समायोजन करणेत आले आहे.

**पंचायत समिती मावळ येथे दि. ३०/९/२०११ चे पट संख्येनुसार खालीलप्रमाणे शिक्षक मान्य झाले आहेत.**

| पदनाम | मंजूर | कार्यरत | रिक्त (कमी) | अतिरिक्त | समायोजनस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| मुख्या. | ८४ | ७० | १७ | २ | २ |
| पदवीधर | ७९ | ७६ | ७ | ४ | ४ |
| उपशिक्षक | ८४१ | ८३४ | ३५ | २९ | २९ |
| एकूण | १००४ | ९८० | ५९ | ३५ | ३५ |

पंचायत समिती मावळ येथे दि. ३०.९.२०११ नुसार वरीलप्रमाणे अतिरिक्त प्राथमिक शिक्षकांचे समायोजन झाले असून एकूण ६ रिक्त पदे होती.

**पंचायत समिती शिरूर येथे दि. ३०/९/२०११ चे पट संख्येनुसार खालीलप्रमाणे शिक्षक मान्य झाले आहेत.**

| पदनाम | मंजूर | कार्यरत | रिक्त (कमी) | अतिरिक्त | समायोजन स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| मुख्या. | ७२ | ६८ | ७ | ३ | ३ |
| पदवीधर | ५५ | ५२ | ५ | २ | १ |
| उपशिक्षक | १०८३ | ११११ | १५ | ४३ | ८ |
| एकूण | १२१० | १२३१ | २७ | ४८ | १२ |

शिरूर विकास गटात दि. ३०/९/२०११ नुसारवरील प्रमाणे १२ शिक्षकांचे दि. २/१/२०१२ रोजी समायोजन करणेत आले आहे. बाकी ३६ शिक्षकांचे दरम्यान फेब्रुवारी व मार्च २०१२ मध्ये जिप/पस निवडणूक आचारसंहिता असल्याने व एप्रिल मध्ये वार्षिक परिक्षा असल्याने या कार्यालयाचे पत्र दि.४/५/२०१२ अन्वये माहे मे व जून २०१२ मध्ये सेवानिवृत्तीने रिक्त होणा-या पदावर तसेच पदवीधर मुख्याध्यापक रिक्त पदावर समायोजन करणेबाबत कळवले नूसार समायोजन केले व माहे जून मध्ये सर्वसाधारण बदल्या झालेने त्याचे रिक्त झालेल्या पदावर उर्वरित शिक्षकांचे समायोजन केले आहे.

**पंचायत समिती जुन्नर येथे दि. ३०/९/२०११ चे पट संख्येनुसार खालीलप्रमाणे शिक्षक मान्य झाले आहेत.**

| पदनाम | मंजूर | कार्यरत | रिक्त (कमी) | अतिरिक्त | समायोजनस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| मुख्या. | ८४ | ६४ | २० | ० | ० |
| पदवीधर | ७२ | ६३ | १३ | ४ | ३ |
| उपशिक्षक | १०२२ | १०३२ | १६ | २६ | २० |
| एकूण | ११७८ | ११५९ | ४९ | ३० | २३ |

पंचायत समिती जून्नर येथे ३०.९.२०११ नुसार दि. ३.१.२०१२ रोजी समायोजन प्रक्रियेत ३ पदवीधर शिक्षकांचे समायोजन केले. १ पदवीधर शिक्षकाचे सेवा निवृतीमुळे समायोजन केले नाही. २६ अतिरिक्त उप शिक्षका पैकी ५ शिक्षकांचे जादा शिक्षक असलेल्या शाळेत जागारिक्त झालेने त्याच शाळेत समायोजन झाले आहे. या कार्यालयाचे पत्र दि.४/५/२०१२ नुसार दि. १३.५.२०१२ रोजी उर्वरित २१ पैकी १३ शिक्षकांचे सेवानिवृतीने रिक्त होणा-या पदावर समायोजन करणेत आले. उर्वरित ८ शिक्षकांनी नकार दिलेने पुन्हा दि.१८.६.२०१२ रोजी ८ पैकी २ शिक्षकांचे समायोजन करणेत आले आहे.

तद्नंतर जिप कार्यालयाचे पत्र दि.१८/१२/२०१२ नुसार दि. १३.१.२०१३ रोजी उर्वरित ६ शिक्षकांचे तालुका स्तरावर समायोजन करणेत आले.

**पंचायत समिती खेड येथे दि.३०/९/२०११ नुसार खालीलप्रमाणे शिक्षक निश्चिती आहे.**

| पदनाम | मंजूर | कार्यरत | रिक्त (कमी) | अतिरिक्त | समायोजन स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| मुख्या. | १२६ | १०६ | २१ | १ | १ |
| पदवीधर | १२० | १०३ | १८ | १ | १ |
| उपशिक्षक | १२६२ | १२६४ | २४ | २६ | २५ |
| एकूण | १५०८ | १४७३ | ६३ | २८ | २८ |

खेड विकास गटात दि. ३०.९.२०११ नुसार एकूण २८ पदावर शिक्षक जास्त होते. पैकी १ मुख्याध्यापक, १ पदवीधर व २४ उपशिक्षक यांचे रिक्त ठिकाणी समायोजन झाले. तसेच छगन केदारी उपशिक्षक हे मयत झालेने व श्री. थोरात यांची शिरूर विकास गटात विनंतीने बदली झाल्याने रिक्त झालेल्या दोन पदावर दि. ३.१.२०१२ रोजी दोन अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात आलेले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

पुणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केलीकी, सप्टेंबर २०११ मध्ये पट निश्चिती नंतर एकूण ६ तालुक्यांमध्ये ५८ शिक्षक अतिरिक्त ठरत असताना त्यांचे समायोजन अन्य तालुक्यातील रिक्त पदांवर का करण्यात आले नाही, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन न केल्याने त्यांच्याकडून कोणती शैक्षणिक कामे करुन घेतली, अन्य तालुक्यातील रिक्त पदांवर शिक्षक नसल्याने त्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस कोण जबाबदार आहे, शिक्षकांचे समायोजन ऑक्टोबर अखेर पर्यंत करणे आवश्यक असताना ते विलंबाने म्हणजेच फेब्रुवारी मध्ये करण्यास कोण जबाबदार आहे व २०११-१२ या वर्षातील शिक्षक समायोजनाची स्थिती काय होती ? यावर ६ तालुक्यांमध्ये शिक्षक अतिरिक्त ठरले होते. दौंड तालुक्यात ३३ शिक्षक अतिरिक्त ठरले होते. या तालुक्यात मुख्याध्यापकांची १४, पदवीधर शिक्षकांची ७ व उप शिक्षकांची २३ पदे रिक्त होती. या पदांचे समायोजन दि. २८/२/२०१२, २९/२/२०१२, ११/५/२०१२, आणि ३०/६/२०१२ रोजी झाले आहे असा खुलासा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केला.

शिक्षकांच्या समायोजनास झालेल्या विलंबामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले त्यास कोण जबाबदार आहे, रिक्त पदे केव्हा निदर्शनास आली व ती केव्हा भरण्यात आली अशी विचारणा केली असता, समितीस उत्तर प्राप्त झाले नाही. समितीच्या मते अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्यास जिल्हा परिषद प्रशासन जबाबदार आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ग्रामविकास विभागाने सन २०११ मध्ये शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्या शासन निर्णयानुसार शिक्षकांचे वेतन व भत्ते व पगारापोटीची रक्कम शालेय शिक्षण विभागाकडून येते. धोरण म्हणून त्यांनी एक विषय समितीच्या निदर्शनास आणून दिला की, रुल्स ऑफ बिझनेस प्रमाणे शिक्षकांचे वेतन आणि त्या अनुषंगिक बाबी शालेय शिक्षण विभाग राज्य स्तरावरुन करते. शिक्षण उप संचालकांनी २० ऑक्टोबर पर्यंत शिक्षक निश्चितीच्या ॲप्रूव्हलला मान्यता दिली पाहिजे. २५ ऑक्टोबर पर्यंत ॲप्रूव्हल आले नाही तर त्यांच्या कडून ॲप्रूव्हल मिळाले असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करावयास पाहिजे. रुल्स ऑफ बिझनेस प्रमाणे शालेय शिक्षण विभागाची शिक्षक निश्चिती किती आहे हे जिल्हा परिषदेला समजले पाहिजे. उदाहरणार्थ जिल्हा परिषदेने १ हजार शिक्षक निश्चिती आहे असे कळविले आणि त्यांनी ९९० पदांची शिक्षक निश्चिती करुन दिली तर उर्वरित १० शिक्षकांना मान्यता नसल्यामुळे यांच्या पगाराचा प्रश्न निर्माण होईल. जिल्हा आणि तालुका स्तरावर अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याचा कालावधी केवळ २५ ते ३० ऑक्टोबर पर्यंतच असतो. जिल्हा परिषदेला समायोजनाची कार्यवाही करण्यास ६ दिवसांचा कालावधी कमी पडतो. हा कालावधी किमान एक महिन्याचा असावयास पाहिजे.

समितीच्या मते अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचा अल्प कालावधी व अतिरिक्त शिक्षकांचा प्रश्न आणि विभागीय अधिका-यांना भेडसावणा-या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी सदरहू बाब विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी चर्चेला घेण्यात यावी. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांचे समायोजन करुन त्यांना इतरत्र बदली देवून त्यांना सेवेमध्ये समायोजित करण्याबाबत ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय दि. १५.०५.२०११ असुन त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती पाठविण्याचे निदेश समितीने दिले.

**यासंदर्भात समितीने २१ डिसेंबर, २०१५रोजी विधानमंडळाच्या उभय सभागृहास आपला पाचवा अहवाल सादर केला. सदर अहवालात समितीने पुढीलप्रमाणे अभिप्राय व शिफारशी केल्या :-**

प्राथमिक शिक्षकांच्या समायोजनेबाबत परिच्छेद क्रमांक ३.९४ मध्ये ग्रामविकास विभागाचे परिपत्रक दिनांक १८/०५/२०११ मधील निदेशानुसार ऑक्टोबर, २०११ अखेर समायोजनेची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक असताना त्याची अंमलबजावणी केली नसल्याबाबत आक्षेपित केलेले आहे.यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साक्षी दरम्यान कार्य नियमावली प्रमाणे शिक्षण उप संचालक यांनी २५ ऑक्टोबर पर्यंत संचमान्यता दिली नाही तर मान्यता गृहीत धरुन ३१ ऑक्टोबरपर्यंत अतिरीक्त शिक्षकांचे समायोजन करावे लागते. परंतु सहा दिवासाचा कालावधी जिल्हा परिषदेला कमी पडतो. एक महिना असणे आवश्यक असल्याचे विदित केले. विभागीय अधिका-यांना भेडसावणा-या अडचणीवर मार्ग काढण्यासाठी समितीने सदरहू मुद्दा विभागीय सचिवांचे साक्षी करीता घेवून विभागास विचारणा केली की, अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचा कालावधी केवळ सहा दिवस मिळत असून जिल्हा परिषदेला किमान एक महिन्याचा कालावधी देणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. यासंदर्भात शासन निर्णय काय आहेत व त्यात कोणती सुधारणा करणे आवश्यक आहे.

समितीच्या निदेशानुसार विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी जिल्हा परिषदेने लेखी माहिती मध्ये समायोजनामध्ये ग्रामविकास विभागाकडे मार्गदर्शक मागविले असता ग्राम विकास विभागाने सदरहू सहा दिवसाचा कालावधी पर्याप्त व पूरेसा असल्याचे तसेच आवश्यकता भासल्यास जिल्हा परिषदेशी विचारविनिमय करण्यात येईल असे कळविले आहे. अतिरीक्त शिक्षकांची संख्या निश्चित करण्यासाठी दरवर्षी ३० सप्टेंबर ही तारीख व त्या रोजीची पट संख्या निश्चित केली जाते. त्यानुसार शिक्षक निश्चितीचा प्रस्ताव शिक्षण उप संचालकांकडे जातो, त्यामध्ये जिल्हा परिषदांना मिळणारा कमी कालावधी लक्षात घेता साकल्याने विचार करून ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक १५-०५-२०११ रोजीच्या परिपत्रकामध्ये योग्य त्या करण्यात व केलेल्या सुधारणेबाबत समितीला अवगत करावे अशी समितीची शिफारस आहे.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या कार्यवाही संदर्भात पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे.—**

पंचायत राज समितीने केलेल्या शिफारशी नुसार पुणे जिल्हा परिषदेचे अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन वेळेत न केलेल्या व समायोजनांची प्रक्रिया विहित मुदतीत न करणा-या खालील नमूद केलेल्या तत्कालीन गट शिक्षण अधिकारी यांचेवर प्रशासकीय कारवाई करणे बाबतचे प्रस्ताव मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे खालीलप्रमाणे सादर करणेत आले आहे.

(१) श्री. नाईकडे एस. डी. (तत्कालिन गट शिक्षणाधिकारी) पंचायत समिती आंबेगाव श्री. नाईकडे तत्कालिन गटशिक्षणाधिकारी यांचे शिस्तभंग कारवाई बाबत आरोपपत्रासह प्रस्ताव या कार्यालयाकडील जा. क्र. शिक्षण/प्राथ/८५९/२०१६, दिनांक ११-८-२०१६ अन्वये मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करणेत आला आहे.

(२) श्रीमती संगिता शिंदे, (तत्कालीन गटशिक्षणाधिकारी) पंचायत समिती दौंड श्रीमती शिंदे तत्कालीन गट शिक्षणाधिकारी या सध्या मा. शिक्षण उपसंचालक कार्यालय येथे शिक्षण उपनिरिक्षक या पदावर कार्यरत असून त्यांचे शिस्तभंग कारवाईबाबत या कार्यालयाकडील जा. क्र. शिक्षण/प्राथ/८३६/२०१६, दिनांक १९-१०-२०१६ अन्वये प्रस्ताव मा. शिक्षण उप संचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

(३) श्री. एस. जे. तांबे, (तत्कालीन गटशिक्षणाधिकारी) पंचायत समिती शिरूर, श्री. तांबे, तत्कालीन गटशिक्षणाधिकारी यांचे शिस्तभंग कारवाईबाबत आरोपपत्रासह प्रस्ताव या कार्यालयाकडील जा. क्र. शिक्षण/प्राथ/८५८/२०१६, दिनांक २४-१०-२०१६ अन्वये मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

(४) श्री. सी. ई. कदम, (तत्कालीन गटशिक्षणाधिकारी) (सेवानिवृत्त) पंचायत समिती बारामती, श्री. कदम तत्कालीन गटशिक्षणाधिकारी (सेवानिवृत्त) यांचे शिस्तभंग कारवाईबाबत आरोपपत्रासह प्रस्ताव या कार्यालयाकडील जा. क्र. शिक्षण/प्राथ/८५६/२०१६, दिनांक २४-१०-२०१६ अन्वये मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करणेत आला आहे.

(५) श्री. बी. एल. थोरात, (तत्कालीन गटशिक्षणाधिकारी) (सध्या कार्यरत गट शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा) पंचायत समिती जुन्नर, श्री. थोरात तत्कालीन गटशिक्षणाधिकारी यांचे शिस्तभंग कारवाईबाबत आरोपपत्रासह प्रस्ताव या कार्यालयाकडील जा. क्र. शिक्षण/प्राथ/८५७/२०१६, दिनांक २४-१०-२०१६ अन्वये मा. संचालक, महाराष्ट्र राज्य, शैक्षणिक परिक्षा परिषद, पुणे, यांचेकडे सादर करण्यात आला आहे. मा. संचालक, यांचेकडून मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे श्री. थोरात यांचे कारवाईबाबत प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

(६) श्री. बी. जी. कड, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, खेड दिनांक ३१-०३-२०१२ रोजी सेवानिवृत्त व श्री. एस. आ. गायकवाड, गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती, मावळ दिनांक ३०-०६-२०१३ रोजी सेवानिवृत्त झालेले असल्याने त्यांचेवर प्रशासकीय कारवाई करता आलेली नाही.

**समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुपालनार्थ शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत पाठविलेली लेखी माहिती पुढीलप्रमाणे आहे.**

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :**

आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने ५ गट शिक्षणाधिकारी यांच्यावर शिस्तभंग विषयक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून सुधारीत प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे. तसेच दिनांक ३-०१-२०१८ च्या पत्रान्वये व दिनांक २६-०३-२०१८ च्या अर्धशासकीय पत्रान्वये स्मरण करून दिलेले आहे. मात्र सुधारीत प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेच्या सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत पाचवा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहात दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी सादर केला. समितीने सुचविलेल्या अभिप्राय व शिफारशींवर शासनाने काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीने अशी विचारणा केली की, पुणे जिल्हा परिषदेने सुमारे ५९ अतिरिक्त शिक्षकांचे वेळीच समायोजन न केल्याने या अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांनी लेखा परिक्षकांनी आक्षेपित केलेल्या कालावधीत कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक अध्यापनाचे कार्य केलेले नसताना देखील जिल्हा परिषदेने त्यांना वेतन दिले आहे. तसेच समायोजनाचे काम विलंबाने केल्याने ज्या ठिकाणी शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत तेथे अतिरिक्त शिक्षक वेळीच उपलब्ध करुन दिले नसल्यामुळे आणि सदरच्या कार्यवाहीस अक्षम्य विलंब केल्यामुळे या संपूर्ण प्रकरणात सर्व संबंधित जबाबदार असणा-या विरुध्द जबाबदारी निश्चित करुन कठोर प्रशासकीय कारवाई करुन शासन निर्णयाप्रमाणे त्यांना कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात शास्ती करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस होती. त्या अनुषंगाने विभागाने सुधारित प्रस्ताव अप्राप्त आहे असे म्हटले आहे.

यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, यामध्ये आता कार्यवाही पुर्णत्वास आली आहे. यात मुख्य कार्यकारी अधिकारी आणि आयुक्त, शिक्षण विभाग यादोन्ही कार्यालयामार्फत दोन, तीन वेळा पत्र व्यवहार झाला. शेवटी आयुक्तांनी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी स्पष्ट केले की तुम्ही गट शिक्षणाधिकारी यांना नोटिसा द्याव्यात. त्यांनी नोटिसा दिल्या आणि त्यावर खुलासा मागितला, परंतु मागितलेला खुलासा समाधानकारक वाटला नाही.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, या प्रकरणात फारच विलंब होत आहे. या प्रकरणी तात्काळ प्रस्ताव मागवून घ्यावा. यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी नियम १० अन्वये कारवाई करावयाची आहे. एका महिन्यातही कारवाई करतील.

मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या स्तरावर कारवाई करावयाची आहे त्यामुळे इतका विलंब का लागतो आहे? पंधरा दिवसाच्या आत कारवाई करुन समितीला अहवाल सादर करावा असे समितीने निदेश दिले. यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

शिक्षण विभाग,जिल्हा परिषद, पुणे यांनी प्राथमिक शिक्षकांच्या समायोजनाबाबत ग्रामविकास विभागाने दिनांक १८ मे, २०११ अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे दिनांक ३० सप्टेंबर, २०११ अखेर समायोजनाची कार्यवाहीचे पालन न केल्यामुळे पदनिश्‍चिती व समायोजनात अनियमितता झालेली आहे. पुणे जिल्हयातील १३ तालुक्यातील ६ तालुक्यामध्ये ५८ प्राथमिक शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरली होती. ७ तालुक्यामध्ये ४१ प्राथमिक शिक्षकांची पदे रिक्त होती. त्यामुळे ४१ पदावर समावेशन न करण्यात आल्या प्रकरणी लेखापरिक्षणामध्ये आक्षेप घेण्यात आला आहे.

यावर समितीने केलेल्या शिफारसीनुसार पुणे जिल्हा परिषदेने अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन वेळेत न केलेल्या व समायोजनांची प्रक्रिया विहित मुदतीत न करणा-या तत्कालिन आंबेगाव, दौंड, शिरुर, बारामती व जुन्नर या पंचायत समित्यांचे ५ गट शिक्षण अधिकारी यांचेवर प्रशासकीय कारवाई करणेबाबतचे प्रस्ताव मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडे पाठविण्यात आले होते. त्यावर आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने ५ गट शिक्षणाधिकारी यांच्यावर शिस्तभंग विषयक कारवाई करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून सुधारित प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने गट शिक्षणाधिका-यांकडून खुलासा मागितला असता त्यांचेकडून समाधानकारक खुलासा प्राप्त झालेला नसल्याने याप्रकरणी तात्काळ प्रस्ताव मागविण्यात यावा व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियम १० अन्वये एक महिन्याच्या आत कारवाई करण्यात यावी. तसेच पुणे जिल्हा परिषदेने सुमारे ५९ अतिरिक्त शिक्षकांचे वेळीच समायोजन न केल्याने या अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना लेखा परिक्षकांनी आक्षेपित केलेल्या कालावधीत कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक अध्यापनाचे कार्य केलेले नसताना देखील जिल्हा परिषदेने त्यांना वेतन दिलेले आहे. **तसेच समायोजनाचे काम विलंबाने केल्याने ज्याठिकाणी शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत तेथे अतिरिक्त शिक्षक वेळीच उपलब्ध करुन न दिल्यामुळे आणि सदरच्या कार्यवाहीस अक्षम्य विलंब केल्यामुळे या संपूर्ण प्रकरणात सर्व संबधित जबाबदार असणा-यां विरुध्द जबाबदारी निश्‍चित करुन कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी शिफारस करण्यात आली होती. तथापि, विभागाने सुधारित प्रस्ताव अप्राप्त असल्याने पुढे कोणतीही कारवाई केली नाही, त्यामुळे समिती तीव्र नाराजी व असमाधान व्यक्त करीत आहे.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून तत्कालिन गटशिक्षणाधिकारी यांचे संदर्भातील सुधारित प्रस्ताव तात्काळ मागवून घ्यावा व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे नियमानुसार कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्याच्या आत पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

परिशिष्ट "अ"

शासनाचे आदेश व परिपत्रके

(परिशिष्ट १.१)

**जिल्हा परिषदांकडील कामे किंवा विकास योजना यांच्या संबंधित प्रशासकीय मान्यता तसेच, निविदा किंवा कंत्राट स्वीकारण्याच्या अधिकारात वाढ करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्रमांक - झेडपीए-२०००/प्र.क्र.४०२३/३३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२., १२ जानेवारी,२००१.

**वाचा**:- १) ग्राम विकास व जलसंधारण विभाग अधिसूचना क्र.झेडपीए-१०९७/प्र.क्र.११०३/३३,दि.३१ जुलै, १९९९.

२) ग्राम विकास व जलसंधारण विभाग अधिसूचना क्र.झेडपीए-१०९७/प्र.क्र.११०३/३३,दि.३१ जुलै, १९९९.

**शासन निर्णय**:-

७३ व्या घटना दुरुस्ती नुसार घटनेच्या अनुसूचि ११ मधील विषयांचे जिल्हा परिषदांना हस्तांतरण करण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे जिल्हा परिषदांकडील कामाची व्याप्ती ब-याच प्रमाणात वाढणार आहे. यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ४ खालील परिशिष्ट दोन मध्ये शासन अधिसूचना ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीए १०९७/प्र.क्र.११०३/३३, दिनांक ३१ जुलै, १९९९ अन्वये करण्यात आलेल्या सुधारणा खालीलप्रमाणे पुनर्सुधारित करण्यात येत आहे.

## महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता १९६८ (नियम ४ खालील)

### परिशिष्ट -२

जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या अधिकाराची विभागणी करणे

| अनु. क्रमांक | अधिकाराचे स्वरुप | ज्या प्राधिका-यांकडे अधिकार सोपविण्यांत आले आहे तो प्राधिकारी / प्राधिकरण | अधिकाराची मर्यादा अंदाजित अनावर्ती खर्च<br>न्यूनतम मर्यादा | <br>अधिकतम मर्यादा |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| भाग एक | कामे किंवा विकास योजना यांच्या संबंधातील प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार | **जिल्हा परिषद** | | |
| | | १.उपअभियंता | ......... | ५०,०००* |
| | | २.कार्यकारी अभियंता | ५०,००० | २,५०,०००* |
| | | ३.मुख्य कार्यकारी अधिकारी | २,५०,००० | १०,००,०००* |
| | | ४.अध्यक्ष स्थायी समिती | १०,००,००० | १३,००,०००* |
| | | ५.अध्यक्ष विषय समिती | १०,००,००० | १२,००,०००* |
| | | ६.विषय समिती | १२,००,००० | १५,००,००० |
| | | ७.स्थायी समिती | १३,००,००० | २५,००,००० |
| | | ८.जिल्हा परिषद | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| | | **पंचायत समिती** | | |
| | | १. गट विकास अधिकारी | .......... | २,००,०००* |
| | | २. पंचायत समितीचे सभापती | २,००,००० | ५,००,०००* |
| | | ३. पंचायत समिती | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भाग दोन | कामे किंवा विकास योजनांच्या निविदा किंवा कंत्राट स्विकारण्याचा अधिकारी | १. उप अभियंता | ........ | ५०,०००* |
| | | २. कार्यकारी अभियंता | ५०,००० | २,५०,०००* |
| | | ३. मुख्य कार्यकारी अधिकारी | २,५०,००० | १०,००,०००* |
| | | ४. अध्यक्ष, स्थायी समिती | १०,००,००० | १३,००,०००* |
| | | ५. अध्यक्ष, विषय समिती | १०,००,००० | १२,००,०००* |
| | | ६. विषय समिती | १२,००,००० | १५,००,००० |
| | | ७. स्थायी समिती | १३,००,००० | २५,००,००० |
| | | ८. जिल्हा परिषद | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| | | **पंचायत समिती** | | |
| | | १. गट विकास अधिकारी | ....... | २,००,०००* |
| | | २. पंचायत समितीचे सभापती | २,००,००० | ५,००,०००* |
| | | ३. पंचायत समिती | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |

* टिप :- १) या स्तरावर दिलेल्या मान्यतेची माहिती पुढील स्थायी समितीस / विषय समितीस / पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य राहील.

२) प्रत्येक तिमाही बैठकीत जिल्हा परिषद विभागांनी तिमाहित केलेल्या कार्यवाहीचा आढावा दर्शविणारा अहवाल समितीच्या बैठकीत सादर करावा. अनुदानाची, बांधकामे व योजना यांच्याशी सुसंगती याची माहिती अहवालात प्रामुख्याने द्यावी.

या अनुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील परिशिष्ट २ मध्ये यथायोग्य वेळी बदल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(कि.गो.पतिंगे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रती,

